भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# रेल्वे अधिनियम, १९८९

(१९८९ चा अधिनियम क्रमांक २४)

[१५ जानेवारी १९९६ रोजी यथाविद्यमान]

# The Railways Act, 1989

(Act No. 24 of 1989)

[As in force on the 15th January 1996]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. ९-०० ]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ जानेवारी १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दी रेल्वे ॲक्ट, १९८९ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र, असाधारण**, भाग बारा, अनुभाग १, खंड ७ अंक १ दिनांक ९ ऑगस्ट १९९६ यात पृष्ठ २२३ ते २६७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ ऑगस्ट १९९६.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the Railways Act, 1989 as on the 15th January 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India Extraordinary* Part XII, Section 1, No. 1, Vol. 7, dated 9th August 1996 on pages 223 to 267.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

New Delhi :
Date : 9th August 1996.

# रेल्वे अधिनियम, १९८९

कलमांचा क्रम

## प्रकरण—पहिले

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.
२. व्याख्या.

## प्रकरण—दुसरे

### रेल्वे प्रशासन

३. क्षेत्रीय रेल्वे.
४. महाव्यवस्थापकाची नियुक्ती.

## प्रकरण—तिसरे

### रेल्वे सुरक्षा आयुक्त

५. मुख्य रेल्वे सुरक्षा आयुक्त व रेल्वे सुरक्षा आयुक्त यांची नियुक्ती.
६. आयुक्तांची कर्तव्ये.
७. आयुक्ताची शक्ती.
८. आयुक्त लोकसेवक असणे.
९. आयुक्तांना देण्यात आलेल्या सवलती.
१०. आयुक्तांचे वार्षिक अहवाल.

## प्रकरण—चौथे

### बांधकाम करणे आणि त्यांचे परिरक्षण

११. सर्व आवश्यक बांधकामे पार पाडण्याची रेल्वे प्रशासनाची शक्ती.
१२. नळ, विद्युत पुरवठा मार्ग, गटारे किंवा मलप्रणाल, इत्यादींच्या स्थितीत फेरफार करण्याची शक्ती.
१३. शासकीय संपत्तीचे संरक्षण.
१४. अडथळे दूर करण्यासाठी, दुरुस्तीसाठी किंवा अपघातास प्रतिबंध करण्यासाठी जमिनीवर तात्पुरता प्रवेश.
१५. नुकसान किंवा हानी याबद्दल रकमेचे प्रदान.
१६. सुविधा बांधकामे.
१७. अतिरिक्त सुविधा बांधकामांची व्यवस्था करण्याची मालक, भोगवटादार यांची किंवा स्थानिक प्राधिकरणाची शक्ती.
१८. कुंपणे, दरवाजे आणि अडणे.
१९. वरपूल व खालपूल.
२०. केंद्र शासनाची सुरक्षिततेकरिता निदेश देण्याची शक्ती.

## प्रकरण—पाचवे

### रेल्वे चालू करणे

२१. रेल्वे चालू करण्यास केंद्र शासनाची मंजुरी.
२२. रेल्वे चालू करण्यास मंजुरी देण्यापूर्वी औपचारिक गोष्टींचे अनुपालन करणे.
२३. विवक्षित बांधकामे चालू करण्यास कलमे २१ व २२ लागू असणे.
२४. वाहतुकीतील तात्पुरता खोळंबा.

२५. प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता चालू केलेली रेल्वे बंद करण्याविषयीची शक्ती.
२६. बंद केलेली रेल्वे पुन्हा चालू करणे.
२७. रुळयानाचा वापर.
२८. शक्तीचे प्रत्यायोजन.
२९. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—सहावे

### दरांची निश्चिती

३०. दर निश्चित करण्याची शक्ती.
३१. वस्तूंचे वर्गीकरण करण्याची किंवा दरात फेरबदल करण्याची शक्ती.
३२. विवक्षित दर आकारण्याची रेल्वे प्रशासनाची शक्ती.

## प्रकरण—सातवे

### रेल्वे दर अधिकरण

३३. रेल्वे दर अधिकरणाची घटना.
३४. अधिकरणाचा कर्मचारीवर्ग.
३५. अधिकरणाच्या बैठकी.
३६. एखाद्या रेल्वे प्रशासनाविरुद्ध तक्रारी.
३७. अधिकरणाच्या अधिकारिता नसतील अशा बाबी.
३८. अधिकरणाच्या शक्ती.
३९. अधिकरणाकडे निर्देश करणे.
४०. केंद्र शासनाने सहाय्य करणे.
४१. पुराव्याचा भार, इत्यादी.
४२. अधिकरणाचे निर्णय, इत्यादी.
४३. न्यायालयांच्या अधिकारितेस प्रतिबंध.
४४. अधिकरण मंजूर करु शकेल असे अनुतोष.
४५. अधिकरणाने दिलेल्या निर्णयांचे पुनरीक्षण.
४६. अधिकरणाच्या निर्णयांची किंवा आदेशांची अंमलबजावणी.
४७. केंद्र शासनास अहवाल सादर करणे.
४८. अधिकरणाची विनियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—आठवे

### प्रवाशांचे वहन

४९. स्थानकावर (गाड्यांच्या) विवक्षित वेळा व भाड्याचा तक्ता प्रदर्शित करणे.
५०. भाड्याच्या पूर्ततेनंतर तिकिटे पुरविणे.
५१. जागा शिल्लक नसलेल्या एखाद्या वर्गात किंवा गाडीत अतिरिक्त प्रवाशांकरिता तिकिटे देण्यात आली असतील अशा प्रकरणांकरिता उपबंध.
५२. तिकिट रद्द करणे व परत करणे.
५३. विवक्षित तिकिटांच्या हस्तांतरणाविरुद्ध प्रतिषेध.
५४. पास व तिकिटे दाखविणे व प्रत्यर्पित करणे.
५५. पास किंवा तिकिट याशिवाय प्रवास करण्यास प्रतिषेध.
५६. संक्रामक किंवा सांसर्गिक रोगांनी पीडित व्यक्ती वाहून नेण्यास नकार देण्याची शक्ती.
५७. प्रत्येक डब्यातील प्रवाशांची कमाल संख्या.
५८. स्त्रियांकरिता डबे, इत्यादी राखून ठेवणे.
५९. प्रवासी व गाडीचे प्रभारी रेल्वे कर्मचारी यांच्यातील दळणवळण संपर्क.
६०. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण---नववे

### मालाचे वहन

६१. मालाच्या वहनाकरिता दर, पुस्तके, इत्यादी राखणे.
६२. मालाचे ग्रहण इत्यादीकरिता शर्ती.
६३. जोखीम दरांचा उपबंध.
६४. अग्रेषण टीप.
६५. रेल्वे पावती.
६६. मालाच्या वर्णनाशी संबंधित निवेदने आवश्यक करण्याची शक्ती.
६७. धोकादायक किंवा त्रासदायक मालाचे वहन.
६८. संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगांनी पिडित प्राण्यांचे वहन.
६९. मार्गातील बदल.
७०. अनुचित पसंतीक्रमाचा प्रतिषेध.
७१. विवक्षित मालाच्या वहनासंबंधात निदेश देण्याविषयीची शक्ती.
७२. वाघिणींकरिता व मालमोटारींकरिता वहनाची कमाल क्षमता.
७३. वाघिणीवर अति बोजा टाकण्याबद्दल शिक्षात्मक आकार.
७४. रेल्वे पावतीमध्ये समाविष्ट होणाऱ्या मालातील संपत्ती.
७५. कलम ७४ मुळे मार्गस्थ मालाच्या अटकावणीच्या अधिकारावर किंवा वाहणावळीच्या मागणीवर परिणाम होणार नाही.
७६. रेल्वेच्या पावतीचे अभ्यर्पण.
७७. विवक्षित प्रकरणी माल सुपूर्द करण्याची किंवा त्याचे उत्पन्न विकण्याची रेल्वे प्रशासनाची शक्ती.
७८. मोजणे, वजन करणे, इत्यादी बाबतची शक्ती.
७९. मालप्रेषिती किंवा पृष्ठांकितीच्या विनंतीवरून प्रेषित मालाचे वजन करणे.
८०. चुकीच्या सुपूर्दगीबाबतचे रेल्वे प्रशासनाचे दायित्व.
८१. प्रेषित मालाची खुली सुपूर्दगी.
८२. प्रेषित मालाची अंशतः सुपूर्दगी.
८३. वाहणावळी किंवा इतर कोणत्याही देय रकमेसाठी धारणाधिकार.
८४. बेवारशी प्रेषित माल.
८५. विवक्षित परिस्थितीत नाशवंत स्वरूपाच्या प्रेषित मालाची विल्हेवाट.
८६. कलमे ८३ ते ८५ खालील विक्रीचा दावा दाखल करण्याच्या अधिकारावर परिणाम न होणे.
८७. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण---दहावे

### अधिसूचित स्थानकांवर नोंदवलेल्या मालाच्या संबंधातील विशेष उपबंध

८८. व्याख्या.
८९. अधिसूचित स्थानके घोषित करण्याची शक्ती.
९०. अधिसूचित स्थानकांवरील हलविण्यात न आलेल्या मालाची विल्हेवाट.
९१. हक्कदार व्यक्तीला द्यावयाची किंमत, येणे रकमा वजा करून देणे.
९२. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण---अकरावे

### रेल्वे प्रशासनाची परिवाहक म्हणून जबाबदारी

९३. मालाचे परिवाहक म्हणून रेल्वे प्रशासनाची सर्वसाधारण जबाबदारी.
९४. रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या नसलेल्या कडरुळावर माल भरणे किंवा त्याचा बटवडा करणे.
९५. प्रवासातील विलंब किंवा अडवणूक.
९६. भारतातील रेल्वे आणि विदेशातील रेल्वे यांवरून होणारी वाहतूक.
९७. मालकाच्या जोखमीवर वहन केला जाणारा माल.

९८. सदोष स्थितीतील किंवा सदोष पुडक्यातील माल.
९९. प्रवास समाप्तीनंतर रेल्वे प्रशासनाची जबाबदारी.
१००. सामानाचा वाहक म्हणून जबाबदारी.
१०१. प्राण्यांचा वाहक म्हणून जबाबदारी.
१०२. विवक्षित प्रकरणी दायित्वापासून मुक्तता.
१०३. कोणत्याही प्रेषित मालाच्या बाबतीत द्रव्यविषयक दायित्वाची मर्यादा.
१०४. उघड्या वाघिणीमधून वहन करण्यात येणाऱ्या मालाबाबत दायित्वाची मर्यादा.
१०५. विवक्षित प्रेषित माल किंवा सामान यात असलेल्या वस्तू तपासण्याचा रेल्वे प्रशासनाचा अधिकार.
१०६. जादा आकाराचे परतावे आणि भरपाईसाठीच्या मागण्यांची सूचना.
१०७. मालाची हानी, इत्यादीच्या भरपाईसाठी अर्ज.
१०८. भरपाईची मागणी करण्यासाठी हक्कदार असलेली व्यक्ती.
१०९. वैयक्तिक क्षतीसाठी ज्याच्याविरुद्ध अर्ज दाखल करावयाचा ते रेल्वे प्रशासन.
११०. सिद्धीभार.
१११. समुद्रामधील अपघातांच्या संबंधात रेल्वे प्रशासनाच्या दायित्वाच्या मर्यादा.
११२. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—बारावे

### अपघात

११३. रेल्वे अपघाताची सूचना.
११४. आयुक्ताद्वारे चौकशी.
११५. रेल्वे प्रशासनाकडून चौकशी.
११६. चौकशीसंबंधीच्या आयुक्तांच्या शक्ती.
११७. आयुक्तासमोर केलेली विधाने.
११८. कार्यपद्धती, इत्यादी.
११९. चौकशी आयोग नेमण्यात आला असल्यास चौकशी, अन्वेषण, इत्यादी न करणे.
१२०. अपघातासंबंधीची चौकशी कलम ११३ च्या कक्षेत समाविष्ट होत नाही.
१२१. विवरणपत्रे.
१२२. या प्रकरणातील बाबींसंबंधी नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—तेरावे

### अपघातांमुळे झालेले प्रवाशांचे मृत्यू व क्षती यासंबंधातील रेल्वे प्रशासनाचे दायित्व.

१२३. व्याख्या.
१२४. दायित्वाची मर्यादा.
१२४-क. अश्लाध्य घटनेबाबत द्यावयाची भरपाई.
१२५. भरपाईसाठी अर्ज.
१२६. रेल्वे प्रशासनाकडून अंतरिम अनुतोष.
१२७. कोणतीही क्षती किंवा मालाचे नुकसान या संबंधातील भरपाई निर्धारित करणे.
१२८. विवक्षित अधिकारांसंबंधातील व्यावृत्ती.
१२९. या प्रकरणातील बाबींसंबंधी नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—चौदावे

### कामाचे तास आणि विश्रांतीचा कालावधी यांचे विनियमन.

१३०. व्याख्या.
१३१. प्रकरण विवक्षित रेल्वे कर्मचाऱ्यांना लागू होणार नाही.
१३२. कामाच्या तासाची मर्यादा.

१३३. नियतकालिक विश्रांती देणे.

१३४. रेल्वे कर्मचाऱ्याने कामावर राहणे.

१३५. रेल्वे श्रमिकांचे पर्यवेक्षक.

१३६. या प्रकरणातील बाबींसंबंधात नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण—पंधरावे

### शास्ती व अपराध

१३७. कपटाच्या उद्देशाने प्रवास करणे किंवा योग्य पासाविना वा तिकिटाविना प्रवास करण्याचा प्रयत्न करणे.

१३८. योग्य पासाविना किंवा तिकिटाविना अथवा प्राधिकृत अंतरापलिकडे प्रवास करण्याबद्दल जादा आकार किंवा भाडे यांची आकारणी.

१३९. व्यक्तींना काढून लावण्याची शक्ती.

१४०. विवक्षित प्रकरणी चांगल्या वर्तवणुकीबद्दल प्रतिभूती.

१४१. एखाद्या गाडीतील दळणवळणाच्या साधनांमध्ये विनाकारण हस्तक्षेप करणे.

१४२. तिकिटाच्या हस्तांतरणाबद्दल शास्ती.

१४३. रेल्वे तिकिटांचे प्रापण व पुरवठा याचा व्यवसाय चालविल्याबद्दल शास्ती.

१४४. फेरीने विकणे इत्यादी आणि भीक मागणे यांवर बंदी.

१४५. दारुची धुंदी किंवा उपद्रव.

१४६. रेल्वे कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात अडथळा आणणे.

१४७. अतिचार व अतिचारापासून परावृत्त होण्यास नकार देणे.

१४८. भरपाईच्या अर्जात खोटे निवेदन केल्याबद्दल शास्ती.

१४९. भरपाईसाठी खोटा दावा करणे.

१५०. गाडीचा दुर्भावपूर्वक नाश करणे किंवा नाश करण्याचा प्रयत्न करणे.

१५१. विवक्षित रेल्वे संपत्तीला नुकसान पोहचवणे किंवा तिचा विनाश करणे.

१५२. रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींना विद्वेषाने दुखापत करणे किंवा दुखापत करण्याचा प्रयत्न करणे.

१५३. हेतुपुरस्सर कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे, रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेस धोका पोचवणे.

१५४. बेदरकार किंवा हयगयीच्या कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेला धोका पोचवणे.

१५५. राखीव डब्यात प्रवेश करणे किंवा राखीव नसलेल्या डब्यात प्रवेश करण्यास प्रतिकार करणे.

१५६. गाडीचे छप्पर (टप), पायरी किंवा इंजिन यावरून प्रवास करणे.

१५७. पास किंवा तिकिट यात फेरबदल करणे किंवा ते विरुपित करणे.

१५८. प्रकरण चौदावे याच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल द्रव्यदंड.

१५९. वाहनचालक किंवा वाहक यांच्याकडून रेल्वे कर्मचारी इत्यादींच्या निदेशांची अवज्ञा.

१६०. रेल्वे ओलांडणीवरील फाटके उघडणे किंवा तोडणे.

१६१. माणूस नियुक्त केलेला नसेल अशी रेल्वे ओलांडणी हयगयीने ओलांडणे.

१६२. महिलांसाठी राखीव डब्यात किंवा इतर जागेत प्रवेश करणे.

१६३. मालाचा खोटा हिशेब देणे.

१६४. घातक माल बेकायदेशीरपणे एखाद्या रेल्वेवर आणणे.

१६५. क्षोभक माल बेकायदेशीरपणे एखाद्या रेल्वेवर आणणे.

१६६. सार्वजनिक नोटीसा विरुपित करणे.

१६७. धुम्रपान.

१६८. रेल्वेवर प्रवास करणाऱ्या व्यक्तींची सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतींच्या स्वरुपात बालकाकडून केल्या जाणाऱ्या अपराधासंबंधातील उपबंध.

१६९. बिनसरकारी रेल्वेवर शास्तीची आकारणी.

१७०. शास्तीची वसुली.

१७१. कलम १६९ किंवा १७० हे, केंद्र शासनाला इतर कोणतीही कारवाई करण्यास प्रतिबाधित करणार नाही.

१७२. नशेबद्दल शास्ती.

१७३. प्राधिकाराशिवाय गाडी, इ. चा परित्याग करणे.

१७४. गाडी इ. चालवण्यात अडथळा आणणे.

१७५. व्यक्तींची सुरक्षितता धोक्यात आणणे.

१७६. रूळ ओलांडण्यांना अडथळा आणणे.

१७७. खोटी विवरणे.

१७८. रेल्वे कर्मचाऱ्याने खोटा अहवाल देणे.

१७९. विवक्षित कलमांखालील अपराधांसाठी अटक.

१८०. फरारी होण्याची शक्यता असलेल्या व्यक्ती इत्यादींना अटक.

१८१. अधिनियमान्वये अधिकारिता असलेला दंडाधिकारी.

१८२. संपरीक्षेचे ठिकाण.

## प्रकरण—सोळावे

### संकिर्ण

१८३. इतर परिवहन सेवांची तरतूद करण्याची शक्ती.

१८४. स्थानिक प्राधिकरणाद्वारे रेल्वेवरील कराधान.

१८५. जाहिरातीसाठी रेल्वेवरील कराधान.

१८६. सद्भावनेने केलेल्या कोणत्याही कारवाईस संरक्षण.

१८७. रेल्वे संपत्तीच्या निष्पादनावर निर्बंध.

१८८. रेल्वे कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ व कलम ४०९ च्या प्रयोजनांसाठी लोकसेवक असणे.

१८९. रेल्वे कमचारी व्यापारात गुंतणार नाही.

१९०. रेल्वे कर्मचाऱ्याने अडकवून ठेवलेली संपत्ती रेल्वे प्रशासनाकडे सुपूर्द करण्याची कार्यपद्धती.

१९१. अभिलेख व दस्तऐवज यांमधील नोंदीचा पुरावा.

१९२. रेल्वे प्रशासनावर नोटीस, इ. ची बजावणी.

१९३. रेल्वे प्रशासनाकडून नोटीस, इ. ची बजावणी.

१९४. नोटीस डाकेने बजावण्यात येईल त्यावेळचे गृहीतक.

१९५. रेल्वे प्रशासनाचे प्रतिनिधित्व.

१९६. रेल्वेला अधिनियमातून सूट देण्याची शक्ती.

१९७. "रेल्वे" व "रेल्वे कर्मचारी" यांच्या व्याख्यांना पूरक बाबी.

१९८. नियम करण्याची सर्वसाधारण शक्ती.

१९९. संसदेपुढे ठेवावयाचे नियम.

२००. निरसन व व्यावृत्ती.

शब्दसूची—

इंग्रजी-मराठी.

मराठी-इंग्रजी

# रेल्वे अधिनियम, १९८९

## (१९८९ चा अधिनियम क्रमांक २४)

(१५ जानेवारी ११९६ रोजी यथाविद्यमान)

[३ जून, १९८९]

रेल्वेशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण व विशोधन करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या चाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण—पहिले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "रेल्वे अधिनियम, १९८९" असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल :

परंतु, या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधाकरिता वेगवेगळे दिनांक नियत करण्यात येतील आणि अशा कोणत्याही उपबंधातील या अधिनियमांच्या प्रारंभासंबंधीच्या कोणत्याही संदर्भाचा अन्वयार्थ, तो उपबंध अंमलात आल्याचा संदर्भ असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, :— व्याख्या.

(१) "प्राधिकृत" याचा अर्थ, रेल्वे प्राधिकरणाने प्राधिकृत केलेले, असा आहे ;

(२) "वहन" याचा अर्थ, रेल्वे प्रशासनाने केलेले प्रवाशांचे अथवा मालाचे वहन, असा आहे ;

(३) "दावे अधिकरण" याचा अर्थ, "रेल्वे दावे न्यायाधिकरण अधिनियम, १९८७" याच्या कलम ३ अनुसार स्थापना केलेले रेल्वे दावे अधिकरण, असा आहे ;

(४) "वर्गीकरण" याचा अर्थ, वस्तूंच्या वहनाकरिता आकारण्यात येणारे दर ठरविण्याच्या प्रयोजनाकरिता कलम ३१ अनुसार केलेले वस्तूंचे वर्गीकरण, असा आहे;

(५) "वर्गदर" याचा अर्थ, वर्गीकरणात वस्तूच्या वर्गाकरिता निश्चित केलेले दर, असा आहे;

(६) "आयुक्त" याचा अर्थ, कलम ५ अनुसार नियुक्त केलेले मुख्य रेल्वे सुरक्षा आयुक्त किंवा रेल्वे सुरक्षा आयुक्त, असा आहे ;

(७) "वस्तू" याचा अर्थ, मालाच्या विनिर्दिष्ट बाबी, असा आहे;

(८) "मालप्रेषिती" याचा अर्थ, रेल्वे पावतीमध्ये, मालप्रेषिती म्हणून नाव दिलेली व्यक्ती, असा आहे ;

(९) "प्रेषित माल" याचा अर्थ, रेल्वे प्रशासनाकडे वहनाकरिता सोपविलेला माल, असा आहे ;

(१०) "मालप्रेषक" याचा अर्थ, जिच्या द्वारे किंवा जिच्या वतीने, रेल्वे पावतीमध्ये समावेश केलेला माल रेल्वे प्रशासनास वहनाकरिता सोपविण्यात आला आहे ती, रेल्वे पावतीमध्ये मालप्रेषक म्हणून नाव दिलेली व्यक्ती, असा आहे ;

(११) "विलंब आकार" याचा अर्थ, मुक्त वेळेच्या समाप्तीनंतर कोणत्याही वहनक्षम मालाच्या अडकवणीसाठी, जर अशा अडकवणीकरिता कोणतीही वेळ अनुज्ञेय असल्यास, ती वेळ संपल्यानंतर, बसवलेला आकार, असा आहे;

(१२) "पृष्ठांकिती" याचा अर्थ, जिच्या बाजूने पृष्ठांकन करण्यात आले आहे ती व्यक्ती, आणि क्रमवर्ती पृष्ठांकनाच्या बाबतीत, जिच्या बाजूने शेवटचे पृष्ठांकन करण्यात आले आहे ती व्यक्ती, असा आहे;

(१३) "पृष्ठांकन" याचा अर्थ, रेल्वे पावतीवर त्या पावतीमध्ये उल्लेखिलेल्या मालातील संपत्ती एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीकडे सोपवण्यासाठी, त्या पावतीवर निदेश दिल्यावर मालप्रेषितीने किंवा पृष्ठांकितीने केलेली सही, असा आहे ;

(१४) "प्रवास भाडे" याचा अर्थ, प्रवाशांच्या वहनाकरिता बसवलेला आकार, असा आहे ;

(१५) "तरउतार" यात, नौकांचा, पाडावांचा किंवा तराफ्यांचा पूल, झुलता पूल, उडता पूल आणि तात्पुरता पूल आणि तरउताराचा प्रवेश मार्ग व त्यातून उतरण्याचे मार्ग यांचा समावेश आहे;

(१६) "अग्रेषण टीप" याचा अर्थ, कलम ६४ अनुसार निष्पादित केलेला दस्तऐवज, असा आहे;

(१७) "वाहणावळ" याचा अर्थ, जर काही वाहनांतरण आकार असेल तर त्यासह, मालाच्या वहनाकरिता वसवलेला आकार, असा आहे;

(१८) "महाव्यवस्थापक" याचा अर्थ, कलम ४ अनुसार नियुक्त केलेल्या क्षेत्रीय रेल्वेचा महाव्यवस्थापक, असा आहे;

(१९) "माल" यात,

(एक) पाले, आवेष्टनासाठी वापरलेले गवत आणि परिवहनाकरिता माल एकत्रित करण्यासाठी वापरलेल्या त्यासारख्या वस्तू;

(दोन) प्राणी;

यांचा समावेश आहे;

(२०) "शासकीय रेल्वे" याचा अर्थ, केंद्र शासनाच्या मालकीची रेल्वे, असा आहे;

(२१) रेल्वेने माल वहन करण्याच्या संबंधात, "मार्गस्थ" याचा अर्थ, अशा मालाच्या मार्गक्रमणाचा प्रारंभ ते समाप्ती यामधील कालावधी, असा आहे आणि अन्यथा पूर्व-निर्धारित केलेले नसल्यास;

(क) रेल्वेची पावती देणे अथवा प्रेषित माल भरणे यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर लगेचच, मार्गक्रमणास प्रारंभ होईल;

(ख) कोणत्याही रुळयानामधून "प्रेषित माल" उतरवण्याकरिता अनुज्ञेय असलेल्या मुक्त वेळाच्या समाप्तीस मालाच्या मार्गक्रमणाचा शेवट होईल आणि जर असे उताराचे काम हे अशा मुक्त वेळाच्या आत झाले असेल तर, माल रेल्वेच्या आवारातून हलविण्याकरिता अनुज्ञेय असलेल्या मुक्त वेळाच्या समाप्तीस मालाच्या मार्गक्रमणाचा शेवट होईल;

(२२) "समतळ ओलांडणी" याचा अर्थ, रेल्वेरुळ आणि रस्ता यांचा समान पातळीवरील परस्पर छेद, असा आहे;

(२३) "सामान" याचा अर्थ, प्रवाशांचा असा माल की जो, एकतर प्रवासी स्वत:च्या प्रभारात वाहतो किंवा वहनाकरिता रेल्वे प्रशासनाकडे सोपवितो, असा आहे;

(२४) "ठोक रकमी दर" याचा अर्थ, रेल्वे प्रशासन आणि मालप्रेषक यांच्या दरम्यान मालाच्या वहनाकरिता आणि अशा वहनाच्या संबंधातील कोणत्याही सेवेकरिता, परस्पर संमतीवर ठरवलेला दर, असा आहे;

(२५) "अशासकीय रेल्वे" याचा अर्थ, शासकीय रेल्वेव्यतिरिक्त इतर रेल्वे, असा आहे;

(२६) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(२७) "पार्सल" याचा अर्थ, रेल्वे प्रशासनाकडे, प्रवासी किंवा पार्सल गाडीने वहनाकरित सोपवलेला माल, असा आहे;

(२८) "पास" याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा रेल्वे प्रशासनाने, एखाद्या व्यक्तीस प्रवासी म्हणून प्रवास करण्यासाठी दिलेले प्राधिकारपत्र, असा आहे, परंतु, यात तिकिटाचा समावेश होत नाही;

(२९) "प्रवासी" याचा अर्थ, वैध पासावर किंवा तिकिटावर प्रवास करणारी व्यक्ती, असा आहे;

(३०) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(३१) "रेल्वे" याचा अर्थ, प्रवासी किंवा मालाच्या सार्वजनिक वहनाकरिता असणारी रेल्वे किंवा रेल्वेचा कोणताही भाग, असा आहे, आणि यात,—

(क) रेल्वेशी अनुलग्न असलेल्या जमिनीच्या सीमा दर्शविणारी कुंपणे किंवा इतर सीमाचिन्हे यांच्या आत असलेली सर्व जमीन,

(ख) रेल्वेच्या प्रयोजनांकरिता किंवा तिच्या संबंधात वापरात असलेले रेल्वेचे सर्व रुळ, कडरुळ किंवा आवार किंवा शाखा,

(ग) रेल्वेच्या प्रयोजनांकरिता किंवा तिच्या संबंधात वापरात असलेली सर्व विद्युत संकर्षण साधनसामुग्री, वीजपुरवठा व वितरण संचमांडणी,

(घ) रेल्वेच्या प्रयोजनांकरिता किंवा तिच्या संबंधात बांधण्यात आलेली सर्व रुळयाने, स्थानके, कार्यालये, वखारी, मालधक्के, कर्मशाळा, निर्माण आगारे स्थिर संयंत्रे व यंत्रे, रस्ते व सडका, चालकवर्ग कक्ष, विश्रामगृहे, संस्था, रुग्णालये, जलव्यवस्था केंद्रे, पाणीपुरवठा संच मांडणी, कर्मचारी निवासगृहे आणि इतर कोणतीही बांधकामे,

(ङ) रेल्वेच्या वाहतुकीच्या प्रयोजनांकरिता कोणत्याही मार्गावर वापरली जाणारी, रेल्वेच्या मालकीची, रेल्वेने भाड्याने घेतलेली किंवा रेल्वेद्वारे चालवण्यात येणारी सर्व वाहने, आणि

(च) रेल्वेच्या वाहतुकीच्या प्रयोजनांकरिता, कोणताही कालवा, नदी, तलाव, किंवा इतर नाव्य आंतरदेशीय जलमार्गात वापरल्या जाणाऱ्या, रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या, भाड्याने घेतलेल्या किंवा चालवल्या जाणाऱ्या तरी, नौका, बोटी आणि तराफे,

यांचा समावेश आहे :

परंतु, यात,

(एक) संपूर्णपणे नगरपालिकेच्या क्षेत्रामधील ट्राम-मार्ग, आणि

(दोन) कोणत्याही प्रदर्शन मैदानात, जत्रेत, उपवनात किंवा इतर कोणत्याही जागेत केव मनोरंजनाच्या प्रयोजनांकरिता टाकलेले रेल्वेचे रूळ, यांचा समावेश होत नाही ;

(३२) "रेल्वे प्रशासन" याचा अर्थ,

(क) "शासकीय" रेल्वेच्या संबंधात, क्षेत्रीय रेल्वेचे महाव्यवस्थापक, आणि

(ख) "अशासकीय" रेल्वेच्या संबंधात, रेल्वेचा मालक किंवा पट्टेदार असलेली व्यक्ती किंवा करारानुसार रेल्वेत काम करणारी व्यक्ती, असा आहे;

(३३) "रेल्वेची पावती" याचा अर्थ, कलम ६५ अनुसार देण्यात आलेली पावती, असा आहे;

(३४) "रेल्वे कर्मचारी" याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा रेल्वे प्रशासनाने रेल्वेच्या सेवेशी संबंधित सेवेसाठी नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(३५) "दर" यामध्ये कोणत्याही प्रवाशाच्या किंवा मालाच्या वहनाकरिता आकारलेले प्रवास-भाडे, आकार किंवा इतर भार याचा समावेश आहे ;

(३६) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये रेल्वे दर न्यायाधिकरणाने तयार केलेले विनियम, असा आहे ;

(३७) "रूळयान (रोलिंग स्टॉक)" यामध्ये रेल्वे इंजिन, पुरवठ्याचा जोड डबा, यान, वाघिणी, रेल्वे डबा, उघड्या वाघिणी, मालमोटारी, ढकलगाड्या आणि रुळावर चालणारी सर्व प्रकारची वाहने यांचा समावेश आहे ;

(३८) "स्थानकापासून स्थानकापर्यंतचा दर" याचा अर्थ, विनिर्दिष्ट स्थानकांदरम्यान नोंदवलेल्या विनिर्दिष्ट मालास लागू होणारा विशेष सवलत दिलेला दर, असा आहे ;

(३९) "वाहतूक" यात, प्रवासी व माल त्याचप्रमाणे सर्व वर्णनाचे रूळयान यांचा समावेश होतो ;

(४०) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम ३३ अन्वये घटित केलेले रेल्वे दर न्यायाधिकरण, असा आहे ;

(४१) "धक्काभाडे" याचा अर्थ, मुक्त वेळाच्या समाप्तीनंतर हा माल हलवला न गेल्यामुळे असा माल हलवण्याकरिता रेल्वेकडून त्यावर बसवलेला आकार, असा आहे ;

(४२) "क्षेत्रीय रेल्वे" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली क्षेत्रीय रेल्वे, असा आहे.

## प्रकरण—दुसरे

## रेल्वे प्रशासन

३. (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, शासकीय रेल्वेच्या कार्यक्षम प्रशासनाच्या प्रयोजनार्थ, अशा रेल्वेमध्ये त्यास योग्य वाटेल इतक्या क्षेत्रीय रेल्वे घटित करील आणि अशा क्षेत्रीय रेल्वेंची नावे व मुख्यालय आणि आपल्या अधिकारितेचा वापर ते ज्या क्षेत्रात करतील ती क्षेत्रे अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील. क्षेत्रीय रेल्वे.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या क्षेत्रीय रेल्वेस, पोटकलम (१) अनुसार घटित केलेली क्षेत्रीय रेल्वे असे मानण्यात येईल.

(३) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, रेल्वेचे संशोधन, विकास, संकल्पन, बांधणी अथवा इंजिनांचे उत्पादन या कामात गुंतलेले युनिट, त्याचा भाग, किंवा रेल्वेवर वापरलेली इतर साधनसामुग्री ही क्षेत्रीय रेल्वे म्हणून घोषित करील.

(४) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, कोणतीही क्षेत्रीय रेल्वे नष्ट करू शकेल किंवा अस्तित्वात असलेल्या क्षेत्रीय रेल्वेतून किंवा रेल्वेमधून नवीन क्षेत्रीय रेल्वे घटित करू शकेल, कोणत्याही क्षेत्रीय रेल्वेचे नाव किंवा मुख्यालय बदलू शकेल किंवा क्षेत्रीय रेल्वे ज्या विभागात आपल्या अधिकारितेची अंमलबजावणी करील ते विभाग ठरवू शकेल.

महाव्यवस्थापकाची नियुक्ती. ४. (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, एका व्यक्तीची क्षेत्रीय रेल्वेचा महाव्यवस्थापक म्हणून नियुक्ती करील.

(२) क्षेत्रीय रेल्वेचे सर्वसाधारण अधीक्षण आणि नियंत्रण हे महाव्यवस्थापकाकडे निहित असेल.

## प्रकरण—तिसरे

## रेल्वे सुरक्षा आयुक्त

मुख्य रेल्वे सुरक्षा आयुक्त व रेल्वे सुरक्षा आयुक्त यांची नियुक्ती. ५. केंद्र शासन, एका व्यक्तीस मुख्य रेल्वे सुरक्षा आयुक्त म्हणून आणि आवश्यक वाटेल अशा इतर व्यक्तींना रेल्वे सुरक्षा आयुक्त म्हणून नियुक्त करील.

आयुक्ताची कर्तव्ये. ६. आयुक्त,—

(क) प्रवाशांचे सार्वजनिक वहन करण्याकरिता, कोणतीही रेल्वे चालू करण्यास योग्य आहे किंवा नाही या दृष्टीने तिचे निरीक्षण करील आणि या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये आवश्यक असलेला अहवाल केंद्र शासनास देईल ;

(ख) केंद्र शासन निदेशित करील अशी, कोणत्याही रेल्वेची किंवा त्यावर वापरलेल्या रुळयान इत्यादींची नियतकालिक किंवा इतर निरीक्षणे करील ;

(ग) रेल्वेशी संबंधित कोणत्याही अपघाताच्या कारणांची या अधिनियमान्वये चौकशी करील ; आणि

(घ) या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये त्याच्याकडे सोपवण्यात येतील अशी, इतर कर्तव्ये पार पाडील.

आयुक्ताच्या शक्ती. ७. जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता तसे करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, आयुक्तास, केंद्र शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने,—

(क) कोणतीही रेल्वे किंवा त्यावर वापरण्यात येणारे कोणताही रुळयान यामध्ये प्रवेश करता येईल आणि त्याचे निरीक्षण करता येईल ;

(ख) रेल्वे प्रशासनास संबोधून दिलेल्या लेखी आदेशाद्वारे, कोणत्याही रेल्वे-सेवकास त्याच्या समोर उपस्थित राहावयास भाग पाडता येईल व त्यास योग्य वाटेल अशा चौकशीला उत्तरे किंवा विवरणे अशा रेल्वे-सेवकांकडून किंवा रेल्वे प्रशासनाकडून मिळवण्यासाठी त्याला भाग पाडता येईल ; आणि

(ग) कोणत्याही रेल्वे प्रशासनाच्या मालकीची किंवा कब्जातील किंवा नियंत्रणात असलेली कोणतीही वही, दस्तऐवज किंवा महत्त्वाची वस्तू-जिचे निरीक्षण करणे त्यास आवश्यक वाटत असेल ती, दाखल करण्यास भाग पाडता येईल.

आयुक्त लोकसेवक असणे. ८. भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मधील अर्थानुसार आयुक्त हा लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

आयुक्तांना देण्यात आलेल्या सवलती. ९. रेल्वे प्रशासन, आयुक्तास, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये, त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्याकरिता किंवा त्याला प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्याकरिता सर्व वाजवी सवलती देईल.

आयुक्तांचे वार्षिक अहवाल. १०. मुख्य रेल्वे सुरक्षा आयुक्त, वार्षिक अहवाल ज्या वर्षासाठी तयार करावयाचा असेल त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील आयुक्तांच्या कार्याची पूर्ण माहिती असणारा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षात तयार करील आणि केंद्र शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेच्या पूर्वी त्याच्या प्रती केंद्र शासनाकडे अग्रेषित करील आणि ते शासन असा अहवाल मिळाल्यानंतर, तो शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण—चौथे

## बांधकाम करणे आणि त्यांचे परिरक्षण

सर्व आवश्यक बांधकामे पार पाडण्याची रेल्वे शासनाची शक्ती. ११. त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी ,परंतु, या अधिनियमाच्या उपबंधाच्या आणि सावजनिक प्रयोजनाकरिता किंवा कंपन्यांकरिता भूमी संपादन करण्याविषयीच्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेन आणि अशासकीय रेल्वेच्या बाबतीतसुद्धा, अशासकीय रेल्वे आणि केंद्र शासन यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही संविदेच्या उपबंधांच्या अधीनतेन एखाद्या रेल्वे प्रशासनास ,एखाद्या रेल्वेच्या बांधकामाकरिता किंवा परिरक्षणाकरिता:—

(क) कोणत्याही जमिनी किंवा कोणतेही रस्ते, टेकड्या, दऱ्या, मार्ग, रेल्वे, ट्राममार्ग किंवा कोणत्याही नद्या, कालवे, ओहळ, झरे किंवा इतर जलाशये किंवा कोणतीही निस्सारणे, पाण्याचे नळ, गॅसपाईप, तेलनलिका, मलप्रणाल, विद्युत पुरवठा मार्ग किंवा तारयंत्र मार्ग यांच्यामध्ये, त्यांच्यावर, त्यांच्यामधून किंवा त्यांच्यावरून रेल्वे प्रशासनाला योग्य वाटतील अशा तात्पुरत्या किंवा कायमच्या कमानी, पूल, बोगदे, नाले, बंधारे, सेतुप्रणाल, मार्ग, लोहमार्ग, वाटा, नलिका, निस्सारणे, धक्के, बोगदे आणि कुंपण, ग्रहणप्रस्तंभ विहिरी, नलिकाकूप, धरणे, नदी नियंत्रणाची व संरक्षणविषयक बांधकामे करता येतील ;

(ख) कोणत्याही नद्या, ओहळ, ओढे किंवा जलप्रवाह यांच्यावर किंवा त्यांच्याखाली बोगदे, नळ, वाटा किंवा इतर बांधकामे बांधण्याच्या आणि त्यांचे परिरक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी त्यांचे प्रवाहमार्ग बदलता येतील किंवा कोणतेही मार्ग, रस्ते किंवा वाटा या रेल्वेच्या वरून किंवा खालून किंवा कडेने, अधिक सोयीस्करपणे नेण्यासाठी, रेल्वे प्रशासनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे तात्पुरत्या तसेच कायमच्यासुद्धा वळवता किंवा बदलता येतील, किंवा त्यांची पातळी वाढवता किंवा कमी करता येईल;

(ग) रेल्वेकडून किंवा रेल्वेकडे पाणी वाहून नेण्याच्या प्रयोजनासाठी रेल्वेलगतच्या कोणत्याही जमिनीमध्ये, जमिनीमधून किंवा जमिनीखाली गटारे किंवा प्रणाल करता येतील ;

(घ) रेल्वे प्रशासनाला योग्य वाटतील अशी घरे, वखारी, कार्यालये आणि इतर इमारती आणि अशी आवारे, स्टेशने, धक्के, इंजिने, यंत्रसामुग्री, उपकरणे आणि इतर बांधकामे व सोयी उभारता आणि बांधता यतील;

(ङ) उपरोक्तप्रमाणे अशा इमारती, बांधकामे आणि सोयी किंवा त्यापैकी काहीही यामध्ये फेरबदल, दुरूस्त्या करता येतील किंवा त्या बंद करता येतील आणि त्यांच्या जागी दुसऱ्या बांधता येतील;

(च) रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित असलेले कोणतेही तार-यंत्र किंवा दुरध्वनी मार्ग उभारणे, चालवणे, त्यांचे परिरक्षण करणे किंवा ते दुरूस्त करणे ;

(छ) रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित असलेली विद्युत संकर्षण उपकरणे, विद्युत पुरवठा आणि वितरण संचमांडणी उभारणे, चालवणे तिचे परिरक्षण करणे किंवा दुरूस्त करणे; आणि

(ज) रेल्वे मार्ग तयार करणे, तो सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार करणे किंवा तो दुरूस्त करणे यासाठी आवश्यक अशी इतर सर्व काय करणे.

**नळ, विद्युत पुरवठा मार्ग, गटारे किंवा मलप्रणाल, इत्यादींच्या स्थितीत फेरफार करण्याची शक्ती.**

१२. (१) एखाद्या रेल्वे प्रशासनाला, या अधिनियमाद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी गॅस, पाणी, तेल किंवा संपीडित हवा यांचा पुरवठा करणाऱ्या कोणत्याही नळाच्या स्थितीत किंवा कोणताही विद्युत पुरवठा मार्ग, गटार किंवा मलप्रणाल यांच्या स्थितीत बदल करता येईल :

परंतु, असा कोणताही नळ, विद्युत पुरवठा मार्ग, गटार किंवा मलप्रणाल यांच्या स्थितीत बदल करण्यापूर्वी, रेल्वे प्रशासन अशा बदलाच्या कामाचा प्रारंभ होण्यापूर्वी त्याची वेळ दर्शविणारी सूचना स्थानिक प्राधिकरणास किंवा नळ, विद्युत पुरवठा मार्ग, गटार किंवा मलप्रणाल यांवर नियंत्रण असणाऱ्या इतर व्यक्तीस देईल.

(२) रेल्वे प्रशासन, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कामाची अंमलबजावणी, पोटकलम (१) च्या परंतुकानुसार देण्यात आलेली सूचना स्वीकारणाऱ्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा व्यक्तीचे वाजवी समाधान होईल अशा प्रकारे करील.

**शासकीय संपत्तीचे संरक्षण.**

१३. कलम ११ व १२ मधील कोणत्याही मजकुरामुळे—

(क) राज्य शासनाकडे निहित असलेली किंवा त्याच्या कब्जात असलेली कोणतीही बांधकामे, जमिनी किंवा इमारती यांवर किंवा त्यांमध्ये, त्या शासनाच्या संमतीशिवाय, कोणतीही गोष्ट करण्याचा प्राधिकार रेल्वे प्रशासनाला मिळणार नाही ; आणि

(ख) केंद्र शासनाकडे किंवा राज्य शासनाकडे निहित असलेली किंवा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कब्जात असलेली कोणतीही बांधकामे, जमिनी किंवा इमारती यांवर किंवा त्यांमध्ये संबंधित शासनाच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्ट करण्याचा प्राधिकार अशासकीय रेल्वे प्रशासनाला मिळणार नाही.

**अडथळे दूर करण्यासाठी, दुरुस्तीसाठी किंवा अपघातास प्रतिबंध करण्यासाठी जमिनीवर तात्पुरता प्रवेश.**

१४. (१) जर रेल्वे प्रशासनाच्या मते,—

(क) कोणतेही झाड, खांब किंवा बांधकाम रेल्वेवर पडल्यास रहदारीच्या जाण्यायेण्यात अडथळा येऊन निकटवर्ती धोका निर्माण होत असेल ; किंवा

(ख) कोणतेही झाड, खांब, बांधकाम किंवा प्रकाश यामुळे रहदारीच्या येण्या-जाण्या साठी व्यवस्था केलेले कोणतेही संकेतचिन्ह दिसण्यास अडथळा होत असेल ; किंवा

(ग) रेल्वे प्रशासनाकडून परिरक्षित केल्या जाणाऱ्या कोणत्याही दूरध्वनी किंवा तारायंत्र मार्गास कोणतेही झाड, खांब किंवा बांधकाम यामुळे अडथळा येत असेल तर,

त्या प्रशासनाला असा धोका टाळण्यासाठी किंवा असा अडथळा दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करता येईल आणि त्याचा अहवाल विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा वेळेच्या आत, केंद्र शासनाला सादर करता येईल.

(२) रेल्वे प्रशासनाच्या मते,—

(क) एखादी गाडी घसरण्याचा किंवा अपघाताचा प्रकार घडलेला असेल ; किंवा

(ख) रेल्वेवरील कोणतेही खोदकाम, बंधारा बांधणे किंवा इतर कोणतेही काम यामुळे घसरणे किंवा अपघात होणार असल्याबद्दल आगाऊ माहिती झाली असेल तर त्या प्रशासनाला अशी घसरण किंवा अपघात टाळण्याकरिता किंवा दुरुस्तीच्या प्रयोजनाकरिता, रेल्वेला लागून असणाऱ्या कोणत्याही जमिनीत प्रवेश करता येईल आणि त्याचा अहवाल विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा वेळेत केंद्र शासनाला सादर करता येईल.

(३) कलम (१) किंवा कलम (२) खाली सादर करण्यात आलेला अहवाल विचारात घेऊन सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने, केंद्र शासनाला, आदेशाद्वारे, रेल्वे प्रशासनास, कलम (१) किंवा कलम (२) खालील पुढील कृती थांबवण्यात यावी असा किंवा त्या आदेशात अशा स्थितीबाबत विनिर्दिष्ट करण्यात येईल तेच करण्यात यावे असा आदेश देता येईल.

नुकसान किंवा हानी याबद्दल रकमेचे प्रदान.

१५. (१) या प्रकरणाच्या कोणत्याही पूर्वगामी उपबंधांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करताना, कोणत्याही नुकसानीच्या किंवा हानीच्या कारणाकरिता कोणतीही रक्कम वसूल करण्यासाठी एखाद्या रेल्वे प्रशासनाविरुद्ध कोणताही दावा लावता येणार नाही.

(२) रेल्वे प्रशासन, या प्रकरणाच्या कोणत्याही पूर्वगामी उपबंधांद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यामुळे, झालेल्या कोणत्याही हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल भरपाई देईल किंवा ती देऊ करील आणि अशाप्रकारे भरपाई दिलेल्या किंवा देऊ केलेल्या कोणत्याही रकमेच्या पुरेपणाबाबत किंवा अशी रक्कम ग्रहण करण्याकरिता हक्कदार असलेल्या व्यक्तींबाबत विवाद निर्माण झाल्यास ते, तो विवाद मिटवण्यासाठी जिल्ह्याच्या जिल्हा न्यायाधीशाकडे त्वरित सोपवील आणि त्याचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल :

परंतु, जर रेल्वे प्रशासन, तंटयाच्या प्रारंभाच्या दिवसापासून साठ दिवसांच्या आत संदर्भ करण्यात चुकेल तर, जिल्हा न्यायाधीशाला, संबंधित व्यक्तीने त्याच्याकडे आवेदन केल्यावर, रेल्वे प्रशासनास, असा तंटा त्याच्या निर्णयाकरिता त्याच्याकडे सोपवण्याचा निदेश देता येईल.

(३) पोटकलम (२) खालील संदर्भ हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या कलम ९६ अनुसार केलेले अपील असल्यासारखा समजण्यात येईल आणि त्यानुसार तो निकालात काढण्यात येईल.

(४) जेव्हा पोटकलम (२) द्वारे आवश्यक असलेली कोणतीही रक्कम भरण्यात आली असेल तेव्हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, रेल्वे प्रशासन, अशाप्रकारे भरपाई केलेल्या कोणत्याही रकमेच्या बाबतीत जी कोणतीही दायित्वे असतील त्या सर्वांपासून कोणत्याही व्यक्तीस मुक्त करील.

सुविधा बांधकामे.

१६. (१) एखादे रेल्वे प्रशासन, रेल्वे मार्गास लागून असलेल्या जमिनीच्या मालकांच्या किंवा भोगवटादारांच्या सोयीकरिता पुढील बांधकामे करील आणि त्यांचे परिरक्षण करील, ती अशी :—

(क) ज्या जमिनींमधून रेल्वे मार्ग काढण्यात आलेला आहे अशा जमिनींचा उपयोग करण्यात त्या रेल्वेमुळे कोणताही व्यत्यय आला असेल तर, त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याच्या, प्रयोजनासाठी राज्य शासनाच्या मते आवश्यक असतील अशा, रेल्वे मार्गाच्यावरून, खालून किंवा रेल्वे मार्गाच्या बाजूने किंवा रेल्वे मार्गाकडे किंवा रेल्वे मार्गाकडून जाणाऱ्या अशा सोयीस्कर ओलांडण्या, पूल, लहान पूल, आणि वाटा ; आणि

(ख) रेल्वे मार्गाच्या जवळ असलेल्या किंवा रेल्वेमुळे परिणाम झालेल्या जमिनीकडून किंवा त्या जमिनीकडे रेल्वे तयार करण्यापूर्वी ज्या मुक्तपणे पाणी वाहत असेल तेवढयाच, किंवा शक्य होईल तितपत जवळपास तेवढयाच मुक्तपणे, सर्वकाळ पाणी वाहण्यासाठी रेल्वे मार्गावरून किंवा खालून किंवा बाजूने, राज्य शासनाच्या मते पुरेसे ठरतील अशा आकाराचे सर्व आवश्यक पूल, बोगदे, लहान पूल, गटारे, जलप्रवाह किंवा इतर वाटा.

(२) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली बांधकामे ही, तो रेल्वेमार्ग टाकण्यात किंवा तयार करण्यात येत असताना किंवा त्यानंतर, लगेच, ज्या जमिनीवर रेल्वेमार्ग टाकला गेला आहे त्या जमिनीवर आणि त्या जमिनीमध्ये हितसंबंध असणाऱ्या किंवा बांधकामामुळे परिणाम होणाऱ्या व्यक्तींचे कमीत कमी नुकसान किंवा गैरसोय होईल अशा रीतीने रेल्वे प्रशासनाच्या खर्चाने करण्यात येईल :

परंतु,—

(क) रेल्वे चालवण्यास किंवा तिच्या वापरास जेणेकरून प्रतिबंध होईल किंवा त्यात अडथळा येईल अशा रीतीने कोणतीही सुविधा बांधकामे करण्यास किंवा, जमिनीच्या मालकांनी किंवा

भोगवटादारांनी असे कोणतेही बांधकाम करण्याची मागणी न केल्याच्या मोबदल्यात त्यांना, ज्या सुविधा कामांच्या संबंधात भरपाई देण्यात आली आहे अशी, कोणतीही सुविधा बांधकामे करण्यास, एखाद्या रेल्वे प्रशासनाला भाग पाडण्यात येणार नाही ;

(ख) या प्रकरणामध्ये यापुढे तरतुद करण्यात आली असेल ते खेरीज करून, एखाद्या जमिनीमधून जाणारी रेल्वे ज्या तारखेला सार्वजनिक वाहतुकीसाठी प्रथम खुली करण्यात आली असेल, त्या तारखेपासून दहा वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर, त्या जमिनीच्या मालकांच्या किंवा भोगवटा-दारांच्या उपयोगासाठी कोणतीही जास्तीची किंवा अतिरिक्त सुविधा बांधकामे निष्पादित करण्यास कोणत्याही रेल्वे प्रशासनाला भाग पाडण्यात येणार नाही ;

(ग) ज्यावेळी एखादा मार्ग किंवा ओढा ओलांडण्यासाठी एखाद्या रेल्वे प्रशासनाने योग्य अशी सुविधा पुरवली असेल आणि त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीच्या कृतीमुळे किंवा हयगयीमुळे तो मार्ग किंवा ओढा नंतर वळवला गेला असेल त्यावेळी, तो मार्ग किंवा ओढा यांना ओलांडण्या-साठी इतर सुविधा करून देण्यास रेल्वे प्रशासनाला भाग पाडण्यात येणार नाही.

(३) राज्य शासन, पोटकलम (१) अनुसार करावयाच्या कोणत्याही कामाच्या प्रारंभाकरिता तारीख विनिर्दिष्ट करू शकेल आणि जर त्या तारखेनंतर तीन महिन्यांत, रेल्वे प्रशासन, अशा कामास प्रारंभ करण्यात चुकेल किंवा कामास प्रारंभ केला असून, त्याच्या कार्यवाहीची अंमलबजावणी तत्परतेने, करण्यात चुकेल तर, केंद्र शासन, राज्य शासनाने अशी चूक केंद्र शासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्या शासनास योग्य वाटेल असे निदेश रेल्वे प्रशासनास देईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांकरिता "जमिनी" या शब्दप्रयोगात, सार्वजनिक रस्त्यांचा समावेश होईल.

**अतिरिक्त सुविधा बांधकामांची व्यवस्था करण्याची मालक, भोगवटादार यांची किंवा स्थानिक प्राधिकरणाची शक्ती.**

१७. (१) एखाद्या रेल्वेमार्गामुळे परिणाम झालेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला जर असे वाटले की, कलम १६ द्वारे करण्यात आलेली बांधकामे ही त्या जमिनीच्या सोयीस्कर वापरासाठी अपुरी आहेत तर, किंवा एखाद्या रेल्वे मार्गामधून, त्या खालून किंवा वरून एखादा सार्वजनिक रस्ता किंवा इतर बांधकाम करण्याची राज्य शासनाची किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाची इच्छा असेल तर, अशा मालकाला किंवा भोगवटादाराला किंवा राज्य शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाला कोणत्याही वेळी रेल्वे प्रशासनास आवश्यक वाटतील आणि रेल्वे प्रशासन सहमत होईल अशी पुढील सुविधा बांधकामे मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाच्या खर्चाने करण्याबद्दल रेल्वे प्रशासनाला फर्मावता येईल.

(२) पोटकलम (१) अनुसार केलेल्या सुविधा बांधकामाचे परिरक्षण, ज्यांच्या विनंतीवरून बांधकाम करण्यात आले, अशा जमिनीच्या मालकाच्या किंवा भोगवटादारांच्या, राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या खर्चाने, करण्यात येईल.

(३) रेल्वे प्रशासन आणि मालक किंवा भोगवटादार, राज्य शासन किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरण यांच्यात,—

(एक) अशा आणखी सुविधा बांधकामांची आवश्यकता ;

(दोन) अशा आणखी सुविधा बांधकामावरील खर्च करणे ;

(तीन) अशा आणखी सुविधा बांधकामांच्या परिरक्षणावरील खर्चाचे ठरीव प्रमाण

यासंबंधात कोणतेही मतभेद असतील तर, अशा बाबी केंद्र शासनाकडे निर्देशित करण्यात येतील आणि केंद्र शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**कुंपणे, दरवाजे आणि अडणे.**

१८. केंद्र शासन, ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत किंवा ते देईल अशा आणखी मुदतीच्या आत,—

(क) रेल्वे प्रशासनाने रेल्वेसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी आणि तिच्या संबंधात बांधलेल्या रस्त्यांसाठी सीमाचिन्हे किंवा कुंपणे यांची सोय करण्यास किंवा त्यांचे नवीकरण करण्यास;

(ख) रेल्वे ओलांडणीच्या जागी, रेल्वे प्रशासनाने, सुयोग्य दरवाजे, साखळ्या, अडणे पायऱ्या किंवा कठडे उभारण्यास किंवा त्यांचे नवीकरण करण्यास ;

(ग) दरवाजे, साखळ्या किंवा अडणे उघडण्याकरिता किंवा बंद करण्याकरिता रेल्वे प्रशासनाने व्यक्तींना कामावर लावण्यास;

फर्मावू शकेल.

**वरपूल व खालपूल.**

१९. (१) जेव्हा रेल्वे प्रशासनाने एखाद्या सार्वजनिक रस्त्याला छेदून जाणारा लोहमार्ग सम पातळीवरून टाकला असेल तेव्हा, त्या रस्त्याचे परिरक्षण करणाऱ्या राज्य शासनाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला कोणत्याही वेळी, सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने, समपातळीत रस्ता ओलांडण्याऐवजी, सोयीस्कर चढ आणि उतार आणि इतर सोयीस्कर पोचमार्ग असलेले, एकतर रेल्वेच्या खालून किंवा वरून जाणारे पूल किंवा कमानी बांधून त्याद्वारे रस्ता पुढे नेण्यास किंवा प्रकरणाच्या परिस्थितीनुसार, समपातळी रेल्वे ओलांडणीमधून उद्भवणारा धोका दूर करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी रस्त्याचे परिरक्षण करणाऱ्या राज्य शासनाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला जास्तीत जास्त अनुकूल अशी जी इतर बांधकामे वाटतील ती बांधकामे पार पाडण्यास, रेल्वे प्रशासनास फर्मावता येईल.

(२) रेल्वे प्रशासन, राज्य शासनास किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणास, पोट कलम (१) खालील कोणत्याही कामाच्या अंमलबजावणीची एक शर्त म्हणून त्या कामाचा संपूर्ण खर्च आणि त्या कामाच्या परिरक्षणाचा खर्च किंवा केंद्र शासनास, न्याय्य व योग्य वाटेल तितका त्याचा काही भाग रेल्वे प्रशासनास भरण्याची हमी देण्याबाबत फर्मावता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही बाबींवर, रेल्वे प्रशासन आणि राज्य शासन, किंवा प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरण यांच्यात कोणताही मतभेद असेल त्याबाबतीत, ती बाब केंद्र शासनाकडे निर्देशित करण्यात येईल, आणि त्याचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल.

*केंद्र शासनाची सुरक्षिततेकरिता निदेश देण्याची शक्ती.*

२०. इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासनाचे जेव्हा हाती घेण्यात आलेल्या किंवा हाती घेण्यात येईल अशा कोणत्याही कामाबद्दल असे मत असेल की, त्या कामामुळे, पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात फेरफार होण्याचा किंवा त्यात व्यत्यय येण्याचा किंवा अशा प्रवाहाच्या आकारमानातील वाढीमुळे रेल्वेचे कोणतेही खनन, बंधारा किंवा इतर कोणतेही बांधकाम यास धोका पोहोचण्याचा संभव आहे तेव्हा, केंद्र शासनाला अशा बांधकामास जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अधिकाऱ्यांस किंवा प्राधिकरणास असे काम बंद करण्याचा, त्याचे विनियमन करण्याचा किंवा प्रतिषेध करण्याचा लेखी निदेश देता येईल.

## प्रकरण पाचवे

## रेल्वे चालू करणे

*रेल्वे चालू करण्यास केंद्र शासनाची मंजुरी.*

२१. उतारूंच्या सार्वजनिक नेआणीसाठी एखादी रेल्वे चालू करण्यास केंद्र शासनाने, आदेशाद्वारे मंजुरी देईपर्यंत त्या प्रयोजनासाठी, ती चालू करण्यात येणार नाही.

*रेल्वे चालू करण्यास मंजुरी देण्यापूर्वी औपचारिक गोष्टींचे अनुपालन करणे.*

२२. (१) केंद्र शासन, कलम २१ अनुसार रेल्वे चालू करण्यास त्याची मंजुरी देण्यापूर्वी, आयुक्ताकडून पुढील अहवाल मिळवील ते म्हणजे, :—

(क) त्याने त्या रेल्वेमार्गाचे आणि त्यावर वापरण्यात येईल अशा रूळमानाचे काळजी-पूर्वक निरीक्षण केलेले आहे ;

(ख) केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या बदलत्या व ठराविक आकारमानांचे उल्लंघन करण्यात आलेले नाही ;

(ग) रेल्वेमार्ग संरचना, पुलाची मजबुती, बांधकामांचे सर्वसाधारण संरचनात्मक स्वरूप आणि कोणत्याही रूळमानाच्या अक्षदंडाचे आकारमान व त्यावरील एकूण कमाल भार याबाबत केंद्र शासनाने घालून दिलेल्या आवश्यकतांचे पालन केलेले आहे ; आणि

(घ) त्याच्या मते, रेल्वेचा वापर करत असलेल्या लोकांना कोणताही धोका पोचणार नाही अशा प्रकारे प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता ती चालू करणे शक्य आहे.

(२) जर आयुक्ताचे असे मत असेल की, रेल्वेचा वापर करणाऱ्या जनतेला कोणताही धोका न पोचता ती चालू करणे अशक्य आहे तर, केंद्र शासनाने मंजुरी देण्यापूर्वी, तो आपल्या अहवालात त्याबद्दलची कारणे तसेच ज्यांचे पालन करावयाचे असेल त्या आवश्यक गोष्टी नमूद करील.

(३) केंद्र शासन, आयुक्ताच्या अहवालावर विचार केल्यानंतर रेल्वे ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत किंवा सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याला आवश्यक वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने रेल्वे चालू करण्यास कलम २१ अन्वये मंजुरी देऊ शकेल.

*विवक्षित बांधकामे चालू करण्यास कलमे २१ व २२ लागू असणे.*

२३. कलमे २१ व २२ चे उपबंध, जर प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता वापरल्या जाणाऱ्या आणि कलम २२ खाली आयुक्तांनी अहवाल दिल्यानंतर, बांधण्यात आलेल्या रेल्वेचा भाग बनणाऱ्या किंवा तिच्याशी प्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या खालील बांधकामांना लागू होतील :—

(क) अतिरिक्त लोहमार्ग व आडवळणी लोहमार्ग चालू करणे ;

(ख) स्थानके, संगमस्थानके आणि रेल्वे ओलांडणी चालू करणे ;

(ग) आवारांची पुनर्रचना करणे आणि पुलांची पुनर्बांधणी करणे ;

(घ) विद्युत कर्षण चालू करणे ; आणि

(ङ) ज्यास कलमे २१ व २२ चे उपबंध लागू असतील किंवा या कलमाद्वारे विस्तारित करण्यात आले असतील अशा कोणत्याही बांधकामाच्या संरचनात्मक स्वरूपात मुख्यत: बाधा पोहोचवणारा असा कोणताही फेरफार किंवा पुनर्बांधणी करणे.

*वाहतुकीतील तात्पुरता खोळंबा.*

२४. जेव्हा एखाद्या रेल्वेवरील एखाद्या अपघातामुळे वाहतुकीत तात्पुरता खोळंबा आला असेल, आणि एकतर मूळ लोहमार्ग आणि बांधकामे त्यांच्या मूळ प्रमाणात प्रत्यास्थापित करण्यात आली असतील किंवा दळणवळणाच्या प्रत्यास्थापनेच्या प्रयोजनाकरिता अस्थायी स्वरूपाचे दिशाबदल चालू करण्यात आलेले असतील तेव्हा, अशा प्रकारे प्रत्यास्थापित केलेले मूळचे लोहमार्ग किंवा प्रकरणपरत्वे, अस्थायी स्वरूपाचे दिशाबदल हे पुढील शर्तींच्या अधीनतेने आयुक्तांच्या पूर्व निरीक्षणाखेरीज, प्रवाशांच्या सार्वजनिक

वहनाकरिता चालू करता येतील, त्या शर्ती अशा :—

(क) अपघातामुळे हाती घेण्यात आलेल्या कामाच्या प्रभारी रेल्वे सेवकाने, प्रत्यस्थापित लोहमार्ग आणि बांधकामे चालू करण्याविषयी लेखी प्रमाणित केलेले आहे. किंवा, त्याच्या मते अस्थायी स्वरुपाच्या कोणत्याही दिशाबदलामुळे जनतेला कोणताही धोका निर्माण होणार नसेल ; आणि

(ख) लोहमार्ग आणि बांधकामे चालू करण्याविषयीची किंवा दिशाबदलाची सूचना आयुक्तांस त्वरित पाठविण्यात येईल.

**प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता चालू केलेली रेल्वे बंद करण्याविषयीची शक्ती.**

२५. जेव्हा प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता वापरलेल्या आणि चालू केलेल्या कोणत्याही रेल्वेचे किंवा त्यावर वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही रुळयानाचे निरीक्षण केल्यानंतर, आयुक्ताचे असे मत झाले असेल की, रेल्वेच्या किंवा रुळयानाच्या वापरामुळे, वापर करत असलेल्या जनतेला धोका निर्माण होईल, तेव्हा, आयुक्त, केंद्र शासनास अहवाल पाठवील, केंद्र शासनास त्यानंतर असे निदेशित करता येईल की,—

(एक) प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता रेल्वे बंद करण्यात यावी ; किंवा

(दोन) रुळयानाचा वापर करणे बंद करण्यात यावे ; किंवा

(तीन) रेल्वे किंवा रुळयान प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता, जनतेच्या सुरक्षिततेसाठी त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने वापरण्यात यावा.

**बंद केलेली रेल्वे पुन्हा चालू करणे.**

२६. जेव्हा कलम २५ अनुसार, केंद्र शासन रेल्वे किंवा रुळयानाचा वापर बंद करण्याबाबत निदेश देईल तेव्हा,—

(क) आयुक्ताने निरीक्षण केल्याखेरीज आणि त्याने या प्रकरणाच्या उपबंधांनुसार पुन्हा चालू करण्यास मंजुरी दिल्याखेरीज, प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता, रेल्वे पुन्हा चालू केली जाणार नाही ; आणि

(ख) आयुक्ताने निरीक्षण केल्याखेरीज आणि या प्रकरणाच्या उपबंधांनुसार त्याने ते पुन्हा वापरात आणण्याची मंजुरी दिल्याखेरीज रुळयाने वापरात आणली जाणार नाहीत.

**रुळयानाचा वापर.**

२७. रेल्वे प्रशासन, एखाद्या रेल्वेच्या बांधणीकरिता, ती चालवण्याकरिता आणि तिच्या कामकाजाकरिता, जी आवश्यक वाटेल अशा रुळयानाचा वापर करु शकेल :

परंतु, रेल्वेच्या कोणत्याही विभागात अगोदरच चालू असलेल्या रुळयाने पेक्षा वेगळ्या आकाराचे किंवा वेगळ्या प्रकारचे रुळयान वापरात आणण्यापूर्वी, अशा वापराकरिता, केंद्र शासनाची पूर्वमंजुरी मिळवण्यात येईल.

**शक्तीचे प्रत्यायोजन.**

२८. केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे असे निदेश देऊ शकेल की, कलम २९ वगळून या प्रकरणाखालील किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांखालील त्याच्या कोणत्याही शक्तींचा वापर किंवा कामे पार पाडणे या गोष्टी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा बाबींच्या संबंधात आणि कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्तींच्या अधीनतेने, आयुक्तालाही करता येतील.

**याप्रकरणातील बाबींच्यासंबंधात नियम करण्याची शक्ती.**

२९. (१) केंद्र शासन, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, अधिसूचनेद्वारे, नियम करु शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस हानी न पोहोचवता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता रेल्वे चालू करण्यासंबंधी रेल्वे प्रशासन आणि आयुक्त यांची कर्तव्ये ;

(ख) प्रवाशांच्या सार्वजनिक वहनाकरिता रेल्वे चालू करण्यापूर्वी, करावयाची व्यवस्था आणि पाळावयाच्या औपचारिक गोष्टी ;

(ग) रेल्वेवर वापरावयाचे रुळयान ज्या रीतीने व ज्या वेगाने हलवावयाचे किंवा ढकलावयाचे ती रीत व तो वेग यांचे विनियमन करणे ; आणि

(घ) या प्रकरणात उपबंधित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीशिवाय ज्या प्रकरणात व ज्या मर्यादांपर्यंत चालवून घ्यावयाचे ती प्रकरणे व त्या मर्यादा.

## प्रकरण सहावे

### दरांची निश्चिती

**दर निश्चित करण्याची शक्ती.**

३०. (१) केंद्र शासन, वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्रवाशांच्या किंवा मालाच्या वहनाकरिता, संपूर्ण रेल्वेसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी दर निश्चित करील आणि मालाच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता वेगवेगळे दर निश्चित करण्यात येतील आणि असे दर ज्या शर्तींच्या अधीनतेने लागू करण्यात येतील त्या शर्ती अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील.

(२) केंद्र शासन, तसाच एका आदेशाद्वारे, रेल्वेच्या संपूर्ण किंवा कोणत्याही भागासाठी विलंब आकार आणि धक्काभाडे यासहित अशा वहनाशी संबंधित किंवा त्याच्याशी आनुषंगिक अशा इतर कोणत्याही आकाराचे दर निश्चित करील आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने असे दर लागू करण्यात येतील त्या शर्ती अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील.

**वस्तूंचे वर्गीकरण करण्याची किंवा दरात फेरबदल करण्याची शक्ती.**

३१. केंद्र शासनास पुढील बाबतीत शक्ती असतील---

(क्) वस्तूंच्या वहनाकरिता आकारण्यात येणारा दर निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा कोणत्याही वस्तूंचे वर्गीकरण किंवा पुनर्वर्गीकरण करणे ; आणि

(ख्) वर्ग दर आणि इतर आकार यांत वाढ करणे किंवा ते कमी करणे.

**विवक्षित दर आकारण्याची रेल्वे प्रशासनाची शक्ती.**

३२. या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, रेल्वे प्रशासनास, कोणत्याही वस्तूच्या वहनाच्या बाबतीत आणि विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शक्तीच्या अधीनतेने,---

(क्) दोन स्थानकांमधील दर उद्धृत करता येतील ;

(ख्) केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या रीतीने योग्य ती सूचना दिल्यानंतर (दोन स्थानकांमधील) दर वाढवता येईल किंवा कमी करता येईल किंवा तो रद्द करता येईल. मात्र, न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाच्या अनुपालनार्थ, सुरु केलेल्या दोन स्थानकांमधील दराचा यात समावेश नाही ;

(ग्) न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाच्या अनुपालनार्थ, घातलेल्या शर्तीखेरीज, दोन स्थानकांमधील दराशी संलग्न अशा इतर शर्ती मागे घेता येतील, त्यात फेरबदल करता येतील किंवा त्यात सुधारणा करता येतील ; आणि

(घ्) कोणतेही ठोक रकमी दर आकारता येतील.

## प्रकरण सातवे

### रेल्वे दर अधिकरण

**रेल्वे दर अधिकरणाची घटना.**

३३. (१) या प्रकरणात विनिर्दिष्ट करण्यात आलेली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता, रेल्वे दर अधिकरण या नावाचे एक अधिकरण असेल.

(२) या अधिकरणात, केंद्र शासनाने नियुक्ती करावयाचा एक अध्यक्ष आणि दोन अन्य सदस्य यांचा समावेश असेल.

(३) एखादी व्यक्ती, ती सर्वोच्च न्यायालयाची किंवा उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होती असे असल्याखेरीज, अधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली जाण्यास अर्ह होणार नाही, आणि अधिकरणाच्या दोन अन्य सदस्यांपैकी एक सदस्य हा, केंद्र शासनाच्या मते, देशाच्या वाणिज्यिक, औद्योगिक किंवा आर्थिक स्थितीचे जिला विशेष ज्ञान आहे अशी व्यक्ती असेल आणि दुसरा सदस्य हा, केंद्र शासनाच्या मते, जिला रेल्वेच्या वाणिज्यिक चालनाचे विशेष ज्ञान व अनुभव आहे अशी व्यक्ती असेल.

(४) अधिकरणाचे अध्यक्ष आणि इतर सदस्य विहित करण्यात येईल अशा पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता पद धारण करतील.

(५) अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य, विकलतेमुळे किंवा अन्य कारणांमुळे स्वत:ची कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल किंवा ज्या परिस्थितीत त्याचे पद रिक्त होण्याचा अंतर्भाव नसेल अशा परिस्थितीत रजेमुळे किंवा अन्यप्रकारे, अनुपस्थित असेल तर, केंद्र शासनाला त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या जागी काम करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

(६) अधिकरणाचा अध्यक्ष म्हणून किंवा इतर सदस्य म्हणून जी पद धारण करील अशी व्यक्ती, (नैमित्तिक रिक्त पद भरावयाचे पद नसेल अशा) तिच्या पदाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, त्या कार्यालयात पुर्नानियुक्त होण्यास अपात्र असेल.

(७) पोट-कलमे (५) व (६) च्या उपबंधांच्या अधीनतेने अधिकरणाचा अध्यक्ष आणि इतर सदस्य विहित करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर पद धारण करतील.

(८) अधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही---

(क्) अधिकरणामध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्याच्या घटनेत कोणताही दोष आहे ; किंवा

(ख्) अधिकरणाचा एखादा अध्यक्ष म्हणून किंवा कोणताही सदस्य म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीत कोणताही दोष आहे,

केवळ याच कारणामुळे अवैध असल्याचे मानता येणार नाही.

३४. (१) अधिकरण, केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेने, या प्रकरणाखालील त्याची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता, त्यास आवश्यक वाटेल असे अधिकारी व कामगार यांची नियुक्ती करील. अधिकरणाचा कर्मचारीवर्ग.

(२) अधिकरणाचे अधिकारी आणि कामगार यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विनियमाद्वारे ठरविण्यात येतील अशा असतील.

३५. अधिकरण, त्याचे कामकाज चालविण्याकरिता त्यास सोयीस्कर वाटेल अशा जागी किंवा जागांवर बैठक भरवू शकेल. अधिकरणाच्या बैठकी.

३६. एखादे रेल्वे प्रशासन,— एखाद्या रेल्वे प्रशासना विरुद्ध तक्रारी.

(क) कलम ७० च्या उपबंधाचे उल्लंघन करीत आहे; किंवा

(ख) कोणत्याही वस्तूच्या दोन स्थानकांमधील वहनाकरिता, जे अवाजवी आहेत असे दर आकारीत आहे; किंवा

(ग) जे अवाजवी आहेत असे इतर कोणतेही आकार बसवत आहे, अशी कोणतीही तक्रार, अधिकरणाकडे करता येईल, आणि ते अधिकरण त्याची सुनावणी करील व प्रकरणातील उपबंधांनुसार अशा कोणत्याही तक्रारींवर निर्णय देईल.

३७. या प्रकरणामधील कोणत्याही गोष्टीमुळे, खालील बाबींच्या संबंधात, अधिकरणास अधिकारिता प्रदान केली जाणार नाही :— अधिकरणाच्या अधिकारिता नसतील अशा बाबी.

(क) कोणत्याही वस्तूचे वर्गीकरण किंवा पुनर्वर्गीकरण ;

(ख) धक्काभाडे व विलंबआकार निश्चित करणे (अशा आकारांशी संलग्न असतील अशा शर्तींसह) ;

(ग) प्रवाशांच्या वहनाकरिता बसवावयाचे भाडे आणि सामानांच्या, पार्सलांच्या रेल्वे साहित्याच्या व सैनिकी वाहतुकीच्या वहनाकरिता बसवावयाचे वाहतूक आकार निश्चित करणे; आणि

(घ) ठोक रकमी दर निश्चित करणे.

३८. (१) शपथेवर साक्ष घेणे, साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवजांच्या प्रकटीकरणाची व ते दाखल करण्याची सक्ती करणे, साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे या प्रयोजनांसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) खाली दिवाणी न्यायालयाला ज्या शक्ती असतील त्या शक्ती आणि पुनर्विलोकनाची शक्ती अधिकरणास असेल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम १९५ आणि प्रकरण पस्तीस यांच्या सर्व प्रयोजनांसाठी, ते एक दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि अशा कलमातील किंवा प्रकरणातील एखाद्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्यांसंबंधीच्या कोणत्याही निदेशात, या न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्यांसंबंधीचे निदेशही अंतर्भूत असल्याचे मानण्यात येईल. अधिकरणाच्या शक्ती.

(२) अधिकरणास, खर्च भरण्यासंबंधीच्या आदेशांसह, परिस्थितीनुरूप आवश्यक असतील असे अंतरिम व अंतिम आदेश संमत करण्याच्या शक्तीसुद्धा असतील.

३९. कलम ३७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासनास, त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींचा निर्देश अधिकरणाकडे करता येईल आणि जर अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणताही निर्देश करण्यात आला असेल त्याबाबतीत, अधिकरण त्या बाबीची चौकशी करील व त्यावरील त्याचा अहवाल केंद्र शासनास सादर करील. अधिकरणाकडे निर्देश करणे.

४०. (१) केंद्र शासन अधिकरणास आवश्यक वाटेल असे सहाय्य करील आणि अधिकरणापुढील कोणत्याही बाबीशी जो संबद्ध आहे असे केंद्र शासनास वाटत असेल अशी, त्या शासनाच्या अखत्यारीतील कोणतीही माहिती, अधिकरणास पुरवील. केंद्र शासनाने सहाय्य करणे.

(२) केंद्र शासनाने या बाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, अधिकरणासमोरील कोणत्याही कार्यवाहीस उपस्थित राहण्यास व आपले म्हणणे मांडण्यास हक्कदार असेल.

४१. कलम ३६ च्या खंड (क) खालील कोणत्याही तक्रारीच्या बाबतीत,— पुराव्याचा भार, इत्यादी.

(क) जर असे दाखवून देण्यात आले असेल की, एखादे रेल्वे प्रशासन, एखाद्या व्यापाऱ्यास किंवा व्यापाऱ्यांच्या वर्गास किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील व्यापाऱ्यांना, कोणत्याही इतर स्थानिक क्षेत्रातील इतर व्यापाऱ्यांना ते आकारीत आहे त्यापेक्षा कमी दर त्याच किंवा तशाच मालासाठी आकारीत आहे किंवा त्याच किंवा तशाच सेवेसाठी कमी आकार लावीत आहे तर, असे कमी दर किंवा आकार हे गैर वाजवी अधिमान्यतेत मोडत नाहीत हे शाबीत करण्याचा भार, रेल्वे प्रशासनावर असेल ;

(ख्) एखादा कमी दर किंवा आकार गैर वाजवी पसंतीक्रमात मोडत नाही हे ठरवताना, अधिकरण, प्रकरणावर परिणाम करणाऱ्या इतर कोणत्याही गोष्टीबरोबर असा कमी दर किंवा आकार हा सार्वजनिक हितार्थ आवश्यक आहे किंवा कसे, हेही विचारात घेईल.

अधिकरणाचे निर्णय इत्यादी. ४२. अधिकरणाचे निर्णय किंवा आदेश विद्यमान सदस्यांच्या बहुमताने घेण्यात येतील व ते अंतिम असतील.

न्यायालयांच्या अधिकारितेस प्रतिबंध. ४३. या प्रकरणाखाली, अधिकरणास कार्यवाही करण्यास किंवा निर्णय देण्यास अधिकार देण्यात आले आहेत अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात, कोणताही दावा दाखल करून घेतला जाणार नाही किंवा त्यावर कार्यवाही केली जाणार नाही.

अधिकरण मंजूर करू शकेल असे अनुतोष. ४४. कलम ३६ च्या खंड (ख्) किंवा खंड (ग्) खाली कोणतीही तक्रार करण्यात आली असेल त्याबाबतीत, अधिकरणास,—

(एक) तक्रार दाखल करून घेण्याच्या दिवसापूर्वीची नसेल अशा, त्यास योग्य वाटेल त्या कोणत्याही तारखेपासून, त्यास वाजवी वाटेल असा दर किंवा आकार निश्चित करता येईल;

(दोन) अधिकरणाने जर, खंड (एक) अनुसार जास्तीचा आहे असा काही दर किंवा आकार निश्चित केला असेल तर, ती रक्कम परत करण्याचा निदेश देऊ शकेल.

अधिकरणाने दिलेल्या निर्णयांचे पुनरीक्षण. ४५. जर रेल्वे प्रशासनास असे वाटले की, अधिकरणाने दिलेल्या निर्णयाच्या तारखेपासून, तो जिच्या आधारावर देण्यात आला त्या परिस्थितीत काही महत्वाचा बदल झाला आहे तर, ते, अशा दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, अधिकरणास आवेदनपत्र सादर करू शकेल आणि अधिकरण, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, निर्णय बदलू शकेल किंवा प्रत्याहृत करू शकेल.

अधिकरणाच्या निर्णयांची किंवा आदेशांची अंमलबजावणी. ४६. अधिकरण, त्याच्याकडून घेण्यात आलेले कोणतेही निर्णय किंवा दिलेले कोणतेही आदेश, स्थानिक अधिकारिता धारण करणाऱ्या दिवाणी न्यायालयाकडे पाठवू शकेल आणि असे दिवाणी न्यायालय, तो निर्णय किंवा आदेश, त्या न्यायालयाने काढलेला हुकूमनामाच होता अशाप्रकारे त्याची अंमलबजावणी करील.

केंद्र शासनास अहवाल सादर करणे. ४७. अधिकरण, केंद्र शासनास, या प्रकरणाखालील त्याच्या सर्व कार्यवाहींचा एक वार्षिक अहवाल सादर करील.

अधिकरणाची विनियम करण्याची शक्ती. ४८. (१) अधिकरणास, केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने, या प्रकरणाखालील त्याची कार्ये परिणामकारकरीत्या पार पाडण्याकरिता, त्याची कार्यपद्धती सर्वसाधारणपणे विनियमित करण्यासाठी या अधिनियमाशी व नियमांशी सुसंगत असे विनियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा विनियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येतील; त्या बाबी पुढीलप्रमाणे :—

(क्) अधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या व कामगारांच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(ख्) अधिकरणाने त्याच्या समोरील कोणत्याही कार्यवाहीत खर्चाचा निवाडा देणे;

(ग्) स्थानिक चौकशी केल्यानंतर अहवालाकरिता अधिकरणाच्या सदस्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे किंवा अधिकरणाने नियुक्त केलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीकडे कोणताही प्रश्न निर्देशित करणे;

(घ्) अधिकरणासमोर बाजू मांडण्याचा अधिकार, मात्र, कोणताही पक्षकार व्यक्तिशः किंवा लेखी रीतसर प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा विधि व्यवसायीमार्फत आपले म्हणणे मांडण्यास हक्कदार असेल तरच;

(ङ्) कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात, बैठकीला सदस्य म्हणून हजर राहणाऱ्या व्यक्तींमध्ये बदल करण्यात आला असला तरीही, अधिकरणाने त्याच्यासमोरील ती कार्यवाही निकालात काढणे;

(च्) अधिकरणासमोरील कार्यवाहीकरिता व तिच्याशी संबंधित फीचे प्रमाण.

## प्रकरण आठवे

### प्रवाशांचे वहन

स्थानकावर (गाड्यांच्या) विवक्षित वेळा व भाड्याचा तक्ता प्रदर्शित करणे. ४९. (१) प्रत्येक रेल्वे प्रशासन, प्रत्येक स्थानकावर, प्रवेश करता येईल अशा व ठळक ठिकाणी हिंदी आणि इंग्रजी भाषेत, आणि स्थानक ज्या क्षेत्रात स्थित असेल त्या क्षेत्रात सामान्यत: वापरात असलेल्या भाषेत,—

(एक) प्रवाशांचे वहन करणाऱ्या व त्या स्थानकावर थांबणाऱ्या गाड्यांचे आगमन व प्रस्थान यांच्या वेळांचा तक्ता ; आणि

(दोन) त्या स्थानकापासून, प्रशासनास आवश्यक वाटेल अशा इतर कोणत्याही स्थानकापर्यंतच्या भाडेदराची सूची चिकटवण्याची व्यवस्था करील.

(२) प्रवाशांना जेथे तिकिटे देण्यात येतात अशा प्रत्येक स्थानकावर अंमलात असलेल्या वेळापत्रकाची एक प्रत स्थानक अधिकाऱ्यांच्या (स्टेशन मास्टर) कार्यालयात ठेवण्यात येईल.

भाड्याच्या पूर्ततेनंतर तिकिटे पुरवणे.

५०. (१) रेल्वेतून प्रवास करण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, भाड्याच्या पूर्ततेनंतर रेल्वे कर्मचाऱ्यांकडून किंवा याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या एजंटाकडून तिकीट पुरवण्यात येईल आणि अशा तिकिटात पुढील तपशिलाचा समावेश असेल, तो, असा,—

(एक) तिकीट दिल्याची तारीख ;

(दोन) वहनाचा वर्ग ;

(तीन) ज्या ठिकाणापासून व ज्या ठिकाणापर्यंत ते देण्यात आले असेल ते ठिकाण ; आणि

(चार) भाड्याची रक्कम.

(२) प्रत्येक रेल्वे प्रशासन, स्थानकावरील तिकीट खिडकी, प्रवाशांना तिकिटे देण्याकरिता ज्या वेळांमध्ये उघडी ठेवण्यात येईल त्या वेळा प्रदर्शित करील.

(३) पोट कलम (१) च्या खंड (दोन) व (तीन) अन्वये तिकिटावर विनिर्दिष्ट करणे आवश्यक असलेला तपशील,—

(क) तिकीट वहनाच्या निम्नतम वर्गासाठी असेल तर, ते हिंदीत, इंग्रजीत व तिकिट ज्या ठिकाणाहून देण्यात येणार असेल त्या ठिकाणी सामान्यतः वापरात असलेल्या प्रादेशिक भाषेत असेल ; आणि

(ख) तिकीट जर वहनाच्या इतर कोणत्याही वर्गाकरिता असेल तर, ते हिंदीत व इंग्रजीत असेल परंतु, जर यांत्रिकीकरणामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे असा तपशील अशा कोणत्याही भाषेत विनिर्दिष्ट करणे शक्य नसेल तर, केंद्र शासनास, असा तपशील त्या भाषेत विनिर्दिष्ट करण्यापासून सूट देता येईल.

जागा शिल्लक नसलेल्या एखाद्या वर्गात किंवा गाडीत अतिरिक्त प्रवाशांकरिता तिकिटे देण्यात आली असतील अशा प्रकरणांकरिता उपबंध.

५१. (१) देण्यात आलेले एखादे तिकीट हे एखाद्या वाहनाच्या वर्गात व गाडीमध्ये जागा उपलब्ध असण्याच्या शर्तीच्या अधीनतेने देण्यात आलेले तिकीट आहे, असे मानण्यात येईल.

(२) वाहनाच्या ज्या वर्गाकरिता तिकीट देण्यात आले आहे त्या वर्गात जागा उपलब्ध नसेल आणि त्याचा धारक त्या वर्गापेक्षा खालच्या वर्गाच्या वाहनातून प्रवास करत असेल तर, तो, अशा तिकिटाच्या परतीनंतर, त्याने भरलेले प्रवासभाडे व त्याने वाहनाच्या ज्या वर्गातून प्रवास केला त्या वर्गाकरिता देय असलेले प्रवास भाडे यातील फरक परत मिळण्यास हक्कदार असेल.

तिकीट रद्द करणे व परत करणे.

५२. एखादे तिकीट रद्द करण्याकरिता परत करण्यात आले असेल तर, रेल्वे प्रशासन ते रद्द करील व विहित करण्यात येईल अशी रक्कम परत करील.

विवक्षित तिकिटांच्या हस्तांतरणाविरुद्ध प्रतिषेध.

५३. एखाद्या व्यक्तीच्या नावे देण्यात आलेले तिकीट हे, केवळ ती व्यक्तीच वापरील :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, एकाच गाडीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी योग्य तिकिटांच्या आधारे आरक्षित केलेल्या आसनांच्या किंवा शायिकांच्या परस्परांत केलेल्या अदलाबदलीस प्रतिबंध होणार नाही :

परंतु आणखी असे की, याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यास विहित करण्यात येईल अशा परिस्थितीच्या अधीनतेने, एखाद्या प्रवाशाच्या नावे एखादे आसन किंवा शायिका आरक्षित केलेली असेल तर, अशा नावात बदल करण्याची, मुभा असेल.

पास व तिकिटे दाखविणे व प्रत्यर्पित करणे.

५४. प्रत्येक प्रवासी, याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याने मागणी केल्यावर, आपला पास किंवा तिकीट त्या रेल्वे कर्मचाऱ्याला प्रवासात किंवा प्रवासाच्या शेवटी तपासणीसाठी दाखवील आणि असे तिकीट,—

(क) प्रवासाच्या शेवटी ; किंवा

(ख) जर असे तिकीट एका विवक्षित कालावधीकरिता देण्यात आले असेल तर अशा कालावधीच्या समाप्तीनंतर, स्वाधीन करील.

पास किंवा तिकीट याशिवाय प्रवास करण्यास प्रतिषेध.

५५. (१) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडे योग्य तो पास किंवा तिकीट असल्याखेरीज, किंवा रेल्वे प्रशासनाने याबाबतीत शक्ती प्रदान केलेल्या एखाद्या रेल्वे कर्मचाऱ्याच्या परवानगीशिवाय, रेल्वेवरील कोणत्याही वाहनात प्रवास करण्याच्या उद्देशाने प्रवेश करणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली परवानगी मिळविणाऱ्या व्यक्तीस, त्या पोटकलमात निर्देश केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याकडून त्या प्रवाशाला साधारणत: असे एक प्रमाणपत्र मिळेल की, त्या प्रवाशाला अशा वाहनातून प्रवास करण्यास अशा शर्तींवर परवानगी देण्यात आली आहे की, प्रवास करावयाच्या अंतरासाठी प्रदेय असलेले भाडे तो मागाहून देईल.

**संक्रामक किंवा सांसर्गिक रोगांनी पीडित व्यक्ती वाहून नेण्यास नकार देण्याची शक्ती.**

५६. (१) विहित करण्यात येतील अशा संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगांनी पीडित एखादी व्यक्ती, याबाबतीत प्राधिकृत केलेल्या एखाद्या रेल्वे कर्मचाऱ्याच्या परवानगीखेरीज, रेल्वेच्या कोणत्याही वाहनात प्रवेश करणार नाही किंवा त्यात राहणार नाही किंवा गाडीमधून प्रवास करणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये परवानगी देताना रेल्वे कर्मचारी, अशा रोगग्रस्त व्यक्तीस, त्या गाडीमधील इतर प्रवाशांपासून विभक्त करण्याची व्यवस्था करील आणि अशा व्यक्ती, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने गाडीतून वाहून नेण्यात येतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या परवानगीखेरीज किंवा पोट-कलम (२) खाली विहित करण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून, जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही वाहनात प्रवेश करील किंवा तेथे राहील किंवा गाडीमधून प्रवास करील अशी व्यक्ती आणि तिच्यासोबत असणारी व्यक्ती या, त्यांचे पास व तिकिटे गमावण्यास व कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यांकडून रेल्वेमधून काढून लावली जाण्यास पात्र ठरतील.

**प्रत्येक डब्यातील प्रवाशांची कमाल संख्या.**

५७. केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने, प्रत्येक रेल्वे प्रशासन, प्रत्येक वर्णनाच्या वाहनाच्या प्रत्येक डब्यातून, वाहून नेता येईल त्या प्रवाशांची कमाल संख्या नियत करील आणि अशा प्रकारे नियत केलेली संख्या, प्रत्येक डब्याच्या आतील बाजूस किंवा बाहेरील बाजूस हिंदीतून, इंग्रजीतून व रेल्वे कार्यरत असणाऱ्या क्षेत्रात साधारणत: वापरात असलेल्या एका किंवा अनेक प्रादेशिक भाषांतून ठळक रीतीने प्रदर्शित केली जाईल.

**स्त्रियांकरिता डबे, इत्यादी राखून ठेवणे.**

५८. प्रत्येक रेल्वे प्रशासन, प्रवाशांचे वहन करणाऱ्या प्रत्येक गाडीमध्ये केवळ स्त्रियांच्या वापराकरिता, एक डबा किंवा रेल्वे प्रशासनास योग्य वाटतील इतक्या शायिका किंवा आसने राखून ठेवील.

**प्रवासी व गाडीचे प्रभारी रेल्वे कर्मचारी यांच्यातील दळणवळण संपर्क.**

५९. रेल्वे प्रशासन, प्रवाशांचे वहन करणाऱ्या प्रत्येक गाडीत, अशा गाडीच्या प्रभारी कर्मचाऱ्याच्या व प्रवाशांच्या दरम्यान, केंद्र शासन मान्यता देईल अशी दळणवळणाची कार्यक्षम साधने पुरवील व राखील :

परंतु, जर गाडीत पुरविण्यात आलेल्या दळणवळणाच्या साधनांचा गैरवापर होतो आहे, याबद्दल रेल्वे प्रशासनाची खात्री पटली तर, त्यास त्या गाडीतून त्यास योग्य वाटेल अशा कालावधीकरिता अशी साधने दूर करता येतील :

परंतु आणखी असे की, केंद्र शासनाला कोणत्याही गाडीत अशी दळणवळणाची साधने पुरवण्यापासून रेल्वे प्रशासनास ज्या परिस्थितीमध्ये सूट मिळू शकेल ती परिस्थिती विनिर्दिष्ट करता येईल.

**या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.**

६०. (१) केंद्र शासनास, अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेस हानी न पोहोचवता, अशा नियमांमध्ये खालील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करता येईल ; त्या बाबी अशा :—

(क) प्रवाशांची सोय व जागा (गाडीतील आसने व शायिकांच्या आरक्षणासहित) ;

(ख) तिकीट रद्द केल्याबद्दलच्या परताव्याची रक्कम ;

(ग) प्रवाशांच्या नावे आरक्षित करण्यात आलेली आसने किंवा शायिका यांच्यात ज्या परिस्थितीत बदल करता येईल ती परिस्थिती ;

(घ) सामानाचे वहन व सामान ज्या शर्तींच्या अधीनतेने स्थानकावरील सामानघरात ठेवता येईल, त्या शर्ती ;

(ङ) जे संक्रामक किंवा संसर्गजन्य आहेत असे रोग ;

(च) एखादे रेल्वे प्रशासन, संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगांनी पीडित प्रवाशांना ज्या शर्तींच्या अधीनतेने वाहून नेऊ शकेल त्या शर्ती व अशा प्रवाशांकडून वापरल्या जाणाऱ्या वाहनांना ज्या रीतीने जंतुविरहित करण्यात येईल ती रीत ;

(छ) सर्वसाधारणपणे, रेल्वेतून प्रवास आणि तिचा वापर, तिचे कामकाज व व्यवस्थापन यांचे विनियमन.

(३) या कलमाखालील कोणत्याही नियमात असे उपबंधित करता येईल की, त्याचे उल्लंघन करणारा पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) प्रत्येक रेल्वे प्रशासन, त्याच्या रेल्वेच्या प्रत्येक स्थानकावर, या कलमाखाली तयार केलेल्या सर्व नियमांची एक प्रत ठेवील आणि कोणत्याही व्यक्तीस त्याचे विनामूल्य निरीक्षणपुढा करू देईल.

## प्रकरण नववे

### मालाचे वहन

**दर-पुस्तके, इत्यादी राखणे.**

६१. रेल्वे प्रशासन, प्रत्येक स्थानकावर व वहनाकरिता माल जेथे प्राप्त केला जातो अशा इतर जागी, ज्यात एका स्थानकापासून दुसऱ्या स्थानकापर्यंत मालाचे वहन करण्याकरिता प्राधिकृत केलेले दर समाविष्ट असतील अशी दर-पुस्तके व इतर दस्तऐवज ठेवील व कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भाकरिता सर्व सोयीस्कर वेळांमध्ये कोणत्याही फीच्या भरण्याशिवाय ते उपलब्ध करून देईल.

**मालाचे ग्रहण इत्यादीकरिता शर्ती.**

६२. (१) रेल्वे प्रशासनाला, कोणत्याही मालाच्या ग्रहणाच्या, अग्रेषणाच्या, वहनाच्या किंवा पोचविण्याच्या बाबतीत, या अधिनियमाशी किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांशी विसंगत नसतील अशा, शर्ती लादता येतील.

(२) रेल्वे प्रशासन, प्रत्येक स्थानकावर आणि जिथे माल वहनाकरिता ग्रहण केला जातो अशा इतर जागेवर, पोटकलम (१) अनुसार त्यावेळी अंमलात असलेल्या शर्तींची एक प्रत ठेवील व कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भाकरिता सर्व सोयीस्कर वेळांमध्ये कोणतीही फी भरल्याशिवाय, ती उपलब्ध करून देईल.

**जोखीम दरांचा उपबंध.**

६३. (१) कोणताही माल वहनाकरिता रेल्वे प्रशासनाकडे सोपवण्यात आला असेल तर, जेथे अशा मालाच्या बाबतीत मालकाच्या जोखमीचा दर लागू होत असेल, तो खेरीजकरून बाकी ठिकाणी असे वहन, रेल्वे जोखीमदरावर करण्यात येईल.

(२) ज्याकरिता मालकाच्या जोखमीचा दर व रेल्वे जोखीम दर अस्तित्वात आहे असा कोणताही माल, वहनाकरिता कोणत्याही दरावर सोपविण्यात येईल आणि जर दरपसंती दर्शवलेली नसेल तर, असा माल मालकाच्या जोखीम दरावर सोपविण्यात आला आहे, असे समजण्यात येईल.

**अग्रेषण टीप.**

६४. (१) एखाद्या रेल्वे प्रशासनास, कोणताही माल वहनाकरिता सोपवणारी प्रत्येक व्यक्ती, केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात अग्रेषण टीप निष्पादित करील :

परंतु, विहित करण्यात येईल अशा मालाच्या बाबत कोणतीही अग्रेषण टीप निष्पादित केली जाणार नाही.

(२) मालप्रेषक, अग्रेषण टिपेत त्याने सादर केलेल्या तपशीलाच्या अचूकतेस जबाबदार असेल.

(३) मालप्रेषक, अग्रेषण टिपेतील तपशीलातील चुकीमुळे किंवा अपूर्णतेच्या कारणामुळे रेल्वे प्रशासनास पोहोचलेल्या हानीबद्दल क्षतिपूर्ती करील.

**रेल्वे पावती.**

६५. (१) एखादे रेल्वे प्रशासन,—

(क) जेव्हा सोपविलेला असा माल एखाद्या व्यक्तीकडून भरण्यात येत असेल तेव्हा अशा मालाच्या बाबतीत, असा भरणा पूर्ण केल्यानंतर ; किंवा

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, त्याने माल स्वीकृत केल्यावर केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात रेल्वे-पावती देईल.

(२) रेल्वे पावती ही त्यात नमूद केलेल्या वजनाचा व पार्सलच्या संख्येचा प्रथम दर्शनी पुरावा असेल :

परंतु, वाघीण भारातील किंवा गाडीभारातील पाठवलेल्या मालाचे आणि पुडक्यांचे वजन किंवा संख्या याची, त्याबाबत प्राधिकृत केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याने तपासणी केली नसेल आणि अशा आशयाचे विवरण त्याच्याकडून अशा रेल्वे-पावतीत नोंदले गेले असेल त्याबाबतीत, वजन किंवा, प्रकरणपरत्वे, त्यात निवेदन केलेल्या पुडक्यांची संख्या शाबीत करण्याचा बोजा मालप्रेषकावर, मालप्रेषितीवर किंवा पृष्ठांकितीवर असेल.

**मालाच्या वर्णनाशी संबंधित निवेदने आवश्यक करण्याची शक्ती.**

६६. (१) रेल्वेद्वारे वहनाच्या प्रयोजनार्थ, जो रेल्वेकडे आणण्यात आला आहे अशा कोणत्याही मालाचा मालक किंवा त्याची प्रभारी व्यक्ती आणि कोणत्याही पाठवलेल्या मालाचा मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती, त्याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याच्या विनंतीवरून, त्या रेल्वे कर्मचाऱ्यास अशा वहनाकरिता दर ठरवणे शक्य होईल असे मालाचे वर्णन समाविष्ट असलेले अशा मालकाने किंवा व्यक्तीने किंवा प्रकरणपरत्वे, मालप्रेषितीने किंवा पृष्ठांकितीने स्वाक्षरी केलेले लेखी विवरण, अशा रेल्वे कर्मचाऱ्याकडे पोहोचते करील.

(२) जर असा मालक किंवा व्यक्ती, पोटकलम (१) खाली आवश्यक केलेले विवरण देण्यास नकार देत असेल किंवा दुर्लक्ष करत असेल आणि असा माल समाविष्ट असलेले पार्सल उघडण्यास नकार देत असेल तर, रेल्वे कर्मचाऱ्यास तसे करणे आवश्यक वाटल्यास, रेल्वे प्रशासनास, अशा मालकाने किंवा व्यक्तीने अशा वहनाकरिता, मालाच्या कोणत्याही वर्गाकरिता उच्चतम असलेल्या दराचा भरणा केल्याखेरीज, असा माल स्वीकारण्यास नकार देण्याची मुभा असेल.

(३) जर मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती, पोटकलम (१) खाली आवश्यक केलेले विवरण देण्यास नकार देत असेल किंवा दुर्लक्ष करत असेल आणि अशा माल समाविष्ट असलेले पुडके उघडण्यास नकार देत असेल तर, रेल्वे कर्मचाऱ्याने तशी आवश्यकता दर्शवल्यास, रेल्वे प्रशासनास माल वहनाच्या बाबत मालाच्या कोणत्याही वर्गाकरिता उच्चतम असलेला दर आकारण्यात मुभा असेल.

(४) जर पोटकलम (१) अनुसार देण्यात आलेले विवरण, ज्याच्याशी त्याचा संबंध आहे अशा कोणत्याही मालाच्या वर्णनाच्या बाबतीत विशेषत: ते मिथ्या असेल तर, रेल्वे प्रशासन अशा मालाच्या वहनाच्या बाबतीत असे दर आकारील की, जे केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्गाच्या मालाकरिता आकारलेल्या उच्चतम दराच्या दुप्पटीपेक्षा अधिक असणार नाहीत.

(५) पोटकलम (१) खाली देण्यात आलेले विवरण ज्या वर्णनाच्या मालाकरिता देण्यात आले आहे त्या मालाच्या बाबतीत, जर रेल्वे कर्मचारी व असा मालक किंवा व्यक्ती, मालप्रेषिती किंवा, प्रकरण-परत्वे, पृष्ठांकिती यांच्यात कोणतेही मतभेद उद्‌भवले तर, तो रेल्वे कर्मचारी तो माल अडकवून ठेवील व त्याचे परीक्षण करील.

(६) जर कोणताही माल पोटकलम (५) अनुसार परीक्षणाकरिता ताब्यात घेण्यात आला असेल आणि अशा परीक्षणानंतर असे दिसून आले असेल की, पोटकलम (१) अनुसार देण्यात आलेल्या विवरणात दिलेल्या वर्णनाच्या मालापेक्षा तो वेगळा आहे तर, असा ताब्यात घेण्याचा व परीक्षणाचा खर्च, असा मालक किंवा व्यक्ती, मालप्रेषिती किंवा, प्रकरणपरत्वे, पृष्ठांकिती सोसेल आणि रेल्वे प्रशासन, अशा ताब्यात घेण्यामुळे किंवा परीक्षणाच्या कारणामुळे जे कोणतेही नुकसान, हानी किंवा ऱ्हास झाला असेल, त्यास जबाबदार असणार नाही.

धोकादायक किंवा त्रासदायक मालांचे वहन.

६७. (१) कोणतीही व्यक्ती, या कलमांच्या उपबंधानुसार असेल त्याखेरीज विहित करण्यात येईल असा, धोकादायक किंवा त्रासदायक माल रेल्वेत स्वत:बरोबर घेणार नाही किंवा रेल्वे प्रशासनास त्याचे वहन करण्यास भाग पाडणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला माल, याबाबत प्राधिकृत केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यास त्याच्या धोकादायक किंवा त्रासदायक स्वरूपाबाबत तिने लेखी नोटीस दिल्याखेरीज स्वत:बरोबर रेल्वेतून घेऊन जाणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला माल, असा माल समाविष्ट असलेल्या पुडक्याच्या बाहेरील बाजूवर, त्याच्या धोकादायक किंवा त्रासदायक स्वरूपाविषयी तिने सुस्पष्टपणे चिन्हांकित केल्याखेरीज व त्याच्या धोकादायक किंवा त्रासदायक स्वरूपाची लेखी नोटीस याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यास दिल्याखेरीज, अशा कर्मचाऱ्याकडे सोपवणार नाही.

(४) जर कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यास असे समजण्यास कारण असेल की, पुडक्यात समाविष्ट असलेला माल धोकादायक किंवा त्रासदायक स्वरूपाचा आहे आणि पोटकलम (२) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (३) अनुसार अशा मालाच्या बाबतीत देणे आवश्यक असलेली नोटीस देण्यात आलेली नाही तर, त्याला असे पुडके, त्यात समाविष्ट असलेल्या गोष्टींची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, उघडावयाची व्यवस्था करता येईल.

(५) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यास, कोणताही धोकादायक किंवा त्रासदायक माल वहनाकरिता स्वीकारण्यास नकार देता येईल किंवा प्रकरणपरत्वे, असा माल मार्गस्थ असताना, जर त्यास असे समजण्यास कारण असेल की, अशा वहनाकरिता असलेल्या या कलमातील उपबंधाचे पालन केलेले नाही तर, त्यास, त्याचे वहन रोखून ठेवता येईल किंवा असा माल काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल.

(६) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, "भारतीय स्फोटकद्रव्ये अधिनियम, १८८४" (१८८४ चा ४) याच्या उपबंधांपासून किंवा त्या अधिनियमाखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांना न्यूनत्व आणणारा आहे, असाअन्वयार्थ लावण्यात येणार नाही आणि पोटकलमे (४) व (५) मधील कशाचाही अन्वयार्थ, शासनाच्या आदेशाने किंवा वतीने वहनाकरिता सोपवलेल्या कोणत्याही मालास किंवा कोणताही माल, जो केंद्राच्या सशस्त्र बलाचा सैनिक, खलाशी, वैमानिक किंवा इतर कोणताही अधिकारी किंवा पोलीस अधिकारी किंवा प्रादेशिक सेनेचा किंवा राष्ट्रीय छात्र सेनेचा सदस्य आहे अशा सदस्याच्या सेवायोजनाच्या किंवा अशा कर्तव्याच्या ओघात, त्याच्या सोबत नेऊ शकेल, अशा मालास लागू होणार नाही.

संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगांनी पीडित प्राण्यांचे वहन.

६८. विहित करण्यात येईल अशा संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगाने पीडित अशा कोणत्याही प्राण्याचे वहन करण्यास रेल्वे प्रशासन बांधील असणार नाही.

मार्गातील बदल.

६९. जर रेल्वे प्रशासनाच्या नियंत्रणापलीकडील कोणत्याही कारणामुळे किंवा रेल्वे आवारातील दाटीमुळे किंवा इतर कोणत्याही कार्यचालनात्मक कारणांमुळे, ज्या मार्गावरून वहनाकरिता माल नोंदवण्यात केला त्यापेक्षा वेगळ्याच मार्गावरून अशा मालाचे वहन केले जात असेल तर, केवळ मार्गात बदल झाल्याच्या कारणामुळे रेल्वे प्रशासनाने, वहनाचा संविदाभंग केला आहे असे मानले जाणार नाही.

७०. एखादे रेल्वे प्रशासन, मालाच्या वहनात, कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस किंवा तिच्या बाजूने अनुचित किंवा कोणत्याही विशिष्ट वर्णनाच्या वाहतुकीस अनुचित किंवा गैरवाजवी अग्रक्रम किंवा फायदा देणार नाही. पसंतीक्रमाचा प्रतिषेध.

७१. (१) केंद्र शासनास, जर त्याच्या मते सार्वजनिक हितार्थ तसे करणे आवश्यक असेल तर, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही रेल्वे प्रशासनास पुढील प्रमाणे निदेश देता येतील :— विवक्षित मालाच्या वहनासंबंधात निदेश देण्याविषयीची शक्ती.

(क) केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाने किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे सोपवलेल्या अशा मालाच्या किंवा मालाच्या वर्गाच्या किंवा अशा इतर मालाच्या किंवा मालाच्या वर्गाच्या वहनाकरिता विशेष सवलती देणे किंवा अग्रक्रम देणे ;

(ख) कोणताही माल किंवा मालाचा वर्ग अशा मार्गाने किंवा मार्गांनी व अशा दरांनी वाहून नेणे ;

(ग) अशा मालाच्या किंवा मालाच्या वर्गाच्या अशा स्थानकावर किंवा स्थानकांपर्यंत वहनाकरिता स्वीकारण्यास निर्बंध घालणे किंवा तो स्वीकारण्यास नकार देणे.

(२) पोटकलम (१) खाली दिलेला कोणताही आदेश, अशा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर परिणामक असण्याचे समाप्त होईल, परंतु, अशा आदेशाचे तशाच आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळेस, वेळोवेळी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही अशा कालावधीकरिता नवीकरण करण्यात येईल.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक रेल्वे प्रशासन पोटकलम (१) खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यास बांधील असेल आणि अशा कोणत्याही आदेशास अनुसरून रेल्वे प्रशासनाने केलेल्या कोणत्याही कारवाईमुळे कलम ७० चे उल्लंघन झाले आहे असे मानले जाणार नाही.

७२. (१) जेव्हा वाघीण किंवा माल मोटार तिच्या वहन करण्याच्या कमाल क्षमतेइतकी भरण्यात आली असेल तेव्हा, प्रत्येक वाघिणीच्या किंवा माल-मोटारीच्या अक्षावर पडणारे एकूण वजन हे, केंद्र शासनाने, वाघिणीच्या किंवा मालमोटारीच्या अक्षाच्या वर्गाकरिता नियत केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही. वाघिणींकरिता व मालमोटारीकरिता वहनाची कमाल क्षमता.

(२) पोटकलम (१) अनुसार नियत केलेल्या मर्यादेच्या अधीनतेने, प्रत्येक रेल्वे प्रशासन, त्याच्या कब्जातील प्रत्येक वाघिणीकरिता व मालमोटारीकरिता सामान्य वहन क्षमता निर्धारित करील आणि अशा प्रत्येक वाघिणीच्या किंवा मालमोटारीच्या बाहेरील बाजूवर अशी निर्धारित केलेली सामान्य वहन क्षमता, शब्दांत व अंकात ठळक रीतीने प्रदर्शित करील.

(३) जी रेल्वेवरून जाते अशा वाघिणीची किंवा मोटारीची मालकी असणारी प्रत्येक व्यक्ती, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने अशा वाघिणीकरिता किंवा मालमोटारीकरिता सामान्य वहन क्षमता निर्धारित व प्रदर्शित करील.

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही विनिर्दिष्ट प्रकारचा माल वाहून नेणारी कोणतीही वाघीण किंवा ट्रक किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रकारच्या वाघिणींचा किंवा ट्रक्सचा कोणताही प्रकार यांच्या बाबतीत तसे करणे रेल्वे प्रशासनाला आवश्यक किंवा उचित वाटेल त्यावेळी, अशी वाघीण किंवा ट्रक किंवा अशा वाघिणींचा वा ट्रक्सचा असा प्रकार यांच्या नेहमीच्या वहनक्षमतेत त्याला बदल करता येईल आणि त्याला लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने, वाघिणीसाठी किंवा ट्रकसाठी किंवा वाघिणी किंवा ट्रक्स यांच्या कोणत्याही प्रकारासाठी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशी वहनक्षमता निश्चित करता येईल आणि अशी वाघीण किंवा ट्रक किंवा अशा वाघिणी किंवा ट्रक्सचा असा प्रकार यांच्या बाहेरील बाजूवर अशा प्रकारे निश्चित केलेली वहन क्षमता दर्शविणारे शब्द व संख्या प्रदर्शित करण्याची आवश्यकता असणार नाही.

७३. एखादी व्यक्ती, वाघिणीमध्ये, कलम ७२ च्या पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) अन्वये दर्शविलेल्या किंवा पोटकलम (४) अन्वये अधिसूचित केलेल्या वहनक्षमतेपेक्षा अधिक माल भरेल तेव्हा, रेल्वे प्रशासनाला, वाहणावळ व इतर आकार याखेरीज, मालप्रेषिती, मालप्रेषक किंवा प्रकरणपरत्वे, पृष्ठांकिती यांच्याकडून, विहित करण्यात येतील. अशा शास्तीच्या दरानुसार माल पाठवण्यापूर्वी आकार वसूल करता येईल : वाघिणीवर अति बोजा टाकण्याबद्दल शिक्षात्मक आकार.

परंतु, माल अग्रेषित करणारे स्थानक किंवा गन्तव्य स्थानकापूर्वीचे कोणतेही ठिकाण येथे, वाघिणीच्या वहन क्षमतेपलीकडे माल भरला असल्याचे रेल्वे प्रशासनाला आढळून आल्यास, तो उतरवून टाकणे आणि अशा रीतीने माल उतरविण्यापोटी झालेला खर्च व यासाठी एखादी वाघीण अडकवून ठेवण्याचा कोणताही आकार वसूल करणे वैध ठरेल.

७४. रेल्वे पावतीमध्ये समाविष्ट होणारी, प्रेषित मालातील संपत्ती, अशी रेल्वे पावती त्यांच्याकडे देण्यात आल्यानंतर, मालप्रेषिती किंवा, प्रकरणपरत्वे, पृष्ठांकितीकडे जाईल आणि त्याला मालप्रेषकाचे सर्व अधिकार व दायित्वे असतील. रेल्वे पावतीमध्ये समाविष्ट होणाऱ्या मालातील संपत्ती.

कलम ७४ मुळे मार्गस्थ मालाच्या अटकावणीच्या अधिकारावर किंवा वाहणावळीच्या मागणीवर परिणाम होणार नाही.

७५. कलम ७४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे पुढील गोष्टींना बाध येणार नाही किंवा त्यावर परिणाम होणार नाही :—

(क) मालप्रेषकाने, अप्राप्त मूल्य विक्रेता (माल विक्रय अधिनियम, १९३० (१९३० चा ३) अन्वये व्याख्या केल्यानुसार) या नात्याने रेल्वे प्रशासनाकडे लेखी विनंती केल्यानुसार, मार्गस्थ मालाच्या अटकावणीचा कोणताही अधिकार ;

(ख) मालप्रेषकाकडून वाहणावळीची मागणी करण्याचा रेल्वेचा कोणताही अधिकार ; किंवा

(ग) त्या कलमात उल्लेखिलेला कोणताही मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती यांचे, तो तसा मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती असल्याच्या कारणावरून, कोणतेही दायित्व.

रेल्वेच्या पावतीचे अभ्यर्पण.

७६. रेल्वे प्रशासन, रेल्वे पावती अन्वये पाठवलेला माल, अशा रेल्वे पावतीच्या अभ्यर्पणानंतर सुपूर्द करील :

परंतु, रेल्वे पावती सादर करण्यात आली नसेल तर, रेल्वे प्रशासनाच्या मते, माल मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीस, प्रेषित माल विहित करण्यात येईल अशा रीतीने सुपूर्द करण्यात येईल.

विवक्षित प्रकरणी माल सुपूर्द करण्याची किंवा त्याचे उत्पन्न विकण्याची रेल्वे प्रशासनाची शक्ती.

७७. रेल्वे पावती सादर करण्यात आली नसेल व प्रेषित मालावर किंवा प्रेषित मालाच्या विक्रीच्या उत्पन्नावर दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती हक्कमागणी करत असतील तर, रेल्वे प्रशासनास अशा पाठवलेल्या मालाची किंवा, प्रकरणपरत्वे, विक्री उत्पन्नाची सुपूर्दगी रोखून ठेवता येईल आणि असा प्रेषित माल किंवा विक्रीचे उत्पन्न विहित करण्यात येईल अशा रीतीने सुपूर्द करण्यात येईल.

मोजणे, वजन करणे इत्यादी बाबतची शक्ती.

७८. रेल्वे पावतीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रेषित मालाच्या सुपूर्दगीपूर्वी रेल्वे प्रशासनाला खालील अधिकार असतील :—

(एक) कोणताही प्रेषित माल पुन्हा मोजणे, त्याचे पुन्हा वजन करणे किंवा पुन्हा वर्गीकरण करणे ;

(दोन) वाहणावळ आणि इतर आकार यांची पुन्हा परिगणना करणे ; आणि

(तीन) कोणतीही इतर त्रुटी दुरुस्त करणे किंवा आकारावयाची राहून गेली असेल अशा आकाराची रक्कम गोळा करणे.

मालप्रेषिती किंवा पृष्ठांकितीच्या विनंतीवरून प्रेषित मालाचे वजन करणे.

७९. रेल्वे प्रशासनास, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने व विहित करण्यात येईल असा आकार आणि कोणताही विलंब आकार असल्यास, तो आकार याच्या प्रदानाच्या अधीन राहून, मालप्रेषितीच्या किंवा पृष्ठांकितीच्या विनंतीवरून प्रेषित मालाचे वजन करण्याची अनुमती देता येईल :

परंतु, याबाबतीत प्राधिकृत केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याला तसे करणे जेथे आवश्यक वाटत असेल अशा बाबी खेरीजकरून, मालकाच्या जोखमीच्या दराने नोंद केलेल्या मालाचे किंवा नाशवंत असलेल्या व प्रवासात ज्याचे वजन कमी होण्याची शक्यता असेल अशा मालाचे वजन करण्याची अनुमती देण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, आवारातील दाटीमुळे किंवा विहित करण्यात येईल अशा परिस्थितीमुळे वजन करणे शक्य नसेल तर, वाघिणीत भरलेल्या किंवा आगगाडीत भरलेल्या प्रेषित मालाचे वजन करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.

चुकीच्या सुपूर्दगीबाबतचे रेल्वे शासनाचे दायित्व.

८०. रेल्वे प्रशासनाने, रेल्वे पावती सादर करणाऱ्या व्यक्तीला प्रेषित माल सुपूर्द केल्यास अशी व्यक्ती त्यास हक्कदार नव्हती किंवा रेल्वे पावतीवरील पृष्ठांकन बनावट किंवा अन्यथा सदोष होते या आधारावर चुकीच्या सुपूर्दगीसाठी रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

प्रेषित मालाची खुली सुपूर्दगी.

८१. प्रेषित माल हानी पोचलेल्या स्थितीत आला असेल किंवा ढवळाढवळ केल्याच्या खुणा त्यावर दिसत असतील आणि मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती खुली सुपूर्दगी मागत असेल तर, विहित करण्यात येईल अशा रीतीने रेल्वे प्रशासन खुली सुपूर्दगी देईल.

प्रेषित मालाची अंशतः सुपूर्दगी.

८२. (१) प्रेषित माल किंवा त्याचा भाग सुपूर्दगीसाठी तयार ठेवण्यात आल्यानंतर कोणत्याही अशा प्रेषित मालाची किंवा त्याच्या भागाची हानी झालेली नसली तरी, मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती असा प्रेषित माल किंवा त्याचा भाग ताब्यात घेईल.

(२) पोट-कलम (१) खालील आंशिक सुपूर्दगीच्या बाबतीत रेल्वे प्रशासन, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आंशिक सुपूर्दगी प्रमाणपत्र देईल.

(३) मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती पोट-कलम (१) अन्वये माल ताब्यात घेण्याचे नाकारत असेल तर, प्रेषित माल किंवा त्याचा भाग स्थानांतरणासाठी अनुमती देण्यात आलेल्या वेळेनंतर धक्का भाड्याच्या अधीन राहील.

**वाहणावळी किंवा इतर कोणत्याही देय रकमेसाठी धारणाधिकार.**

८३. (१) मालप्रेषक, मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती, कोणत्याही प्रेषित मालाच्या बाबतीत कोणतीही वाहणावळ किंवा त्याच्याकडून येणे असलेला इतर आकार प्रदान करण्यास चुकत असेल तर, रेल्वे प्रशासन, असा प्रेषित माल किंवा त्याचा भाग अडकवून ठेवू शकेल किंवा असा प्रेषित माल जर सुपूर्द केला असेल तर रेल्वे प्रशासन त्याच्या कब्जात असलेला किंवा त्यानंतर कब्जात येईल असा, अशा व्यक्तीचा इतर कोणताही प्रेषित माल अडकवून ठेवू शकेल.

(२) वाहणावळ किंवा इतर आकाराइतकी रक्कम वसूल करण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे रेल्वे प्रशासन, पोटकलम (१) अन्वये अडकवून ठेवलेल्या मालाची किंवा त्याच्या भागाची :—

(क्) जर तो नाशवंत असेल तर, ताबडतोब विक्री करील ;

(ख्) नाशवंत नसेल तर, जाहीर लिलावाद्वारे विक्री करील :

परंतु, लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव लिलाव करणे इष्ट नाही असे रेल्वे प्रशासनाचे मत असेल तर, असा प्रेषित माल किंवा त्याचा भाग विहित करण्यात येईल अशा रीतीने विकण्यात येईल.

(३) रेल्वे प्रशासन, पोटकलम (२) च्या खंड (ख्) खालील जाहीर लिलावाची सूचना एका किंवा त्यापेक्षा जास्त स्थानिक वर्तमानपत्रात किंवा जेथे असे वर्तमानपत्र नसेल अशा ठिकाणी विहित करण्यात येईल अशा रीतीने कमीत कमी सात दिवस अगोदर देईल.

(४) रेल्वे प्रशासन, पोटकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या विक्रीच्या उत्पन्नातून विक्रीच्या खर्चासहित वाहणावळ आणि इतर आकाराइतकी, त्याला येणे असलेली रक्कम ठेवून घेईल व अशा उत्पन्नातून शिल्लक राहिलेली रक्कम आणि प्रेषित मालाचा भाग, काही असल्यास, हक्कदार असलेल्या व्यक्तीला देईल.

**बेवारशी प्रेषित माल.**

८४. (१) जर कोणतीही व्यक्ती,—

(क्) कोणताही माल; किंवा

(ख्) कलम ८३ च्या पोटकलम (१) अन्वये केलेल्या अडकवणीतून मोकळा केलेला प्रेषित माल ; किंवा

(ग्) कलम ८३ च्या पोटकलम (२) अन्वये प्रेषित मालाचा कोणताही शिल्लक राहिलेला भाग, ताब्यात घेण्यास चुकत असेल तर, असा प्रेषित माल बेवारशी समजला जाईल.

(२) रेल्वे प्रशासनास,—

(क्) नाशवंत स्वरूपाच्या बेवारशी प्रेषित मालाच्या बाबतीत, कलम ८३ च्या पोटकलम (२) च्या खंड (क्) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने अशा प्रेषित मालाची विक्री करता येईल; किंवा

(ख्) प्रेषित बेवारशी माल नाशवंत स्वरूपाचा नसेल त्याबाबतीत, पृष्ठांकितीचे नाव व पत्ता माहित असल्यास त्याच्यावर आणि जर पृष्ठांकितीचे नाव व पत्ता माहित नसेल तर पृष्ठांकन कर्त्यावर नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या कालावधीत माल हलविण्यास फर्माविणारी नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल आणि जर अशी नोटीस बजावता येणे शक्य नसेल किंवा नोटिशीतील अधिग्रहणाचे अनुपालन करण्यात कसूर झाली असेल तर, कलम ८३ च्या पोटकलम (२) च्या खंड (ख्) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने अशा मालाची त्याला विक्री करता येईल.

(३) रेल्वे प्रशासन, पोटकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या विक्रीच्या उत्पन्नातून, विक्रीच्या खर्चासहित वाहणावळ आणि इतर आकाराइतकी त्याला येणे असलेली रक्कम ठेवून घेईल व अशा विक्रीच्या उत्पन्नातून शिल्लक राहिलेली रक्कम, काही असल्यास, त्याचा हक्कदार असलेल्या व्यक्तीला देईल.

**विवक्षित परिस्थितीत नाशवंत स्वरूपाच्या प्रेषित मालाची विल्हेवाट.**

८५. (१) जेथे कोणताही पूर, जमीन खचणे, कोणतीही रेल्वे लाईन तुटणे, गाड्यांची टक्कर, गाडी रुळावरून घसरणे किंवा तिला इतर अपघात होणे या कारणाने किंवा इतर कोणत्याही कारणाने कोणत्याही प्रवास मार्गादरील वाहतुकीमध्ये व्यत्यय आला असेल आणि अशी वाहतूक पूर्वपदावर येण्याची शक्यता नसेल आणि अशा मालाची हानी किंवा तो कमी कमी होणे किंवा त्याचे नुकसान या गोष्टी टाळण्यासाठी त्याची वाहतूक दुसरीकडे वळवता येईल असा दुसरा प्रवासमार्ग नसेल तेथे, रेल्वे प्रशासनास, कलम ८३ च्या पोटकलम (२) च्या खंड (क्) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने अशा प्रेषित मालाची विक्री करता येईल.

(२) रेल्वे प्रशासन, पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या विक्रीच्या उत्पन्नातून विक्रीच्या खर्चासहित वाहणावळ आणि इतर आकाराइतकी त्याला येणे असलेली रक्कम ठेवून घेईल आणि विक्रीच्या उत्पन्नातून शिल्लक राहिलेली रक्कम, काही असल्यास, त्याचा हक्कदार असलेल्या व्यक्तीला देईल.

**कलमे ८३ ते ८५ खालील विक्रीचा दावा दाखल करण्याच्या अधिकारावर परिणाम न होणे.**

८६. या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलमे ८३ ते ८५ खालील विक्रीचा अधिकार, रेल्वे प्रशासनाला येणे असलेली कोणतीही वाहणावळ, आकार, रक्कम किंवा इतर खर्च दाव्याद्वारे वसूल करण्याच्या त्याच्या अधिकाराला बाध न येता असेल.

**या प्रकरणातील बाबींच्यासंबंधात नियम करण्याची शक्ती.**

८७. (१) केंद्र शासनाला या प्रकरणातील प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला बाधा न येता, अशा नियमात खालीलपैकी कोणत्याही एका किंवा सर्व बाबींसाठी उपबंध करता येतील ते असे :—

(क) ज्या मालाच्या बाबतीत कलम ६४, पोटकलम (१) च्या परंतुकान्वये अग्रेषण टिप्पणी निष्पादित करता येणार नाही तो माल;

(ख) कलम ६७, पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ, धोकादायक व त्रासदायक माल;

(ग) कलम ६८ च्या प्रयोजनार्थ, संक्रामक व सांसर्गिक रोग;

(घ) कलम ७३ खालील शास्ती आकाराचे दर;

(ङ) ज्या रीतीने कलम ७६ अन्वये प्रेषित माल रेल्वे पावतीशिवाय सुपूर्द केला जाऊ शकतो ती रीत;

(च) कलम ७७ अन्वये प्रेषित माल किंवा विक्रीचे उत्पन्न त्याचा हक्कदार असलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्याची रीत;

(छ) कलम ७९ अन्वये, वाघिणीत किंवा गाडीत भरलेल्या प्रेषित मालाचे वजन करू देण्यास ज्या शर्तींच्या अधीनतेने अनुमती देण्यात येईल त्या शर्ती व त्यासाठी देय असलेला आकार व ज्या परिस्थितीत त्या मालाचे वजन करू दिले नसेल ती परिस्थिती;

(ज) कलम ८१ अन्वये देण्यात येणाऱ्या खुल्या सुपूर्दगीची रीत;

(झ) कलम ८२ च्या पोटकलम (२) खालील आंशिक सुपूर्दगी प्रमाणपत्राचा नमुना;

(ञ) कलम ८३ च्या पोटकलम (२) च्या परंतुकान्वये प्रेषित मालाची किंवा त्याच्या भागाची विक्री करण्याची रीत;

(ट) कलम ८३ च्या पोटकलम (३) अन्वये सूचना ज्या रीतीने देता येईल ती रीत;

(ठ) सर्वसाधारणपणे, रेल्वेद्वारे मालाच्या वहनाचे विनियमन करण्यासाठी.

(३) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात असे उपबंधित करता येईल की, या नियमाचे व्यतिक्रमण हे एकशे पन्नास रुपयांपर्यंत वाढू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होऊ शकेल.

(४) प्रत्येक रेल्वे प्रशासन, या कलमान्वये, त्यावेळी अंमलात असलेल्या नियमांची प्रत प्रत्येक स्थानकावर ठेवील व कोणत्याही व्यक्तीला ती विनामूल्य पाहण्याची अनुमती देईल.

## प्रकरण दहावे

## अधिसूचित स्थानकांवर नोंदवलेल्या मालाच्या संबंधातील विशेष उपबंध

**व्याख्या.**

८८. या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर—

(क) "अत्यावश्यक वस्तू" याचा अर्थ, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम २ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल अशी अत्यावश्यक वस्तू, असा आहे ;

(ख) "अधिसूचित स्थानक" याचा अर्थ, कलम ८९ अन्वये अधिसूचित स्थानक म्हणून घोषित करण्यात आलेले एखादे स्थानक, असा आहे ;

(ग) एखाद्या अधिसूचित स्थानकाच्या संबंधात "राज्य शासन" याचा अर्थ, असे स्थानक ज्या राज्यात असेल अशा राज्याचे शासन किंवा असे स्थानक एखाद्या संघ राज्य क्षेत्रात असेल त्या बाबतीत, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या त्या संघराज्य क्षेत्राचा प्रशासक, असा आहे.

**अधिसूचित स्थानके घोषित करण्याची शक्ती.**

८९. (१) कोणत्याही रेल्वे स्थानकापर्यंत केवळ मालाची ने-आण करण्यासाठीच उद्देशित असलेल्या गाड्यांनी वाहून नेण्यासाठी सोपविण्यात आलेला माल अशा रेल्वे स्थानकावरून विनाविलंब हलविणे आवश्यक आहे, याबाबत केंद्र शासनाची खात्री पटली तर, त्याला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, असे रेल्वे स्थानक हे अधिसूचित रेल्वे स्थानक असल्याचे घोषित करता येईल :

परंतु, कोणतेही रेल्वे स्थानक हे, अधिसूचित रेल्वे स्थानक असल्याचे या पोटकलमान्वये घोषित करण्यापूर्वी केंद्र शासन पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही घटक विचारात घेईल, ते म्हणजे—

(क) अशा रेल्वे स्थानकावरील वाहतुकीचे परिमाण आणि भांडारासाठी उपलब्ध असलेली जागा ;

(ख) अशा रेल्वे स्थानकावर सर्वसाधारणपणे नोंदविण्यात येणाऱ्या मालाचे स्वरूप आणि परिमाणे ;

(ग) अशा रेल्वे स्थानकावरून असा माल दीर्घकालापर्यंत हलविण्यात आला नाही तर अशा मालाची टंचाई निर्माण होण्याच्या संभाव्यतेची व्याप्ती आणि अशा टंचाईमुळे समाजास भोगाव्या लागू शकतील अशा हालअपेष्टा ;

(घ) अशा रेल्वे स्थानकावर जर वाघिणीमधून माल लवकर हलविण्यात आला नाही तर किती वाघिणी अडकून पडण्याची शक्यता आहे आणि अशा वाघिणी लवकर हलविण्याची आणि त्या उपलब्ध होण्याची असलेली गरज ;

(ङ) विहित करण्यात येतील असे (सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने संबंध असलेले) इतर घटक ;

परंतु आणखी असे की, कोणत्याही रेल्वे स्थानकाच्या संबंधात या पोटकलमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी हा प्रथमत: सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, मात्र असा कालावधी अशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे प्रत्येक प्रसंगी जास्तीत जास्त सहा महिन्यांनी वेळोवेळी वाढविता येईल.

(२) एखाद्या अधिसूचित स्थानकापर्यन्त वाहून नेण्यासाठी कोणताही माल एखाद्या रेल्वे प्रशासनाकडे सोपविणारी कोणतीही व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने रेल्वे प्रशासनाकडे अर्ज करील आणि माल अधिसूचित स्थानकावर आल्याची सूचना नोंदणीकृत डाकेने जिला देण्यात येईल, त्या व्यक्तीचा पत्ता त्यात विनिर्दिष्ट करील आणि अशा सूचना देण्यासाठी आवश्यक असलेला टपाल आकार भरेल तर, रेल्वे प्रशासन, असा माल अधिसूचित स्थानकावर आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, त्यानुसार अशी सूचना पाठविल.

(३) मालाच्या प्रवासाच्या समाप्तीपासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत जो माल स्थानकामधून हलविला न आल्यामुळे कलम ९० च्या पोटकलम (१) च्या उपबंधानुसार जाहीर लिलावाने विकण्यायोग्य झाला असेल अशा मालाचे वर्णन देण्यात आलेले आणि तो माल ज्या तारखांना विकण्यात येईल त्या तारखा दर्शविणारे विहित नमुन्यातील एक विवरणपत्र, प्रत्येक अधिसूचित स्थानकामध्ये एखाद्या ठळक ठिकाणी प्रदर्शित करण्यात येतील :

परंतु, वेगवेगळ्या तारखांना विकण्याचे प्रस्तावित केलेल्या मालाच्या संबंधात, वेगवेगळी विवरणपत्रे अशा प्रकारे प्रदर्शित करता येतील.

(४) पोटकलम (३) अन्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही विवरणपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालात अत्यावश्यक वस्तुचा समावेश असेल तर, असे विवरणपत्र तयार करणारा रेल्वे कर्मचारी ते विवरणपत्र तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, त्याची एक प्रत—

(क) केंद्र शासनाने या बाबतीत नामनिर्देशित केलेल्या त्या शासनाच्या प्रतिनिधीला ;

(ख) राज्य शासनाने याबाबतीत नामनिर्देशित केलेल्या त्या शासनाच्या प्रतिनिधीला ; आणि

(ग) ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत असे रेल्वे स्थानक असेल, अशा जिल्हा दंडाधिकाऱ्याला,

अग्रेषित करील.

**अधिसूचित स्थानकांवरील हलविण्यात न आलेल्या मालाची विल्हेवाट.**

९०. (१) जर एखाद्या अधिसूचित स्थानकापर्यन्त केवळ रेल्वेने मालाची ने-आण करण्यासाठीच असलेल्या एखाद्या गाडीने वाहून नेण्यासाठी सोपविण्यात आलेला कोणताही माल, तो माल हलविण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तीने, त्या मालाच्या त्या स्थानकापर्यन्तच्या प्रवासाच्या समाप्तीनंतर सात दिवसांच्या कालावधीच्या आत अशा स्थानकावरून हलविला नाही तर, रेल्वे प्रशासन पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, असा माल जाहीर लिलावाद्वारे विकू शकेल आणि कलम ८९ च्या पोटकलम (३) च्या उपबंधानुसार अशा मालाचे वर्णन अंतर्भूत असलेले एक विवरणपत्र प्रदर्शित करण्याव्यतिरिक्त अशा जाहीर लिलावाची कोणतीही नोटीस देणे आवश्यक असणार नाही ; मात्र, या पोटकलमान्वये असा लिलाव ज्या तारखांना करण्यात येईल त्या तारखा एका किंवा अधिक स्थानिक वृत्तपत्रात अधिसूचित करता येतील, किंवा जेथे कोणतीही वृत्तपत्रे नसतील तेथे विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या अधिसूचित करता येतील :

परंतु, अशा मालाची या पोटकलमान्वये विक्री करण्यापूर्वी कोणत्याही वेळी, त्या मालास हक्कदार असणाऱ्या व्यक्तीनी, वाहणावळ व इतर आकार आणि त्या बाबतीत देय असलेला खर्च रेल्वे प्रशासनाला प्रदान केला तर, तिला असा माल हलविण्याची परवानगी देण्यात येईल.

(२) जर एखाद्या अधिसूचित स्थानकावरील पोटकलम (१) अन्वये ज्या जाहीर लिलावाद्वारे करता येतील अशा अत्यावश्यक असलेल्या कोणत्याही वस्तू केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला आपल्या स्वत:च्या वापरासाठी हव्या असतील किंवा जर अशा सर्व किंवा अशा कोणत्याही अत्यावश्यक वस्तू

रास्त भावाने उपलब्ध होतील हे सुनिश्चित करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाला किंवा अशा राज्य शासनाला वाटेल तर, त्याला अशा लिलावाच्या प्रभारी रेल्वे कर्मचाऱ्याला लेखी आदेशाद्वारे निदेश देता येतील की, असा माल, त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, आपल्याकडे किंवा अशा वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय करीत असेल अशा अभिकरणाकडे, सहकारी संस्थेकडे किंवा इतर व्यक्तीकडे (शासनाच्या नियंत्रणाधीन असलेले, अभिकरण, सहकारी संस्था किंवा इतर व्यक्ती) हस्तांतरित करावा.

(३) कोणत्याही अत्यावश्यक वस्तुच्या संबंधात, पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेला प्रत्येक निदेश हा असा निदेश ज्याला देण्यात आला असेल त्या रेल्वे कर्मचाऱ्यावर आणि रेल्वे प्रशासनावर बंधनकारक असेल आणि अशा अत्यावश्यक वस्तू या, अशा निदेशांच्या अनुपालनार्थ हस्तांतरित करण्यात आल्या आहेत ही गोष्ट, अशा मालाच्या हक्कदार असणाऱ्या व्यक्तीकडून करण्यात आलेल्या कोणत्याही मागणी विरुद्धचा पुरेसा बचाव होईल:

परंतु असे की,—

(क) (एक) असा निदेश, रेल्वे कर्मचाऱ्याला, ज्या अत्यावश्यक वस्तूंशी तो संबंधित असेल त्यांच्या विक्रीस प्रतिबंध करणे त्याला जेणेकरून शक्य होईल अशा पुरेशा वेळेवर मिळालेला नसेल ; किंवा

(दोन) अशा विक्रीसाठी ठरवण्यात आलेल्या वेळेच्या पूर्वी, अशा मालास हक्कदार असणाऱ्या व्यक्तीने, त्या संबंधात देय असलेली वाहणावळ किंवा इतर आकार आणि खर्च भरला असेल आणि आपल्याला तो माल हलविण्याची परवानगी द्यावी, असा दावा तिने केला असेल ; किंवा

(तीन) अशा मालासाठी प्रदेय असलेली (केंद्र शासनाने किंवा प्रकरणपरत्वे, राज्य शासनाने अंदाजली असेल अशी) किंमत रेल्वे प्रशासनाकडे विहित रीतीने जमा करण्यात आली नसेल आणि किंमतीची गणना पोटकलम (४) च्या उपबंधानुसार करण्यात न आल्यामुळे किंमत म्हणून जी रक्कम देण्यास रेल्वे प्रशासन जबाबदार होईल अशा कोणत्याही अतिरिक्त रकमेबाबत रेल्वे प्रशासनाची क्षतिपूर्ती करण्यात आलेली नसेल, तर असा निदेश, अशा रेल्वे कर्मचाऱ्यावर किंवा रेल्वे प्रशासनावर बंधनकारक असणार नाही ;

(ख) ज्यावेळी एकाच मालाच्या संबंधात केंद्र शासन व राज्य शासन या दोघांकडूनही निदेश आधी मिळाले असतील ते अधिभावी होतील.

(४) पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या निदेशांच्या अनुपालनार्थ, हस्तांतरित करण्यात आलेल्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तुसाठी प्रदेय असलेली किंमत ही, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याचे कलम ३ पोटकलम (३) च्या उपबंधानुसार गणना करून आलेली किंमत असेल:

परंतु,

(क) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३ च्या पोटकलम (३क) अन्वये ज्या अन्नसामग्रीच्या संबंधात काढलेली अधिसूचना, अधिसूचित स्थानक ज्या क्षेत्रामध्ये वसलेले आहे त्या क्षेत्रात अंमलात असेल अशी अन्नसामग्री असलेल्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तुच्या बाबतीत, प्रदेय किंमतीची गणना, त्या पोटकलमाचे खंड (तीन) व (चार) याच्या उपबंधानुसार करण्यात येईल;

(ख) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३ च्या पोटकलम (३क) अन्वये ज्या अन्नधान्याच्या, खाद्यतेलबियांच्या किंवा खाद्यतेलाच्या कोणत्याही प्रतीच्या किंवा प्रकाराच्या संबंधात काढलेली अधिसूचना, अधिसूचित स्थानक ज्या क्षेत्रामध्ये वसलेले आहे त्या क्षेत्रात अंमलात नसेल त्या अन्नधान्याची किंवा खाद्यतेलबियांची किंवा खाद्यतेलांची कोणतीही श्रेणी किंवा प्रकार असलेल्या एखाद्या अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत, प्रदेय किंमतीची गणना, त्या कलमाच्या पोटकलम (३ख) च्या उपबंधानुसार करण्यात येईल ;

(ग) जिच्या संबंधात, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३ च्या पोटकलम (३क) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना अधिसूचित स्थानक ज्या क्षेत्रात वसलेले आहे त्या क्षेत्रात अंमलात नाही, अशा कोणत्याही प्रकारची साखर असलेल्या एखाद्या अत्यावश्यक वस्तुच्या बाबतीत प्रदेय किंमतीची गणना, जर अशी साखर उत्पादकाने स्वतःसाठीच आगाऊ राखून ठेवलेली असेल तर, त्या कलमाच्या पोटकलम (३ग) च्या उपबंधानुसार करण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनासाठी, "उत्पादक" आणि "साखर" या संज्ञांना अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३ च्या पोटकलम (३ग) चे स्पष्टीकरण आणि कलम २ चा खंड (ङ) यामध्ये त्यांना अनुक्रमे जो अर्थ नेमून देण्यात आलेला आहे, तोच अर्थ असेल.

हक्कदार व्यक्तीला द्यावयाची किंमत, किंवा देणे रकमा वजा करून देणे.

९१. (१) कलम ९० च्या पोटकलम (१) अन्वये मालाच्या कोणत्याही विक्रीच्या उत्पन्नापैकी किंवा त्या कलमाच्या पोटकलम (४) अन्वये त्यासाठी प्रदेय असलेल्या किंमतीपैकी त्या मालाच्या संबंधात देणे असलेल्या वाहणावळीच्या किंवा इतर आकाराच्या आणि त्या मालाच्या आणि त्याच्या लिलावाच्या संबंधात केलेल्या खर्चाच्या बेरजेइतकी रक्कम रेल्वे प्रशासनाला ठेऊन घेता येईल, आणि कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास अशी रक्कम, ती मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीला देण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, रेल्वे प्रशासन त्या कामात निर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही वाहणावळ किंवा इतर आकार किंवा खर्च किंवा त्याची बाकी, दावा लावून वसूल करू शकेल.

(३) कलम ९० च्या पोटकलम (१) अन्वये विकण्यात आलेला किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या निदेशांच्या अनुपालनार्थ, हस्तांतरित करण्यात आलेला कोणताही माल, खरेदीदाराकडे किंवा हस्तांतरितीकडे सर्व भारमुक्त स्थितीत निहित होईल परंतु, रेल्वे प्रशासनाला पोटकलम (१) अन्वये जी रक्कम ठेवून घेता येईल तिला अग्रक्रम दिला जाण्याच्या अधीनतेने, ज्या व्यक्तीवर असा भार असेल तिला त्या पोटकलमात निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास त्या रकमेच्या बदली अशा भाराच्या संबंधात हक्क मागणी करता येईल.

९२. (१) या प्रकरणाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाला अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. या प्रकरणातील बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम ८९ च्या पोटकलम (१) च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (ङ) अन्वये केंद्र शासन विचारात घेईल असे घटक ;

(ख) कलम ८९ च्या पोटकलम (२) अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करता येईल तो नमुना व ती रीत ;

(ग) कलम ८९ च्या पोटकलम (३) अन्वये प्रदर्शित करणे आवश्यक असलेले विवरणपत्र ज्या नमुन्यात तयार करण्यात येईल तो नमुना ;

(घ) कलम ९० च्या पोटकलम (१) अन्वये जाहीर लिलावांच्या तारखा ज्या रीतीने अधिसूचित करता येतील ती रीत ;

(ङ) कलम ९० च्या पोटकलम (३) च्या परंतुकाच्या खंड (क) च्या उपखंड (तीन) मध्ये निर्देशित केलेल्या मालाच्या किंमती रेल्वे प्रशासनाकडे जमा करावयाची रीत.

## प्रकरण अकरावे

## रेल्वे प्रशासनाची परिवाहक म्हणून जबाबदारी

९३. या अधिनियमात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीजकरून प्रेषित मालाची, पुढील कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणामुळे माल मार्गस्थ असताना होणारी हानी, विनाश नुकसान किंवा ऱ्हास या गोष्टींना रेल्वे प्रशासन जबाबदार असेल ती कारणे अशी :— मालाचे परिवाहक म्हणून रेल्वे प्रशासनाची सर्वसाधारण जबाबदारी.

(क) दैवी घटना ;

(ख) युद्ध परिस्थिती ;

(ग) समाज कंटकांची कृत्ये ;

(घ) वैध आदेशिकेनुसार अटक, विरोध किंवा जप्ती ;

(ङ) केंद्र शासनाने किंवा एखाद्या राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अधीनस्थ असलेल्या, या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने लादलेले आदेश किंवा निर्बंध ;

(च) मालप्रेषक किंवा मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती किंवा मालप्रेषकाचा किंवा मालप्रेषितीचा किंवा पृष्ठांकितीचा अभिकर्ता किंवा नोकर यांची कृती किंवा अकृती किंवा हयगय ;

(छ) मालातील अंगभूत दोष त्याची प्रत किंवा त्यातील वैगुण्य यांमुळे मालाच्या प्रमाणात किंवा त्याच्या वजनात नैसर्गिकरित्या ऱ्हास होणे किंवा मालाचा अपव्यय होणे;

(ज) अप्रकट दोष ;

(झ) आग, स्फोट किंवा कोणताही अकल्पित धोका :

परंतु असे की, जेथे मालाची अशी हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टी उपरोक्त पैकी एका किंवा अधिक कारणांमुळे उद्भवल्या असल्याचे सिद्ध करण्यात आले असेल, तेथेही, प्रेषित मालाच्या वहनात रेल्वे प्रशासनाने वाजवी दूरदर्शीपणा दाखवलेला आहे आणि पुरेशी काळजी घेतली आहे, हे त्याने आणखी सिद्ध करीपर्यंत अशी हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे याबाबतच्या जबाबदारीतून रेल्वे प्रशासनाला मुक्त करण्यात येणार नाही.

९४. (१) जेथे रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या नसलेल्या कडरुळावरून रेल्वेने वहन करण्यासाठी माल भरावयाचा असेल तेथे, जोपर्यंत रेल्वे प्रशासन आणि कडरुळ यांच्यामधील वाघिणीच्या अदलाबदलीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी तो माल असलेली वाघीण आणून ठेवीपर्यंत व याबाबतीत प्राधिकृत केलेल्या रेल्वे सेवकाला कडरुळाच्या मालकाने त्यानुसार कळवेपर्यंत, उद्भवणारी, कोणत्याही कारणामुळे आलेली अशा मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टींना ते रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही. रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या नसलेल्या कडरुळावर माल भरणे किंवा बटबडा करणे.

(२) जेथे रेल्वे प्रशासनाच्या मालकीच्या नसलेल्या कडरूळावरून रेल्वे प्रशासनाकडून बदवडा करावयाचा असेल तेथे, रेल्वे प्रशासन आणि तो कडरूळ यांच्यामधील वाघिणींच्या अदलाबदलीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी प्रेषित माल असलेली वाघीण आणून ठेवल्यानंतर आणि या बाबतीत प्राधिकृत केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याने ती वाघीण आणून ठेवण्यात आली असल्याचे त्या कडरूळाच्या मालकाला त्यानुसार कळवल्यानंतर, उद्‌भवणारी कोणत्याही कारणामुळे झालेली अशा प्रेषित मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे याला ते रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

**प्रवासातील विलंब किंवा अडवणूक.**

९५. प्रेषित मालाची हानी, विनाश, नुकसान किंवा त्याचा ऱ्हास होणे या गोष्टी वहनातील विलंबामुळे किंवा अडवणुकीमुळे झाल्या आहेत असे मालकाने सिद्ध केल्यास, जर असा विलंब किंवा अडवणूक ही आपल्या नियंत्रणाबाहेरील कारणाने झाली आहे किंवा आपल्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या हयगयीशिवाय किंवा गैरवर्तणुकीशिवाय उद्‌भवलेली आहे, असे रेल्वे प्रशासनाने सिद्ध केले तर, त्यासाठी रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

**भारतातील रेल्वे आणि विदेशातील रेल्वे यांवरून होणारी वाहतूक.**

९६. भारतातील एखाद्या ठिकाणाहून भारताबाहेरील एखाद्या ठिकाणी किंवा भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारतातील एखाद्या ठिकाणी किंवा भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारताबाहेरील दुसऱ्या एखाद्या ठिकाणी किंवा भारतातील एखाद्या ठिकाणाहून भारतातील दुसऱ्या एखाद्या ठिकाणी भारताबाहेरील कोणत्याही प्रदेशावरून प्रेषित मालाचे वहन करताना, त्या मालाचे एखाद्या रेल्वे प्रशासनाच्या रेल्वेवरून वहन केले जात असेल तर त्याची कोणत्याही कारणामुळे उद्‌भवलेली हानी, विनाश, नुकसान किंवा मालाचा ऱ्हास होणे या गोष्टी त्या प्रशासनाच्या रेल्वेवर उद्‌भवल्या असे त्या मालाच्या मालकाने सिद्ध केले नाही तर, या प्रकरणाच्या कोणत्याही उपबंधान्वये ते रेल्वे प्रशासन त्यासाठी जबाबदार असणार नाही.

**मालकाच्या जोखमीवर वहन केला जाणारा माल.**

९७. कलम ९३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रेषित मालाचे मालकाच्या जोखमीवर वहन करण्यात आले असेल तर अशा प्रेषित मालाची प्रवासात झालेली हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे, तो सुपूर्द न करणे या गोष्टींना, मग त्या कोणत्याही कारणाने उद्‌भवलेल्या असोत, अशी हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टी त्या रेल्वे प्रशासनाच्या किंवा त्याच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणाच्याही हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झाल्या असल्याच्या शाबितीनंतर असेल त्याखेरीज, रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही :

परंतु असे की,—

(क) सर्व प्रेषित माल किंवा अशा प्रेषित मालाचा भाग असलेले कोणतेही पुडके प्रेषितीकडे किंवा पृष्ठांकितीकडे सुपूर्द करण्यात आले नसेल आणि आगीमुळे किंवा गाडीला कोणताही अपघात झाल्यामुळे तो सुपूर्द करण्यात आला नसल्याचे रेल्वे प्रशासनाने सिद्ध केले नसेल तर; किंवा

(ख) आच्छादन किंवा संरक्षण हातानं सहजगत्या काढून टाकता येणार नाही, अशा प्रकारे जो आच्छादित किंवा संरक्षित करण्यात आला होता अशा कोणत्याही प्रेषित मालाच्या किंवा अशा मालाचा भाग असलेल्या पुडक्याच्या संबंधात ज्यावेळी, सुपूर्दगीच्या वेळी किंवा तत्पूर्वी रेल्वे प्रशासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले असेल की, अशा प्रेषित मालाच्या किंवा पुडक्याच्या कोणत्याही भागाची प्रवासात भुरटी चोरी करण्यात आली होती तर,

प्रेषित माल किंवा पुडके, रेल्वे प्रशासनाच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली होते त्या संपूर्ण काळात, त्या संबंधात कशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली हे प्रेषकाला, प्रेषितीला किंवा पृष्ठांकितीला उघड करण्यास रेल्वे प्रशासन बांधील राहील, परंतु, अशा उघड केलेल्या माहितीतून रेल्वे प्रशासनाने किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने केलेल्या कोणत्याही हयगयीचे किंवा गैर-वर्तणुकीचे अनुमान रास्तपणे काढता येणे शक्य नसेल तर, अशी हयगय किंवा गैरवर्तणुक सिद्ध करण्याचा भार प्रेषकावर, प्रेषितीवर किंवा पृष्ठांकितीवर राहील.

**सदोष स्थितीतील किंवा सदोष पुडक्यातील माल.**

९८. (१) या प्रकरणातील पूर्वगामी उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या रेल्वे प्रशासनाकडे वहनासाठी सोपवलेला कोणताही माल,—

(क) सदोष स्थितीत असेल व त्याच्या परिणामी त्याचे नुकसान, ऱ्हास, गळती किंवा अपक्षय होण्याची शक्यता असेल; किंवा

(ख) सदोष आवेष्टनात बांधलेला असेल किंवा विहित करण्यात येईल अशा रीतीने आवेष्टित केला नसेल व अशा सदोष किंवा अयोग्य आवेष्टनाच्या परिणामी त्याचे नुकसान, त्याचा ऱ्हास, त्याची गळती किंवा अपक्षय या गोष्टी होण्याची शक्यता असेल,

आणि अशा स्थितीबाबतची किंवा सदोष किंवा अयोग्य आवेष्टनासंबंधीची वस्तुस्थिती प्रेषकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने अग्रेषण टिप्पणीत अभिलिखित केली असेल तर, कोणतेही मालाचे नुकसान, त्याचा ऱ्हास होणे, त्याची गळती किंवा अपक्षय या गोष्टीस किंवा गहाळ्य स्थाली असा माल ज्या स्थितीत सुपूर्दगीसाठी उपलब्ध असेल त्या स्थितीत, रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही :

परंतु असे की, कोणतेही असे नुकसान, मालाचा ऱ्हास, त्याची गळती किंवा अपव्यय या गोष्टींना किंवा गंतव्य स्थानी असा माल ज्या स्थितीत सुपूर्दगीसाठी उपलब्ध असेल त्या स्थितीस, रेल्वे प्रशासनाची किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची हयगय किंवा गैरवर्तणूक सिद्ध करण्यात आली असेल तर, रेल्वे प्रशासन जबाबदार असेल.

(२) रेल्वे प्रशासनाकडे वहनासाठी सोपविण्यात आलेला कोणताही माल जेव्हा गंतव्य स्थानी आल्यानंतर त्याचे नुकसान झाले असल्याचे किंवा त्याचा ऱ्हास झाला असल्याचे, त्याची गळती झाली असल्याचे किंवा अपव्यय झाला असल्याचे आढळून आले असेल, तेव्हा रेल्वे प्रशासनाने जर असे सिद्ध केले असेल की,

(क) माल रेल्वे प्रशासनाकडे सोपवण्यात आला तेव्हाच तो माल सदोष स्थितीत होता किंवा तो त्यावेळी सदोष आवेष्टनात बांधण्यात आला होता किंवा विहित करण्यात येईल त्या त्या रीतीने आवेष्टित केला नव्हता आणि याच्या परिणामी नुकसान, मालाचा ऱ्हास त्याची गळती किंवा अपव्यय, या गोष्टी होण्याची शक्यता होती; आणि

(ख) रेल्वेने वहन करण्यासाठी माल रेल्वे प्रशासनाकडे सोपवण्याच्या वेळी, अशी सदोष स्थिती किंवा सदोष किंवा अयोग्य आवेष्टन रेल्वे प्रशासनाच्या किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले नव्हते, तर, मालाचे नुकसान त्याचा ऱ्हास त्याची गळती किंवा अपव्यय याला रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही :

परंतु असे की, रेल्वे प्रशासनाची किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची हयगय किंवा गैरवर्तणूक सिद्ध करण्यात आली तर, असे नुकसान, मालाचा ऱ्हास, त्याची गळती किंवा अपव्यय, या गोष्टींना रेल्वे प्रशासन जबाबदार असेल.

**प्रवास समाप्तीनंतर रेल्वे प्रशासनाची जबाबदारी.**

९९. (१) प्रवास समाप्ती नंतर सात दिवसांच्या कालावधीपर्यंत प्रेषित मालाची झालेली हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टींना, भारतीय संविदा अधिनियम, १८७२ याची कलमे १५१, १५२ व १६१ या अन्वये उपनिहिती म्हणून रेल्वे प्रशासन जबाबदार असेल :

परंतु असे की, प्रेषित माल, मालकाच्या जोखमीच्या दराने असेल त्यावेळी रेल्वे प्रशासनाच्या किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या हयगयीच्या किंवा गैरवर्तणुकीच्या पुराव्यानुसार असेल ते खेरीज करून अशी हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे याला रेल्वे प्रशासन निक्षेपग्राही म्हणून जबाबदार असणार नाही.

(२) प्रवास समाप्तीनंतर सात दिवसांच्या कालावधी समाप्त झाल्यानंतर उद्भवणाऱ्या, कोणत्याही प्रेषित मालाच्या हानीला, विनाशाला, नुकसानाला, त्याच्या ऱ्हासाला किंवा तो सुपूर्द न करण्याला रेल्वे प्रशासन कोणत्याही बाबतीत जबाबदार असणार नाही.

(३) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नाशवंत माल, प्राणी आणि स्फोटके आणि विहित करण्यात येईल असा घातक किंवा इतर माल यांचा प्रवास समाप्त झाल्यानंतर त्यांची झालेली हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टींना रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

(४) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधांमधील कोणत्याही गोष्टींचा, जोपर्यंत प्रेषित माल रेल्वे वाघिणीमधून उतरवण्यात आला नसेल किंवा तो रेल्वेच्या जागेतून हलविण्यात आला नसेल तो पर्यंत कोणताही विलंब आकार किंवा धक्काभाडे भरण्याच्या कोणत्याही व्यक्तीच्या जबाबदारीवर, कोणताही परिणाम होणार नाही.

**सामानाचा वाहक म्हणून जबाबदारी.**

१००. एखाद्या रेल्वे कर्मचाऱ्याने कोणत्याही सामानाची नोंद घेऊन त्यासाठी पावती दिलेली असल्याखेरीज, त्याची कोणतीही हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टींना, एखादे रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही, आणि उतारुने जे सामान स्वतः ठेवून नेले असेल त्याबाबतीत, त्या सामानाची झालेली हानी, विनाश, नुकसान किंवा त्याचा ऱ्हास, या गोष्टी त्या रेल्वे प्रशासनाच्या किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झाल्या आहेत हे सुद्धा सिद्ध करण्यात आल्याखेरीज, त्यासाठी ते रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

**प्राण्यांचा वाहक म्हणून जबाबदारी.**

१०१. रेल्वेने वहन करण्यात येणाऱ्या कोणत्याही प्राण्याच्या भेदरण्यामुळे किंवा त्याच्या अडेलपणामुळे किंवा मालप्रेषकाने वाघिणी प्रमाणापेक्षा जास्त भरल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्राण्याच्या हानीला किंवा विनाशाला किंवा क्षतीला रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

**विवक्षित प्रकरणी दायित्वापासून मुक्तता.**

१०२. या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरी :—

(क) जेव्हा अशी हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास, किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टी कलम ६६ च्या पोटकलम (१) अन्वये दिलेल्या विवरणपत्रात प्रेषित मालाचा गलत: खोटा तपशील दिल्याने घडल्या असतील, किंवा

(ख) मालप्रेषकाने किंवा मालप्रेषितीने किंवा पृष्ठांकितीने किंवा मालप्रेषकाच्या किंवा मालप्रेषितीच्या किंवा पृष्ठांकितीच्या अभिकर्त्याने कपट केले असेल; किंवा

(ग) (एक) मालप्रेषकाने किंवा मालप्रेषितीने किंवा पृष्ठांकितीने किंवा मालप्रेषकाच्या किंवा मालप्रेषितीच्या किंवा पृष्ठांकितीच्या अभिकर्त्याने अयोग्य रीतीने भरल्यामुळे किंवा उतरविल्यामुळे ;

(दोन) दंगा, नागरी विक्षोभ, संप, टाळेबंदी, किंवा अन्य कोणत्याही कारणाने होणारा कामगारांचा अटकाव किंवा त्यांचे निरोधन—मग ते आंशिक असो किंवा सार्वत्रिक असो—यामुळे, या गोष्टी घडल्या असल्याचे किंवा त्यामधून उद्‌भवलेल्या असल्याचे रेल्वे प्रशासनाने सिद्ध केले असेल; किंवा

(घ) अप्रत्यक्ष किंवा परिणामी झालेले नुकसान किंवा विशिष्ट बाजारपेठेची हानी, यामुळे झालेली हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे याला रेल्वे प्रशासन जबाबदार असणार नाही.

कोणत्याही प्रेषित मालाच्या बाबतीत द्रव्यविषयक दायित्वाची मर्यादा.

१०३. (१) कोणत्याही प्रेषित मालाचे रेल्वेने वहन करण्यासाठी तो रेल्वे प्रशासनाकडे सोपवण्यात आला असेल आणि पोटकलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मालप्रेषकाने अशा प्रेषित मालाचे मूल्य घोषित केले नसेल तर, प्रेषित मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे यासाठी, कोणत्याही बाबतीत, रेल्वे प्रशासनाच्या दायित्वाची रक्कम विहित करण्यात येईल त्यारीतीने, प्रेषित मालाच्या वजनानुसार परिगणित केलेल्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही, आणि अशा प्रेषित मालात प्राण्यांचा अंतर्भाव असेल तर, असे दायित्व विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा जास्त असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, रेल्वेने वहन करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे कोणताही प्रेषित माल सोपविताना माल प्रेषकाने त्या मालाचे मूल्य घोषित केले असेल आणि पोटकलम (१) अन्वये परिगणित केल्याप्रमाणे किंवा प्रकरणपरत्वे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, रेल्वे प्रशासनाच्या दायित्वापेक्षा अशा प्रेषित मालाचे मूल्य जितके जास्त असेल तितका, विहित करण्यात येईल असा टक्केवारी आकार भरला असेल तर, अशा प्रेषित मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे यासाठी रेल्वे प्रशासनाचे दायित्व, अशा घोषित केलेल्या मूल्यापेक्षा जास्त असणार नाही.

(३) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे वेळोवेळी असा निदेश देऊ शकेल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा माल, त्याचे मूल्य घोषित केल्याशिवाय आणि पोटकलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे टक्केवारी आकार भरल्याशिवाय रेल्वेने वहन करण्यासाठी स्वीकारली जाणार नाही.

उघड्या वाघिणीमधून वहन करण्यात येणाऱ्या मालाबाबत दायित्वाची मर्यादा.

१०४. ज्या मालाचे वहन सर्वसामान्य परिस्थितीत आच्छादित वाघिणीतून केले जात असते आणि त्याचे वहन अन्य प्रकारे करण्यात आले असते तर, त्याला नुकसान पोचण्याची शक्यता निर्माण झाली असती अशा कोणत्याही मालाचे अग्रेषण टिप्पणीमध्ये मालप्रेषकाच्या संमतीवरून उघड्या वाघिणीतून वहन केले गेले तर केवळ अशा प्रकारे मालाचे वहन केल्याच्या कारणांमुळे उद्‌भवलेला असा कोणताही विनाश, नुकसान किंवा मालाचा ऱ्हास याबद्दलचे रेल्वे प्रशासनाचे दायित्व, असा विनाश, नुकसान किंवा मालाचा ऱ्हास यासाठी या प्रकरणान्वये निश्चित करण्यात येईल अशा दायित्वाच्या रकमेपेक्षा निम्मे असेल.

विवक्षित प्रेषित माल किंवा सामान यात असलेल्या वस्तू तपासण्याचा रेल्वे प्रशासनाचा अधिकार.

१०५. कोणत्याही प्रेषित मालाच्या बाबतीत कलम १०३ अन्वये मूल्य घोषित करण्यात आले असेल तर तो वाहून नेण्यासाठी रेल्वे प्रशासन अशी शर्त घालू शकेल की, या बाबतीत प्राधिकृत केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांची तपासणी केली असता किंवा अन्यथा, अशी खात्री झालेली असली पाहिजे की, वहनासाठी दिलेल्या मालामध्ये केवळ घोषित केलेल्या वस्तू आहेत.

जादा आकाराचे परतावे आणि भरपाईसाठीच्या मागण्यांची सूचना.

१०६. (१) कोणतीही व्यक्ती, रेल्वेने वहन करण्यासाठी माल सोपवण्यात आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत,—

(क) रेल्वेने वहन करण्यासाठी ज्या रेल्वे प्रशासनाकडे तो माल सोपवण्यात आला होता त्या रेल्वे प्रशासनाला ; किंवा

(ख) गंतव्य स्थानक ज्या रेल्वे प्रशासनाच्या रेल्वेवर असेल किंवा हानी, विनाश, नुकसान किंवा मालाचा ऱ्हास या गोष्टी ज्या रेल्वे प्रशासनाच्या रेल्वेवर घडल्या असतील त्या रेल्वे-प्रशासनाला, मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे याची सूचना, त्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने दिल्याखेरीज, रेल्वेने वहन करण्यात आलेल्या मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टींसाठी रेल्वे प्रशासनाकडून भरपाई मिळण्यास हक्कदार असणार नाही.

(२) माल सुपूर्द न करणे किंवा तो सुपूर्द करण्यात झालेला विलंब यासंबंधात पाठवण्यात आलेल्या मालाची ओळख पटण्यास पुरेसा ठरेल असा तपशील देऊन त्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने, उक्त

सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही रेल्वे प्रशासनाकडे लेखी मागितलेली माहिती किंवा त्याच्याकडे करण्यात आलेली कोणतीही लेखी चौकशी किंवा कोणतीही लेखी तक्रार ही, या कलमाच्या प्रयोजनासाठी भरपाईसाठी केलेली मागणी असल्याचे समजण्यात येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीला, रेल्वेने वाहून नेण्यात आलेल्या मालाच्या बाबतीत, अशा प्रदानाची तारीख किंवा गंतव्य स्थानकावर असा माल सुपूर्द केल्याची तारीख, यापैकी जी नंतरची असेल, त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, ज्या रेल्वे प्रशासनाकडे जादा आकार भरला आहे त्या रेल्वे प्रशासनाला त्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने त्याची सूचना दिल्याखेरीज, जादा आकाराचा परतावा मिळण्याचा हक्क असणार नाही.

मालाची हानी, इत्यादींच्या भरपाईसाठी अर्ज.

१०७. मालाची हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे यासाठीच्या भरपाईचा अर्ज ज्या रेल्वे प्रशासनाला कलम १०६ अन्वये सूचना देण्यात आली आहे, त्या रेल्वे प्रशासनाच्या विरुद्ध दाखल करण्यात येईल.

भरपाईची मागणी करण्यासाठी हक्कदार असलेली व्यक्ती.

१०८. (१) जर एखादे रेल्वे प्रशासन, वाहून नेण्यासाठी त्याच्याकडे सोपवण्यात आलेल्या मालाची हानी, विनाश, नुकसान, त्याचा ऱ्हास होणे किंवा तो सुपूर्द न करणे यासाठी रेल्वे पावती सादर करणाऱ्या मालप्रेषिताला किंवा पृष्ठांकितीला भरपाई देत असेल तर, त्या रेल्वे प्रशासनाने त्याचे दायित्व पार पाडल्याचे मानण्यात येईल आणि मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती अशी भरपाई मिळण्यास वैधरीत्या हक्कदार नव्हता या मुद्यावर रेल्वे प्रशासनाविरुद्ध हक्कमागणी अधिकरणापुढे अर्ज करता येणार नाही किंवा कोणतीही इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

(२) पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टींचा, मालामध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या त्या पोटकलमान्वये भरपाई मिळवणारा मालप्रेषिती किंवा पृष्ठांकिती यांच्या विरुद्धच्या अधिकाराच्या अंमलबजावणीवर, परिणाम होणार नाही.

वैयक्तिक क्षतीसाठी ज्याच्या विरुद्ध अर्ज दाखल करावयाचा ते रेल्वे प्रशासन.

१०९. प्रवाशांची जीवितहानी किंवा वैयक्तिक क्षती याबद्दलच्या भरपाईसाठी करावयाचा अर्ज,—

(क) प्रवाशाने ज्याच्याकडून पास मिळवला आहे किंवा तिकीट खरेदी केले आहे ते रेल्वे प्रशासन, किंवा

(ख) गंतव्य स्थानक ज्याच्या रेल्वेमार्गावर आहे किंवा हानी किंवा वैयक्तिक क्षती ज्याच्या रेल्वे मार्गावर पोहचली आहे, ते रेल्वे प्रशासन,

याच्या विरुद्ध हक्कमागणी अधिकरणापुढे संस्थित करता येईल.

सिद्धीभार.

११०. कोणतीही हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे याबद्दल भरपाई-साठी हक्कमागणी अधिकरणापुढे केलेल्या अर्जात,—

(क) प्रत्यक्षपणे सोसावी लागलेली द्रव्यविषयक हानी ; किंवा

(ख) कलम १०३ च्या पोटकलम (२) अन्वये ज्याचे मूल्य घोषित करण्यात आले आहे अशा कोणत्याही प्रेषित मालाच्या बाबतीत, अशाप्रकारे घोषित करण्यात आलेले मूल्य हे त्याचे खरे मूल्य आहे,

हे सिद्ध करण्याची जबाबदारी, भरपाईची मागणी करणाऱ्या व्यक्तींवर राहील. परंतु, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, अशी हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे या गोष्टी कशा घडल्या हे त्याने सिद्ध करणे आवश्यक असणार नाही.

समुद्रामधील अपघातांच्या संबंधात रेल्वे प्रशासनाच्या दायित्वाच्या मर्यादा.

१११. (१) ज्यावेळी एखादे रेल्वे प्रशासन, प्रवासी किंवा माल अंशतः रेल्वेने आणि अंशतः समुद्र-मार्गाने वाहून नेण्याबाबत संविदा करील, त्यावेळी प्रवासी किंवा माल यांचे वहन समुद्रमार्गे करताना, दैवी घटना, समाजकंटकांची कृत्ये, आग, यंत्रसामग्री, बाष्पक आणि वाफ यांपासून होणारे अपघात आणि समुद्र, नदी आणि नौकानयन याचा कोणत्याही स्वरूपाचा आणि कशाही प्रकाराचा सर्व आणि प्रत्येक इतर धोका आणि अपघात, यांमुळे होणारा कोणताही मृत्यू, वैयक्तिक क्षती किंवा मालाची हानी किंवा त्याचे झालेले नुकसान, याबाबतच्या जबाबदारीतून रेल्वे प्रशासनाला मुक्त करणारी, व्यक्त न करण्यात आलेली, एखादी शर्त ही, त्या कराराचा भाग असेल, आणि त्या शर्तीच्या अधीनतेने समुद्रातून वहनासाठी वापरण्यात आलेल्या जहाजाचे राष्ट्रीयत्व किंवा मालकी कोणतीही असली तरी, जर त्या जहाजाची व्यापारी नौवहन अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४) खाली नोंदणी करण्यात आली असती तर, आणि रेल्वे प्रशासन त्या जहाजाचा मालक असते तर, समुद्रातून वहन करताना प्रवाशाचा झालेला मृत्यू किंवा त्यास झालेली वैयक्तिक क्षती, किंवा मालाची झालेली हानी किंवा नुकसान यासाठी, व्यापारी नौवहन अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४) अन्वये रेल्वे प्रशासन ज्या मर्यादेपर्यंत जबाबदार ठरले असते, त्याच मर्यादेपर्यंत ते जबाबदार असेल आणि त्यापेक्षा कोणत्याही अधिक मर्यादेपर्यंत नव्हे.

(२) पोटकलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशी कोणतीही हानी, क्षती किंवा नुकसान हे समुद्रातून वहन करताना झाले आहे, हे सिद्ध करण्याचा भार त्या रेल्वे प्रशासनावर राहील.

बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

**११२.** (१) केंद्र शासन, या प्रकरणाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचनेद्वारे या प्रकरणातील नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता अशा नियमांत खालील-पैकी सर्व किंवा कोणत्याही बाबतीत उपबंध करता येतील त्या बाबी म्हणजे :—

(क) कलम ९८ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये रेल्वे प्रशासनाकडे सोपवण्यात आलेला माल आवेष्टित करण्याची रीत ;

(ख) कलम ९९, च्या पोटकलम (३) च्या प्रयोजनार्थ असलेला माल ; आणि

(ग) कलम १०३ च्या पोटकलम (१) अन्वये पाठवलेल्या मालाची हानी, विनाश, नुकसान, मालाचा ऱ्हास किंवा तो सुपूर्द न करणे याबद्दल रेल्वे प्रशासनाने भरावयाची जास्तीत जास्त रक्कम.

## प्रकरण बारावे

### अपघात

रेल्वे अपघाताची सूचना.

**११३.** (१) एखाद्या रेल्वेच्या चालनाच्या ओघात,—

(क) ज्यामध्ये मानवी जीवितहानी झाली आहे किंवा भारतीय दंड संहितेमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जबर दुखापत झाली आहे किंवा विहित करण्यात येईल अशी, संपत्तीला जबर हानी पोचली आहे असा कोणताही अपघात ; किंवा

(ख) ज्यांपैकी एक गाडी उतारुंचे वहन करणारी असेल अशा कोणत्याही गाड्यांची टक्कर; किंवा

(ग) उतारुंचे वहन करणारी कोणतीही गाडी किंवा अशा गाडीचा कोणताही भाग रुळा-वरून घसरणे ; किंवा

(घ) सामान्यतः उपरोक्तप्रमाणे, मानवी जीवितहानी किंवा जबर दुखापत करणारा किंवा संपत्तीला जबर क्षती पोचवणारा अशा वर्णनाचा कोणताही अपघात ; किंवा

(ङ) केंद्र शासन या बाबतीत, शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा इतर कोणत्याही वर्णनाचा कोणताही अपघात, घडला असेल अशा बाबतीत, जेथे अपघात घडला असेल त्या ठिकाणा-पासून सर्वात जवळ असलेला स्टेशन मास्तर किंवा, जेथे स्टेशन-मास्तर नसेल तेथे ज्या रेल्वेवर अपघात घडला असेल त्या रेल्वेचा त्या भागाचा प्रभारी रेल्वे कर्मचारी, विलंब न लावता, ज्याच्या अधिकारीक्षेत्रात अपघात घडला असेल त्या जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याला आणि पोलीस अधीक्षकाला आणि ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये तो अपघात घडला असेल त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला किंवा केंद्र शासन या बाबतीत नियुक्त करील अशा अन्य दंडाधिकाऱ्याला आणि पोलीस अधिकाऱ्याला अशा अपघाताची सूचना देईल.

(२) ज्याच्या अधिकारक्षेत्रात अपघात घडला असेल ते रेल्वे प्रशासन आणि अपघातात सापडलेली गाडी ज्याच्या मालकीची आहे ते रेल्वे प्रशासन सुद्धा विलंब न लावता राज्य शासनाला आणि अप-घाताच्या ठिकाणी ज्याचे अधिकारक्षेत्र आहे त्या आयुक्ताला अपघाताची सूचना देईल.

आयुक्ताद्वारे चौकशी.

**११४.** (१) ज्याचे पर्यवसान मानवी जीवितहानी किंवा प्रवाशाला कायम स्वरूपाची पूर्णतः किंवा अंशतः निःसमर्थता आणणारी जबर दुखापत किंवा रेल्वेच्या संपत्तीची जबर क्षती यात झाली आहे अशा, प्रवाशांना वाहून नेणाऱ्या गाडीला झालेल्या अपघाताची सूचना, कलम ११३ अन्वये मिळाल्या-नंतर, आयुक्त, शक्य असेल तितक्या लवकर, अपघात ज्याच्यामुळे घडला आहे त्या कारणांची चौकशी करण्याची त्याची इच्छा, ज्याच्या अधिकारक्षेत्रात अपघात घडला आहे त्या रेल्वे प्रशासनाला अधिसूचित करील व चौकशीची तारीख, वेळ व ठिकाण त्याच वेळी निश्चित करील व कळवील :

परंतु असे की, आयुक्तांच्या मते ज्याची चौकशी करणे आवश्यक आहे अशा कोणत्याही इतर अपघातांची चौकशी करण्याची त्याला मुभा असेल.

(२) जर कोणत्याही कारणामुळे अपघात घडल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, चौकशी करण्यास आयुक्त असमर्थ असेल तर तो त्यानुसार रेल्वे प्रशासनाला अधिसूचित करील.

रेल्वे प्रशासनाकडून चौकशी.

**११५.** कलम ११४ च्या पोटकलम (१) अन्वये आयुक्तांकडून चौकशी केली गेली नसेल किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये चौकशी करण्यास तो समर्थ असल्याचे आयुक्ताने रेल्वे प्रशासनाला कळवले असेल तर, ज्याच्या अधिकारक्षेत्रात अपघात घडला असेल ते रेल्वे प्रशासन, विहित कार्यपद्धती-नुसार चौकशी करवून घेईल.

११६. (१) एखाद्या रेल्वेवरील कोणत्याही अपघाताच्या कारणांनी या प्रकरणान्वये चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, आयुक्तास, खालील बाबींच्या संबंधात, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींच्या व्यतिरिक्त, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये खटल्याची संपरीक्षा करताना दिवाणी न्यायालयाकडे ज्या शक्ती निहित असतील, त्याही शक्ती असतील, त्या म्हणजे :— चौकशीसंबंधीच्या आयुक्तांच्या शक्ती.

(क) व्यक्तींना बोलावणे आणि त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे व त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवज प्रकट करण्यास व सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा प्राप्त करणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून सार्वजनिक अधिलेख किंवा त्यांच्या प्रती मागवणे ;

(ङ) विहित करण्यात येतील अशा कोणत्याही इतर बाबी.

(२) आयुक्त, या प्रकरणाअन्वये चौकशी करत असताना, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) हिच्या कलम १९५ व प्रकरण सव्वीसच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

११७. एखाद्या व्यक्तीने आयुक्तापुढील चौकशीमध्ये पुरावा देण्याच्या ओघात केलेले विधान, अशा विधानाद्वारे खोटा पुरावा देण्याबद्दलचा खटला खेरीजकरून, कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीला दायी असणार नाही, किंवा तिच्याविरुद्ध त्याचा उपयोग केला जाणार नाही : आयुक्तासमोर केलेली विधाने.

परंतु असे की, असे विधान—

(क) आयुक्ताने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना केले असले पाहिजे ; किंवा

(ख) चौकशीच्या विषय वस्तूशी संबंधित असे असले पाहिजे.

११८. कोणतेही रेल्वे प्रशासन किंवा या प्रकरणाअन्वये चौकशी करणारा आयुक्त विहित करण्यात येईल अशा रीतीने अशा व्यक्तींना चौकशीची सूचना देऊ शकेल, अशी कार्यपद्धती अवलंबू शकेल व अहवाल तयार करू शकेल. कार्यपद्धती इत्यादी.

११९. या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अपघाताची चौकशी करण्यासाठी, चौकशी आयोग अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३) अन्वये चौकशी आयोग नियुक्त करण्यात आला असेल तर, त्या अपघाताशी संबंधित प्रलंबित असलेली कोणतीही चौकशी, अन्वेषण किंवा इतर कारवाई पुढे चालू राहणार नाही आणि अशा चौकशीच्या संबंधातील सर्व अभिलेख किंवा इतर दस्तऐवज केंद्र शासन, या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याकडे अग्रेषित करण्यात येतील. चौकशी आयोग नेमण्यात आला असल्यास चौकशी, अन्वेषण, इत्यादी न करणे.

१२०. रेल्वेच्या मार्गात कलम ११३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल अशा स्वरूपाचा कोणताही अपघात घडल्यास ज्याच्या अधिकारितेत तो अपघात घडला असेल ते रेल्वे प्रशासन, अपघाताच्या कारणासंबंधी विहित करण्यात येईल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करू शकेल. अपघातासंबंधीची चौकशी कलम ११३ च्या कक्षेत समाविष्ट होत नाही.

१२१. प्रत्येक रेल्वे प्रशासन, केंद्र शासनाकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने आणि कालांतरांनी, रेल्वे वर घडणाऱ्या अपघातांचे मग त्यामध्ये कोणत्याही व्यक्तीला झालेल्या इजेवर इलाज करण्यात आलेला असो वा नसो-विवरणपत्र पाठवील. विवरणपत्रे.

१२२. (१) केंद्र शासनाला, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. या प्रकरणातील बाबींसंबंधी नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, या नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा——

(क) संपत्तीला पोचलेली क्षती कलम ११३ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये गंभीर समजण्यात येईल ;

(ख) कलम ११३ अन्वये द्यावयाच्या अपघातांच्या नोटिशीचे नमुने आणि अशा नोटिशींमध्ये अंतर्भूत करावयाचा अपघाताचा तपशील ;

(ग) अपघाताच्या प्रकारासह, त्या अपघातानंतर तात्काळ पाठवावयाच्या नोटिसा पाठवण्याची रीत ;

(घ) आयुक्त रेल्वे प्रशासन, रेल्वे कर्मचारी, पोलीस अधिकारी व दंडाधिकारी यांची अपघात घडल्यानंतरची कर्तव्ये ;

(ङ) या प्रकरणाखालील कोणत्याही, चौकशीसंबंधात ज्यांना नोटिसा पाठवावयाच्या त्या व्यक्ती अशा चौकशीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा चौकशीचा अहवाल तयार करण्याची रीत ;

(च) रेल्वे प्रशासनाने करावयाच्या अपघातांच्या कारणांच्या कलम १२० खालील चौकशीचे स्वरूप ;

(छ) रेल्वे प्रशासनाने कलम १२१ अन्वये पाठवावयाच्या अपघाताच्या विवरणपत्राचा नमुना व रीत .

## प्रकरण—तेरावे

## अपघातामुळे झालेले प्रवाशांचे मृत्यू व क्षती यासंबंधातील रेल्वे प्रशासनाचे दायित्व.

व्याख्या. १२३. या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपघात" याचा अर्थ, कलम १२४ मध्ये वर्णिलेल्या स्वरूपाचा अपघात, असा आहे ;

(ख) "अवलंबित" याच अर्थ, मृत प्रवाशाच्या पुढील नातेवाईकांपैकी कोणताही नातेवाईक, असा आहे ते असे,—

(एक) पत्नी, पती, मुलगा, व मुलगी आणि मृत प्रवासी अविवाहित किंवा अज्ञान असल्यास त्याचे पालक ;

(दोन) पालक, अज्ञान भाऊ किंवा अविवाहित बहिण, विधवा बहीण, विधवा सून आणि पूर्वमृत मुलाचे मृत प्रवाशावर पूर्णत: किंवा अंशत: अवलंबून असल्यास, अज्ञान बालक ;

(तीन) पूर्व मृत मुलीचे पूर्णत: मृत प्रवाशावर अवलंबून असल्यास, अज्ञान बालक;

(चार) मृत प्रवाशावर अवलंबन असलेले त्याचे पतृक आजाआजी.

[1][(ग्) "अश्लाघ्य घटना" याचा अर्थ,—

(१) कोणत्याही व्यक्तीने प्रवाशांचे वहन करणाऱ्या कोणत्याही गाडीत किंवा प्रतीक्षालयात किंवा सामान घरात किंवा आरक्षण किंवा तिकिट घरात किंवा प्लॅटफॉर्मवर किंवा रेल्वे स्थानकाच्या प्रसीमांमधील कोणत्याही ठिकाणी—

(एक) दहशतवादी व विघटनवादी कृत्ये (प्रतिबंधक) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २८) याच्या कलम ३ पोटकलम (१) च्या अर्थांतर्गत विघटनवादी कृत्ये करणे ; किंवा

(दोन) हिंसात्मक हल्ला किंवा भुरटी चोरी करणे किंवा दरवडा घालणे; किंवा

(तीन) दंगा, गोळीबार किंवा जाळपोळ यांना अटकाव न करणे,

(२) प्रवाशांचे वहन करणाऱ्या गाडीतुन कोणताही प्रवासी अकस्मात पडणे, असा आहे.]

दायित्वाची मर्यादा. १२४. रेल्वे गाडी चालवली जात असताना अपघात घडल्यास, मग तो अपघात म्हणजे एकतर ज्या गाड्यांमधील एक गाडी प्रवाशांचे वहन करणारी असेल अशा, दोन गाड्यांमधील टक्कर असेल किंवा प्रवाशांचे वहन करणारी गाडी रुळावरून घसरली असेल अथवा त्या गाडीला किंवा तिच्या कोणत्याही भागाला अन्य अपघात झाला असेल तेव्हा, क्षती पोचलेला किंवा हानी झालेला प्रवासी त्या संबंधात कारवाई करण्यास किंवा नुकसानभरपाई वसूल करण्यास ज्यामुळे हक्कदार ठरेल अशा तऱ्हेचे रेल्वे प्रशासनाकडून गैरकृत्ये किंवा हयगय किंवा कसूर झालेली असो वा नसो, रेल्वे प्रशासन, अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विहित करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत आणि फक्त अशा अपघातामुळे मरण पावलेल्या प्रवाशाच्या मरणामुळे झालेल्या नुकसानभरपाई एवढी आणि अशा अपघातामुळे झालेली व्यक्तीगत क्षती व प्रवाशाच्या मालकीच्या व त्याच्या बरोबर त्याच्या डब्यात किंवा गाडीत असलेल्या मालाची हानी, नाश, नुकसानी किंवा त्याचा ऱ्हास याबद्दल भरपाई देण्यास दायी असेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "प्रवासी" यामध्ये कामावर असलेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा समावेश होतो.

[2][अश्लाघ्य घटनेबाबतची भरपाई. १२४क. रेल्वे गाडी चालू असताना जर अश्लाघ्य घटना घडून आली तर त्यात रेल्वे प्रशासनाची कोणतीही चुकीची कृती, हयगय किंवा कसूर असली किंवा नसली तरीही त्यामुळे, ज्यास क्षती पोचली आहे असा प्रवासी किंवा जो मृत झाला आहे अशा प्रवाशांचा अवलंबिती, त्याबाबतीत कार्यवाही केली जाण्यासाठी व त्यासंबंधातील हानीच्या रकमेच्या वसुलीसाठी हक्कदार होईल तेव्हा, रेल्वे प्रशासन, इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, विहित करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा अश्लाघ्य घटनेच्या परिणामी प्रवाशांचा मृत्यू झाल्यामुळे किंवा त्याला क्षती पोचल्यामुळे झालेल्या नुकसानी पुरतीच भरपाई देण्यास पात्र असेल :

रेल्वे प्रशासना- कडून चौक-

---

१. १९९४ चा अधिनियम २८, कलम २ द्वारे खंड (क्) समाविष्ट करण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे नवीन कलम जादा दाखल करण्यात आले.

परंतु, एखादा प्रवासी मृत्युमुखी पडल्यास किंवा पुढील गोष्टींमुळे त्याला क्षती पोचल्यास, रेल्वे प्रशासनाकडून त्याला या कलमाखालील कोणतीही भरपाई देण्यात येणार नाही,---

(क) त्याने आत्महत्या केल्यास किंवा आत्महत्येचा प्रयत्न केल्यास;

(ख) स्वतःच क्षती ओढवून घेतलेली असल्यास;

(ग) त्याने स्वतःनेच गुन्हेगारी कृत्य केल्यास;

(घ) नशेत असताना किंवा भ्रमिष्टावस्थेत असताना त्याने कोणतेही कृत्य केल्यास;

(ङ) कोणतेही नैसर्गिक कारण किंवा रोग किंवा वैद्यकीय अथवा शस्त्रक्रियेसारखे उपचार केलेले असल्यास; मात्र, उपरोक्त अश्लाघ्य घटनेमुळे झालेल्या क्षतीमुळे असे उपचार करणे आवश्यक झालेले नसावेत.

स्पष्टीकरण.---या कलमाच्या प्रयोजनार्थ, "प्रवासी" या संज्ञेत,---

(एक) कर्तव्य करणारा रेल्वे कर्मचारी; आणि

(दोन) कोणत्याही तारखेस, प्रवाशांना वाहून नेणाऱ्या रेल्वेगाडीतून प्रवास करण्यासाठी वैध तिकीट किंवा वैध प्लॅटफॉर्म तिकीट खरेदी केलेले असून अश्लाघ्य घटनेला जी बळी पडली आहे अशी एखादी व्यक्ती,

यांचा अंतर्भाव आहे.]

१२५. (१) कलम १२४ [1][किंवा कलम १२४क] खालील भरपाईसाठी हक्कमागणी अधिकरणाकडे खालील व्यक्तींना अर्ज करता येईल,--- भरपाईसाठी अर्ज.

(क) जिला क्षती पोचली असेल किंवा नुकसान झाले असेल, अशी व्यक्ती, अथवा

(ख) या संबंधात अशा व्यक्तीकडून प्राधिकृत करण्यात आला असेल, असा कोणताही अभिकर्ता, अथवा

(ग) अशी व्यक्ती अज्ञान असेल तेव्हा, तिचे पालक, अथवा

(घ) अपघातामुळे [2][किंवा अश्लाघ्य घटनेमुळे] मृत्यू उद्भवला, असेल त्यावेळी मृत व्यक्तीचा कोणताही अवलंबित किंवा असा अवलंबित अज्ञान असेल त्यावेळी, त्याचा पालक.

(२) या कलमाखालील भरपाईसाठी अवलंबिताकडून करण्यात आलेला प्रत्येक अर्ज अन्य प्रत्येक अवलंबिताच्या लाभार्थ असेल.

१२६. (१) कलम १२५ खाली भरपाईसाठी अर्ज केलेल्या व्यक्तीला अंतरिम अनुतोष पाहिजे असेल रेल्वे प्रशासनाकडून त्यावेळी ती रेल्वे प्रशासनाकडे, त्या कलमाखाली केलेल्या अर्जाच्या प्रतीसह अंतरिम अनुतोष मिळावा म्हणून अर्ज करू शकेल. अंतरिम अनुतोष.

(२) पोटकलम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज मिळाल्यानंतर आणि त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अर्जदाराला तात्काळ अनुतोष देऊ करणे आवश्यक आहे, अशी परिस्थिती असल्याची रेल्वे प्रशासनाची खात्री पटली तर, ते कलम १२४ [3][किंवा कलम १२४क] अन्वये भरपाई-पोटी प्रदेय असणारी प्रत्यक्ष रक्कम हक्कमागणी अधिकरणाकडून निश्चित केली जाईपर्यंत, क्षती पोचलेल्या किंवा नुकसान झालेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा मृत्यू अपघातामुळे झाला असेल त्याबाबतीत, मृत व्यक्तीच्या कोणत्याही अवलंबिताला, असा अनुतोष देण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी रक्कम देईल. अर्थात ती विहित करण्यात येईल अशा दरानी देय असलेल्या भरपाईच्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही, अशा रीतीने दिली जाईल.

(३) रेल्वे प्रशासन, शक्य तितक्या लवकर, पोटकलम (२) खाली अंतरिम अनुतोष देण्यासंबंधी आदेश दिल्यानंतर, त्याची प्रत अधिकरणाकडे पाठवील.

(४) पोटकलम (२) खाली रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आलेली कोणतीही रक्कम, भरपाईपोटी प्रदेय असलेल्या रकमेचे निर्धारण करताना विचारात घेतली जाईल.

१२७. (१) करण्यात आले असतील अशा नियमांच्या अधीनतेने कोणत्याही क्षतीपोटी प्रदेय असलेल्या भरपाईचे दर हक्कमागणी अधिकरणाकडून निर्धारित करण्यात येतील. कोणतीही क्षती किंवा मालाचे नुकसान या संबंधातील भरपाई निर्धारित करणे.

(२) मालाच्या कोणत्याही नुकसानीपोटी प्रदेय असलेली भरपाई, ही प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेतल्यानंतर हक्कमागणी अधिकरणाला वाजवी वाटेल अशा रीतीने निर्धारित करण्यात येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम, २८ कलम ४ (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

विवक्षित अधिकारासंबंधातील व्यावृत्ती

१२८. (१) कलम १२४ [१][किंवा कलम १२४क] अन्वये भरपाईची हक्कमागणी करण्याच्या कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारांचा, कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) किंवा त्या काळापुरता अमलात असलेला कोणताही कायदा या अन्वये भरपाई वसूल करण्याच्या अशा कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारावर परिणाम होणार नाही ; परंतु एकाच अपघाताबाबत एकाहून अधिक वेळा भरपाईची मागणी करण्यास कोणतीही व्यक्ती हक्कदार असणार नाही.

(२) मृत्यू किंवा व्यक्तिगत क्षती किंवा संपत्तीचे नुकसान यासाठी भरपाई देण्याची तरतूद करणारी कोणतीही संविदा किंवा योजना या अन्वये प्रदेय भरपाई किंवा कोणत्याही विमा पॉलिसीअन्वये प्रदेय कोणतीही रक्कम याची हक्कमागणी करण्याच्या कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारावर, पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

या प्रकरणातील बाबीसंबंधी नियम करण्याची शक्ती.

१२९. (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, असे नियम खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करू शकतील, त्या अशा,—

(क) मृत्यूसाठी प्रदेय भरपाई ;

(ख) ज्यासाठी भरपाई देण्यात येईल त्या क्षतीचे स्वरूप आणि अशा भरपाईची रक्कम.

## प्रकरण—चौदावे

## कामाचे तास आणि विश्रांतीचा कालावधी यांचे विनियमन

व्याख्या.

१३०. या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,

(क) रेल्वे कर्मचाऱ्याची नोकरी, ती अपवर्जित केली असेल किंवा आवश्यकरीत्या खंडित किंवा कष्टप्रद म्हणून घोषित केलेली असेल ते खेरीज करून, अखंडित समजण्यात येईल ;

(ख) रेल्वे कर्मचाऱ्याची नोकरी, बारा तासांच्या दौऱ्याच्या कामात (सरासरी लागोपाठच्या तासांहून अधिक) रेल्वे कर्मचाऱ्याच्या दैनंदिन कामांच्या तासांमध्ये, सर्वसाधारणत: एकूण पन्नास टक्के किंवा अधिक विसावा कालावधींचा (त्यामध्ये किमान एका तासाचा अशा एका कालावधीचा किंवा प्रत्येक किमान अर्ध्या तासाचा अशा दोन कालावधींचा) समावेश होतो, या कारणावरून विहित प्राधिकरणाने आवश्यकरीत्या खंडित असल्याचे घोषित केले असेल त्यावेळी ती तशी असल्याचे समजण्यात येईल, ज्या दरम्यान रेल्वे कर्मचारी कामावरही असू शकेल, परंतु त्यावेळी त्याच्याकडून शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याची किंवा अविरत अवधानाची अपेक्षा केली जाणार नाही.

(ग) रेल्वे कर्मचाऱ्यांची नोकरी, ती खालीलपैकी कोणत्याही एका प्रवर्गातील असल्यास, "अपवर्जित" समजण्यात येईल, ते प्रवर्ग असे,—

(एक) व्यवस्थापकीय किंवा गोपनीय नात्याने नोकरीत असलेले रेल्वे कर्मचारी;

(दोन) कोणत्याही सशस्त्र पोलीस बलांच्या अनुशासनासारख्या अनुशासनाच्या अधीनतेने सशस्त्र पहारेकरी किंवा इतर कर्मचारी वर्ग ;

(तीन) तांत्रिक प्रशिक्षण किंवा विद्याविषयक शिक्षण देणाऱ्या रेल्वे शाळांचा कर्मचारी वर्ग;

(चार) नियमांन्वये पर्यवेक्षकीय म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येईल असा इतर कर्मचारी वर्ग;

(पाच) विहित करण्यात येतील असे कर्मचाऱ्यांचे इतर प्रवर्ग ;

(घ) रेल्वे कर्मचाऱ्याची नोकरी, ती श्रमसाध्य असून त्यात फारच थोडी विश्रांती मिळते किंवा बिलकुल विश्रांती मिळत नाही आणि सतत एकाग्र राहून किंवा भरपूर शारीरिक कष्ट करावे लागतात, या कारणावरून ती विहित प्राधिकरणाकडून "कष्टप्रद" असल्याचे घोषित करण्यात आल्यानंतर ती तशी असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण विवक्षित रेल्वे कर्मचाऱ्यांना लागू होणार नाही.

१३१. कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) किंवा खाणी अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३५) किंवा रेल्वे संरक्षण बल अधिनियम, १९५७ (१९५७ चा २३) किंवा व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४) ज्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला लागू होतो त्याला या प्रकरणातील काहीही लागू होणार नाही.

कामाच्या तासांची मर्यादा.

१३२. (१) ज्याची नोकरी आवश्यकरीत्या खंडित आहे अशा रेल्वे कर्मचाऱ्याला कोणत्याही आठवड्यात पंच्याहत्तर तासांपेक्षा अधिक काळ काम करावे लागणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम २८, कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(२) ज्याची नोकरी अखंडित आहे अशा रेल्वे कर्मचाऱ्याला चौदा दिवसांच्या दोन आठवड्यांच्या कालावधीत आठवड्याला सरासरी चोपन्न तासांपेक्षा अधिक तास काम करावे लागणार नाही.

(३) ज्यांची नोकरी कष्टप्रद आहे अशा रेल्वे कर्मचाऱ्याला चौदा दिवसांच्या दोन आठवड्यांच्या कालावधीत आठवड्याला सरासरी पंचेचाळीस तासांपेक्षा अधिक तास काम करावे लागणार नाही.

(४) विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने, रेल्वे गाडी सामान्यपणे चालविली जात असताना, त्यामध्ये येणारा गंभीर व्यत्यय टाळण्यासाठी किंवा प्रत्यक्ष किंवा आशंकित अपघाताच्या प्रकरणी किंवा रेल्वे किंवा रूळयान यांवर तातडीने काम करणे आवश्यक असेल अशा वेळी किंवा जीची पूर्वकल्पना करणे शक्य नव्हते किंवा जिला प्रतिबंध करणे शक्य नव्हते, अशा कोणत्याही आणी-बाणीत किंवा कामाचा अपवादात्मक ताण असेल अशा इतर प्रकरणी, रेल्वे कर्मचाऱ्यांना, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) च्या उपबंधांपासून, तात्पुरती सूट देणे आवश्यक आहे असे विहित प्राधिकाऱ्याचे मत असेल तर, विहित प्राधिकारी रेल्वे कर्मचाऱ्यांना पोटकलम (१) किंवा पोट-कलम (२) किंवा पोटकलम (३) च्या उपबंधांतून तात्पुरती सूट देऊ शकेल :

परंतु असे की, अशी सूट देण्यामुळे कोणत्याही पोटकलमा मध्ये निर्दिष्ट केलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याच्या रोजगाराच्या तासांमध्ये वाढ होत असेल तर, कामाच्या जादा तासांसाठी त्याला त्याच्या नेहमीच्या दराच्या कमीत कमी दुप्पट इतक्या दराने अतिकालिक भत्ता प्रदान करण्यात येईल.

**नियतकालिक विश्रांती देणे.**

१३३. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, रेल्वे कर्मचारी,—

(क) ज्याची नोकरी तणावपूर्ण किंवा अखंडित आहे, त्याला रविवारी सुरू होणाऱ्या प्रत्येक आठवड्यासाठी, किमान लागोपाठ तीस तासांची विश्रांती देण्यात येईल ;

(ख) ज्याची नोकरी मूलतः खंडित आहे, त्याला रविवारी सुरू होणाऱ्या प्रत्येक आठवड्याला संपूर्ण रात्र धरून किमान लागोपाठ चोवीस तासांची विश्रांती देण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(एक) इंजिनाचे किंवा वाहतूक चालनाचे नियंत्रण करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला, प्रत्येक महिन्याला, प्रत्येकी किमान तीस लागोपाठचे तास असलेले निदान चार कालावधी किंवा संपूर्ण रात्र धरून प्रत्येकी किमान बावीस लागोपाठचे तास असलेले निदान पाच कालावधी इतकी विश्रांती देण्यात येईल ;

(दोन) केंद्र शासनाला, नियमांद्वारे, पोटकलम (१) अन्वये घालून दिलेल्या प्रमाणापेक्षा कमी विश्रांतीचे कालावधी कोणत्या कर्मचाऱ्यांना देता येईल हे ते आणि त्यांचा अवधी, विनिर्दिष्ट करता येईल.

(३) यासंबंधात करता येतील अशा नियमांच्या अधीनतेने, कलम १३२ च्या पोटकलम (४) मध्ये उल्लेखिलेली परिस्थिती प्रत्यक्षात आहे असे विहित प्राधिकरणाचे मत असेल तर, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला, पोटकलम (१) च्या किंवा पोटकलम (२) च्या खंड (एक) च्या उपबंधातून, ते सूट देऊ शकेल :

परंतु, अशा प्रकारे सूट देण्यात आलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याला, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत, त्याने जे कालावधी गमावले असतील त्यापोटी बदली विश्रांती कालावधी देण्यात येतील.

**रेल्वे कर्मचाऱ्याने कामावर राहणे.**

१३४. या प्रकरणातील किंवा याखाली करण्यात आलेल्या नियमांतील कोणत्याही गोष्टीमुळे, रेल्वे कर्मचाऱ्याच्या कार्यमुक्तीसाठी उचित उपबंध करण्यात आला असेल तेथे, त्याला कार्यमुक्त करण्यात आल्याखेरीज, काम सोडून जाण्याचा प्राधिकार त्याला मिळणार नाही.

**रेल्वे श्रमिकांचे पर्यवेक्षक.**

१३५. (१) यासंबंधात करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने केंद्र शासनाला रेल्वे श्रमिकांचे पर्यवेक्षक नियुक्त करता येतील.

(२) रेल्वे श्रमिकांच्या पर्यवेक्षकांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील—

(एक) या प्रकरणाच्या उपबंध किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधाचे यथोचितरीत्या पालन केले जात आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी रेल्वेची पाहणी करणे; आणि

(दोन) विहित करण्यात आली असतील अशी अन्य कार्ये पार पाडणे.

(३) रेल्वे श्रमिकांचा पर्यवेक्षक हा, कलमे ७ व ९ यांच्या प्रयोजनार्थ आयुक्त असल्याचे समजण्यात येईल.

**या प्रकरणातील बाबींसंबंधात नियम करण्याची शक्ती.**

१३६. (१) केंद्र शासनाला, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे खालील सर्व किंवा त्यांपैकी काही बाबींसाठी नियम करता येतील, त्या अशा :—

(क) कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यांची नोकरी आवश्यकरीत्या मधून मधून खंडित होणारी किंवा कष्टप्रद असल्याचे घोषित करू शकेल अशी प्राधिकरणे;

(ख) अशा कोणत्याही घोषणेविरुद्ध करावयाची अपिले आणि, असे कोणतेही अपील कोणत्या रीतीने व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने दाखल करता येईल किंवा त्याची सुनावणी करता येईल ती रीत व त्या शर्ती ;

(ग) कलम १३० च्या खंड (ग) च्या उपखंड (चार) व (पाच) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात येतील असे कर्मचाऱ्यांचे प्रवर्ग ;

(घ) कलम १३२ च्या पोट कलम (४) किंवा कलम १३२ च्या पोटकलम (३) अन्वये ज्यांच्याकडून सूट देण्यात येऊ शकेल असे प्राधिकारी;

(ङ) कलम (घ) मध्ये उल्लेखिलेल्या प्राधिकाऱ्यांकडून शक्तीचे प्रत्यायोजन ;

(च) कलम १३३ च्या पोटकलम (२) चा खंड (दोन) ज्यांना लागू होतो ते रेल्वे कर्मचारी आणि त्यांना द्यावयाच्या विश्रांतीचे कालावधी ;

(छ) रेल्वे श्रमिकांच्या पर्यवेक्षकांची नियुक्ती आणि त्यांची कार्ये.

## प्रकरण पंधरावे

## शास्ती व अपराध

कपटाच्या उद्देशाने प्रवास करणे किंवा योग्य पासाविना वा तिकिटाविना प्रवास करण्याचा प्रयत्न करणे.

१३७. (१) जर एखादी व्यक्ती रेल्वे प्रशासनाला फसवण्याच्या उद्देशाने,—

(क) कलम ५५ चे उल्लंघन करून कोणत्याही डब्यात प्रवेश करील किंवा त्यात राहील, किंवा

(ख) आधीच्या प्रवासासाठी वापरण्यात आलेला एखादा एकेरी पास किंवा एकेरी तिकीट किंवा परतीच्या तिकिटाच्या बाबतीत ज्याचा अर्धा भाग अशा प्रकारे अगोदरच वापरण्यात आला आहे असे तिकीट वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील तर,

त्या व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील :

परंतु, एतद्विरुद्ध न्यायालयाच्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाच्या विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी शिक्षा किमान पाचशे रुपयांच्या द्रव्यदंडापेक्षा कमी असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली व्यक्ती ही तिने जितक्या अंतराचा प्रवास केला असेल त्यासाठी सामान्य एकेरी भाड्याखेरीज, पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेला जादा आकार किंवा जेथून तिचा प्रवास सुरू झाला त्या स्थानकासंबंधात कोणतीही शंका असल्यास, गाडी मुळात ज्या स्थानकापासून सुरू झाली असेल तेथपासूनचे सामान्य एकेरी भाडे किंवा गाडीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची तिकिटे गाडी मुळात सुरू होते त्या ठिकाणापासून तपासली असल्यास अशा तऱ्हेने जेथे तिकीटे तपासली असतील त्या ठिकाणापासूनचे सामान्य एकेरी भाडे किंवा त्यांची एकाहून अधिक वेळा तपासणी झाली असल्यास, जेथे शेवटची तपासणी झाली असेल त्या ठिकाणापासूनचे सामान्य एकेरी भाडे देण्यासही दायी असेल.

(३) पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेला जादा आकार त्या पोटकलमात उल्लेखिलेले सामान्य, एकेरी भाडे किंवा पन्नास रुपये यांपैकी जे अधिक असेल तितक्या रकमेइतके असेल.

(४) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ६५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, गुन्हेगाराला सिद्धदोष ठरविणारे न्यायालय असे निर्देशित करू शकेल की, न्यायालयाने बसविलेला द्रव्यदंड भरण्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा मुदतीचा कारावास भोगावा लागेल.

योग्य पासाविना किंवा तिकिटाविना अथवा प्राधिकृत अंतरापलीकडे प्रवास करण्याबद्दल जादा आकार किंवा भाडे यांची आकारणी.

१३८. (१) कोणत्याही प्रवाशाने,—

(क) गाडीत असताना किंवा गाडीतून उतरल्यानंतर, आपला पास किंवा तिकीट, कलम ५४ अन्वये तपासणीसाठी मागितल्यानंतर लगेच सादर करण्यात किंवा देण्यात कसूर केली किंवा नकार दिला, किंवा

(ख) कलम ५५ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून गाडीतून प्रवास केला तर,

या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यांकडून मागणी होताच, त्याने भरलेले भाडे व त्याने केलेल्या प्रवासापोटी प्रदेय भाडे यातील फरक आणि पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेला जादा आकार देण्यास तो दायी असेल.

(२) जर एखादा प्रवासी,—

(एक) त्याने गाडीच्या ज्या वर्गाचा पास मिळविला आहे किंवा तिकीट विकत घेतले आहे त्यापेक्षा वरच्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करील किंवा तसा प्रयत्न करील, किंवा

(दोन) त्याच्या पासाद्वारे किंवा तिकीटाद्वारे प्राधिकृत केलेल्या ठिकाणापलीकडे प्रवास करील, तर

त्याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून मागणी होताच त्याने भरलेले भाडे त्याने केलेल्या प्रवासापोटी प्रदेय भाडे यातील फरक आणि पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेला जादा आकार देण्यास तो दायी असेल.

(३) जादा आकार हा, पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) अन्वये प्रदेय रक्कम किंवा पन्नास रुपये यांपैकी जी रक्कम जास्त असेल, त्या रकमेइतका असेल :

परंतु, ह्या प्रवाशाकडे कलम ५५ च्या पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेले प्रमाणपत्र असेल तर, कोणताही जादा आकार द्यावा लागणार नाही.

(४) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला जादा आकार व भाडे किंवा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेला कोणत्याही भाड्यातील फरक भरण्यात दायी असलेल्या कोणत्याही प्रवाशाने, प्रकरणपरत्वे, या पोटकलमांपैकी कोणत्याही पोटकलमान्वये त्यासाठी मागणी करण्यात आल्यानंतर, ती भरण्यात कसूर केली किंवा नकार दिला, तर, यासंबंधात रेल्वे प्रशासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला, कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याकडे, किंवा प्रकरणपरत्वे, प्रथम वा द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याकडे देय असलेली रक्कम ही जणू काही द्रव्यदंड असल्याप्रमाणे, तिच्या वसुलीसाठी अर्ज करता येईल आणि ही रक्कम देय असल्याबद्दल दंडाधिकाऱ्याची खात्री पटल्यास, तो ती वसूल करण्याचा आदेश देईल आणि त्याला असाही आदेश देता येईल की, रक्कम भरण्यास दायी असलेल्या व्यक्ती ती भरण्यात कसूर केल्यास, त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल, परंतु किमान दहा दिवसांपेक्षा कमी असणार नाही, अशा मुदतीचा कोणत्याही प्रकारचा कारावास भोगावा लागेल.

(५) पोटकलम (४) खाली वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम, ती जशी आणि ज्यावेळी वसूल केली जाईल त्यावेळी रेल्वे प्रशासनाकडे भरण्यात येईल.

**१३९.** जी कोणतीही व्यक्ती कलम १३८ मध्ये उल्लेखिलेले भाडे व जादा आकार भरण्यात कसूर करील किंवा नाकारील त्या व्यक्तीला रेल्वे प्रशासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेले असेल असा कोणताही कर्मचारी, डब्यातून काढून लावू शकेल; अशा प्रकारे डब्यातून काढून लावण्यासाठी असा कर्मचारी इतर कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेऊ शकेल.

व्यक्तींना काढून लावण्याची शक्ती.

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे वरच्या वर्गाच्या डब्यातून काढून लावलेल्या व्यक्तीला, ती ज्या वर्गाचा पास किंवा तिकिट धारण करीत असेल त्या वर्गाच्या डब्यातून तिचा प्रवास चालू ठेवण्यास प्रतिबंध होतो, असे मानण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, एखाद्या महिलेबरोबर किंवा एखाद्या मुलाबरोबर पुरुष प्रवासी नसेल तर, त्या महिलेने किंवा मुलाने ज्या स्थानकापासून प्रवासास प्रारंभ केला असेल ते स्थानक किंवा जंक्शन किंवा अंतिम स्थानक किंवा एखाद्या नागरी जिल्ह्याचे मुख्यालय असलेले स्थानक यांखेरीज अन्य ठिकाणी त्या महिलेस किंवा मुलास गाडीतून काढून लावण्यात येणार नाही आणि अशा प्रकारे फक्त दिवसाच गाडीतून काढून लावण्यात येईल.

**१४०.** (१) कलम १३७ किंवा कलम १३८ खालील अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरविताना, एखाद्या न्यायालयाला जेव्हा असे आढळून यईल की, त्या व्यक्तीस तो अपराध करण्याची किंवा तो अपराध करण्याचा प्रयत्न करण्याची सवय जडली आहे आणि त्या व्यक्तीला चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र करून देण्यास फर्मावणे आवश्यक किंवा इष्ट आहे, असे न्यायालयाचे मत असेल, तेव्हा असे न्यायालय त्या व्यक्तीला शिक्षा देताना त्यास योग्य वाटेल अशा रकमेसाठी किंवा जास्तीतजास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिभूतींसह किंवा त्याविना असे बंधपत्र निष्पादित करण्यास फर्मावू शकेल.

विवक्षित प्रकरणी चांगल्या वर्तणुकीबद्दल प्रतिभूती.

(२) आपल्या पुनरीक्षणाच्या शक्तींचा वापर करताना अपील न्यायालय किंवा उच्च न्यायालयसुद्धा या कलमाखालील आदेश देऊ शकेल.

**१४१.** जर एखादा प्रवासी किंवा इतर कोणतीही व्यक्ती प्रवासी आणि गाडीचे प्रभारी रेल्वे कर्मचारी यांच्यामधील दळणवळणासाठी रेल्वे प्रशासनाने पुरवलेल्या कोणत्याही साधनाचा वाजवी किंवा पुरेशा कारणाशिवाय उपभोग करील किंवा त्यामध्ये हस्तक्षेप करील, तर त्याला एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील :

एखाद्या गाडीतील दळणवळणाच्या साधनांमध्ये विनाकारण हस्तक्षेप करणे.

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या एतद्विरुद्धच्या विशेष आणि पर्याप्त कारणांच्या अभावी, एखादा प्रवासी, वाजवी व पुरेशा कारणाशिवाय, रेल्वे प्रशासनाने पुरवलेल्या कोणत्याही धोक्याच्या साखळीचा वापर करील तर, त्या व्यक्तीला :—

(क) पहिल्या अपराधासाठी ती सिद्धदोष ठरली असेल अशा बाबतीत, पाचशे रुपये द्रव्यदंडाची ; आणि

(ख) दुसऱ्या व नंतरच्या अपराधाबद्दल ती सिद्धदोष ठरली असेल अशा बाबतीत, तीन महिन्यांच्या कारावासाची अशी किमान शिक्षा देण्यात येईल.

१४२. (१) जी व्यक्ती, रेल्वे कर्मचारी किंवा याबाबतीत रेल्वे प्रशासनाने प्राधिकृत केलेला अभिकर्ता नसेल, अशा एखाद्या व्यक्तीने, जर दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्यावर प्रवास करणे शक्य व्हावे म्हणून,—

(क) एखादे तिकीट किंवा परतीच्या तिकिटाचा कोणताही अर्धा भाग विकेल किंवा विकण्याचा प्रयत्न करील तर, किंवा

(ख) ज्या तिकिटावर एखादे आसन किंवा शायिका राखून ठेवण्यात आली आहे ते तिकीट किंवा परतीच्या तिकिटाचा कोणताही अर्धा भाग किंवा मुदती तिकीट आपल्या ताब्यातून वेगळे करील किंवा करण्याचा प्रयत्न करील तर,

त्या व्यक्तीला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि तिने विकले असेल किंवा विकण्याचा प्रयत्न केला असेल किंवा आपल्या ताब्यातून वेगळे केले असेल किंवा वेगळे करण्याचा प्रयत्न केला असेल असे ते तिकीटसुद्धा जप्त केले जाईल.

(२) रेल्वे कर्मचारी नसेल अशा किंवा रेल्वे प्रशासनाने याबाबतीत अभिकर्ता म्हणून प्राधिकृत केलेले नसेल अशा, इतर कोणत्याही व्यक्तीकडून एखाद्या व्यक्तीने, पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही तिकीट खरेदी केल्यास किंवा त्या पोटकलमाच्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तिकिटाचा ताबा मिळवल्यास, तिला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाचशे रुपयांपर्यन्त असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल आणि जर उपरोक्त कोणत्याही तिकिटाची खरेदीदार किंवा धारण व्यक्ती त्या तिकिटावर प्रवास करील किंवा प्रवास करण्याचा प्रयत्न करील तर, तिने खरेदी केले असेल किंवा मिळवले असेल असे तिकीट जप्त केले जाईल आणि ती योग्य तिकीट नसताना प्रवास करीत असल्याचे मानण्यात येईल आणि कलम १३८ अन्वये कार्यवाही केली जाण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाच्या विशेष व पुऱ्या अशा तद्विरुद्ध कारणांच्या अभावी, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील शिक्षा दोनशे पन्नास रुपयांच्या द्रव्यदंडापेक्षा कमी असणार नाही.

१४३. (१) रेल्वे कर्मचारी किंवा यासंबंधात प्राधिकृत अभिकर्ता नसलेली जी कोणतीही व्यक्ती,—

(क) रेल्वेतून किंवा गाडीतून राखीव जागेतून प्रवास करण्यासाठी तिकिटे प्राप्त करून ती पुरवण्याचा व्यवसाय करील, किंवा

(ख) स्वतः किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत असा कोणताही व्यवसाय करण्याच्या हेतूने तिकिटे खरेदी करील वा त्यांची विक्री करील अथवा विक्री वा खरेदी करण्याचा प्रयत्न करील,

ती व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या अथवा दोन्ही शिक्षास पात्र असेल आणि तिने अशा रीतीने प्राप्त केलेली, पुरवलेली, खरेदी केलेली, विकलेली अथवा खरेदी वा विक्री करण्याचा प्रयत्न केलेली तिकिटेही ती गमाविल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये उल्लेख करावयाच्या विशेष व पुरेशा तद्विरुद्ध कारणांच्या अभावी, अशी शिक्षा एक महिन्याच्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पाच हजार रुपयांच्या द्रव्यदंडा-पेक्षा कमी असणार नाही.

(२) या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, मग तो अपराध झालेला असो वा नसो, त्या अपराधासाठी उपबंधित करण्यात आली असेल [illegible] शिक्षा होईल.

१४४. (१) रेल्वे प्रशासनाने या संबंधात दिलेल्या लायसनाच्या अटी व शर्ती याअन्वये व [illegible]सार खेरीजकरून कोणत्याही व्यक्तीने कोणतीही रुढी म्हणून याचना केली किंवा कोणत्याही रेल्वेच्या [illegible] किंवा रेल्वेच्या कोणत्याही भागात कोणत्याही वस्तूची फेरीने विक्री केली किंवा ती विक्रीसाठी [illegible]ली तर, ती एका वर्षापर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या किंवा दोन हजार रुपयां[illegible] असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पर्याप्त कारणांच्या [illegible]वी, अशी शिक्षा एक हजार रुपयांच्या द्रव्यदंडापेक्षा कमी असणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही रेल्वेच्या डब्यात किंवा रेल्वे स्थानकावर भीक मागितली [illegible] पोटकलम (१) अन्वये उपबंधित केलेल्या शिक्षेस ती पात्र असेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीला, यासंबंधात [illegible] करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून किंवा असा रेल्वे कर्मचारी जिला मदतीसाठी [illegible]ल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून, रेल्वे डब्यातून किंवा रेल्वेच्या कोणत्याही भागातून, किंवा [illegible]परत्वे, रेल्वे स्थानकातून काढून लावता येईल.

१४५. जर एखादी व्यक्ती रेल्वेच्या कोणत्याही डब्यात किंवा रेल्वेच्या कोणत्याही भागात,— दारुची धुंदी किंवा उपद्रव.

(क) नशा चढलेल्या अवस्थेत असेल; किंवा

(ख) कोणताही उपद्रव देईल किंवा असभ्यपणाची कृती करील; किंवा शिवराळ व अश्लील भाषा वापरील ; किंवा

(ग) रेल्वे प्रशासनाकडून पुरविण्यात आलेल्या कोणत्याही आरामदायी सुविधांमध्ये, कोणत्याही प्रवाशाच्या आरामशीर प्रवासावर परिणाम होईल अशा रीतीने हेतुपुरस्सर किंवा कारणाशिवाय हस्तक्षेप करील,

तिला कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून रेल्वेमधून काढून लावले जाऊ शकेल आणि तिचा पास किंवा तिकीट जप्त केले जाईलच पण त्याशिवाय सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या आणि पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेसही ती पात्र होईल :

परंतु असे की, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या तद्‌विरुद्ध विशेष व पर्याप्त कारणांच्या अभावी अशी शिक्षा,—

(क) पहिल्या अपराधाच्या दोषसिद्धीच्या बाबतीत, शंभर रुपये द्रव्यदंड ; आणि

(ख) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाच्या दोषसिद्धीच्या बाबतीत, एक महिन्याचा कारावास व दोनशे पन्नास रुपये द्रव्यदंड, यापेक्षा कमी असणार नाही.

१४६. जर एखादी व्यक्ती, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला त्याचे कर्तव्य बजावण्यामध्ये हेतुपुरस्सर अडथळा किंवा प्रत्यवाय आणील, तर तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील. रेल्वे कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात अडथळा आणणे.

१४७. (१) जर कोणत्याही व्यक्तीने रेल्वेच्या कोणत्याही भागावर किंवा भागामध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश केला, किंवा अशा भागात कायदेशीरपणे प्रवेश केल्यानंतर अशा संपत्तीचा तिने गैरवापर केला किंवा तेथून निघून जाण्यास नकार दिला तर, तिला सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल अशा कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल. अशा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील: अतिचार व अतिचारापासून परावृत्त होण्यास नकार देणे.

परंतु असे की, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या तद्‌विरुद्ध विशेष व पर्याप्त कारणांच्या अभावी अशी शिक्षा पाचशे रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेपेक्षा कमी असणार नाही.

(२) पोट कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून किंवा असा रेल्वे कर्मचारी त्याच्या सहाय्यासाठी बोलावील अशा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून, काढून लावता येईल.

१४८. भरपाईसाठी कलम १२५ अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जात कोणतेही खोटे निवेदन केले किंवा जे खोटे असल्याचे तिला माहीत असेल किंवा ते खोटे आहे असा तिचा विश्वास असेल अथवा ते खरे नाही असा तिचा विश्वास असेल तेव्हा, तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. भरपाईच्या अर्जात खोटे निवेदन केल्याबद्दल शास्ती.

१४९. जर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही प्रेषित मालाची हानी, नाश, नुकसान, ऱ्हास किंवा नासुपूर्दगी यापोटी रेल्वे प्रशासनाकडून भरपाईची मागणी करताना, खोटा दावा केला किंवा जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा तो खोटा आहे असा तिचा विश्वास असेल किंवा तो खरा आहे असा तिचा विश्वास नसेल तेव्हा तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षांस ती पात्र असेल. भरपाईसाठी खोटा दावा करणे.

१५०. (१) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीने बेकायदेशीरपणे,— गाडीचा दुर्भावपूर्वक नाश करणे किंवा नाश करण्याचा प्रयत्न करणे.

(क) कोणत्याही रेल्वेवर किंवा रेल्वे पलीकडे कोणतेही लाकूड, दगड किंवा अन्य पदार्थ वा वस्तू ठेवली वा फेकली; अथवा

(ख) कोणत्याही रेल्वेच्या मालकीचा रुळ, स्लीपर किंवा अन्य पदार्थ वा वस्तू घेतली, काढून टाकली, सैल केली किंवा अन्यत्र हलवली; अथवा

(ग) कोणत्याही रेल्वेच्या मालकीचे कोणतेही सांधे किंवा इतर यंत्रसामग्री फिरवली, अथवा हलवली, सैल केली वा तिची दिशा बदलली ;

(घ) कोणत्याही रेल्वेवरील वा रेल्वेजवळील कोणताही सिग्नल वा दिवा दाखवला किंवा लपविला वा हलवला; अथवा

(ङ) कोणत्याही रेल्वेसंबंधात कोणतीही अन्य कृती वा गोष्ट केली वा करवून घेतली वा करण्याचा प्रयत्न केला ;

आणि तसे करताना, रेल्वेवर प्रवास करणाऱ्या किंवा त्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीची सुरक्षितता धोक्यात आणण्याचा तिचा उद्देश असेल किंवा तसे होण्याची शक्यता असण्याचे तिला माहित असेल तर, तिला जन्मठेपेची किंवा दहा वर्षांपर्यंतच्या मुदतीची असू शकेल अशा सश्रम कारावासाची शिक्षा होईल :

परंतु असे की, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पर्याप्त कारणांच्या अभावी, एखाद्या व्यक्तीला सश्रम कारावासाची शिक्षा करण्यात येईल तेव्हा, असा कारावास,—

(क) पहिल्या अपराधाच्या बाबतीत, तीन वर्षांपेक्षा, आणि

(ख) दुसऱ्या वा नंतरच्या अपराधाच्या बाबतीत, सात वर्षांपेक्षा कमी असणार नाही.

(२) जर कोणत्याही व्यक्तीने पोटकलम (१) च्या कोणत्याही खंडामध्ये निर्देशिलेली कोणतीही कृती वा गोष्ट बेकायदेशीरपणे,—

(क) कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केली आणि अशी कृती व गोष्ट केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून आला ; किंवा.

(ख) अशी कृती वा गोष्ट, ही इतकी निश्चितप्राय धोकादायक आहे की, कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून येण्याची सर्वतोपरी शक्यता आहे हे माहित असताना केली किंवा अशी कोणतीही शारीरिक इजातीमुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून येण्याची शक्यता आहे हे माहीत असताना केली, तर तिला मृत्यूची किंवा जन्मठेपेची शिक्षा होईल.

**विवक्षित रेल्वे (संपत्तीला) नुकसान पोहोचवणे किंवा तिचा विनाश करणे.**

१५१. (१) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या एखाद्या रेल्वेच्या कोणत्याही संपत्तीचे नुकसान किंवा विनाश होण्याची शक्यता आहे हे माहीत असताना, आग, स्फोटक पदार्थ याद्वारे किंवा अन्यथा, अशा संपत्तीला नुकसान पोहोचवील किंवा अशा संपत्तीचा विनाश घडवून आणील, तिला पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(२) एखाद्या रेल्वेची पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली संपत्ती म्हणजे रेल्वे मार्ग पूल, स्थानकाच्या इमारती व संचमांडणी, डबे किंवा वाघिणी, इंजिने, संकेत यंत्रणा, पूरसंचरण, विद्युत संकर्षण आणि ब्लॉक साधनसामग्री आणि ज्या संपत्तीला नुकसान पोचल्यामुळे किंवा तिचा विनाश झाल्यामुळे एखाद्या रेल्वेच्या चालनाला धोका पोचण्याचा संभव आहे, असे केंद्र शासनाचे मत असल्यामुळे ते शासकीय राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, अशी इतर संपत्ती.

**रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींना विद्वेषाने दुखापत करणे किंवा दुखापत करण्याचा प्रयत्न करणे.**

१५२. जर एखादी व्यक्ती, एखाद्या गाडीचा भाग असणाऱ्या रुळयांनामध्ये किंवा त्यावर असलेल्या किंवा त्याच गाडीचा भाग असणाऱ्या इतर कोणत्याही रुळयांनामध्ये किंवा त्यावर असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका पोहोचवण्याच्या उद्देशाने किंवा तिच्याकडून तसा धोका पोहोचवण्याची शक्यता आहे, हे माहीत असताना, कोणतेही लाकूड, दगड किंवा इतर बाब किंवा गोष्ट, अशा रुळयांनांकडे त्याच्याविरूद्ध दिशेने, त्याच्यामध्ये किंवा त्याच्यावर बेकायदेशीरपणे फेकील किंवा पाडण्याची किंवा आपटण्याची व्यवस्था करील, तर तिला जन्मठेपेची किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल.

**हेतुपुरःसर कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे, रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेस धोका पोचवणे.**

१५३. जर एखादी व्यक्ती, कोणत्याही बेकायदेशीर कृतीद्वारे किंवा कोणत्याही हेतुपुरःसर अकृतीद्वारे किंवा हयगयीद्वारे कोणत्याही रेल्वेवर प्रवास करणाऱ्या किंवा रेल्वेमध्ये असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या सुरक्षिततेस धोका पोहोचवील किंवा पोहोचवण्याची व्यवस्था करील किंवा कोणत्याही रेल्वेवरील कोणत्याही रुळयानाला अडथळा करील किंवा अडथळा केला जाण्याची व्यवस्था करील किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न करील, तर तिला पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात यईल.

**बेदरकार किंवा हयगयीच्या कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेला धोका पोहोचवणे.**

१५४. जर एखादी व्यक्ती, बेदरकारपणे किंवा हयगयीने कोणतीही कृती करील किंवा जी कृती करणे तिच्यावर कायद्याने बंधनकारक आहे ती कृती करणार नाही आणि अशा कृतीमुळे किंवा अकृतीमुळे एखाद्या रेल्वेवर प्रवास करणाऱ्या किंवा तिच्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सुरक्षिततेस धोका पोहोचण्याची शक्यता असेल, तर तिला एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

**राखीव डब्यात प्रवेश करणे किंवा राखीव नसलेल्या डब्यात प्रवेश करण्यास प्रतिकार करणे.**

१५५. (१) जर कोणत्याही प्रवाशाने,—

(क) त्याच्या वापरासाठी रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही शायिका किंवा आसन राखीव ठेवण्यात आले नसेल, अशा डब्यात प्रवेश केल्यावर, किंवा

(ख) रेल्वे प्रशासनाकडून अन्य प्रवाशांसाठी राखीव ठेवलेली शायिका किंवा आसन अनधिकृतरीत्या स्वतःसाठी ताब्यात घेतल्यावर यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यांकडून ते सोडण्याची सक्ती करण्यात आली असता, तसे करण्याचे नाकारल्यास, असा रेल्वे कर्मचारी त्या प्रवाशाला अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सहाय्याने त्या डब्यातून, शायिकेतून किंवा प्रकरणपरत्वे, आसनावरुन हुसकावून लावू शकेल आणि त्याला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षाही देण्यात येईल.

(२) एखाद्या प्रवाशाने, त्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्यात आलेला नाही अशा डब्यात कायदेशीरपणे प्रवेश करणाऱ्या अन्य प्रवाशांच्या प्रवेशास प्रतिकार केला तर त्याला दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

१५६. जर कोणत्याही प्रवाशाने किंवा अन्य व्यक्तीने, रेल्वे कर्मचाऱ्यांकडून तसे करण्यापासून परावृत्त होण्याची ताकीद देण्यात आल्यानंतरही, कोणत्याही डब्याचे छप्पर (टप), पायरी किंवा पायफळी यावरुन किंवा इंजिनावरुन किंवा प्रवाशांच्या वापरासाठी उद्देशित नसलेल्या गाडीच्या अन्य कोणत्याही भागातून प्रवास केला तर तिला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून त्याला रेल्वे गाडीतून काढून लावण्यात येईल. गाडीचे छप्पर (टप), पायरी किंवा इंजिन यावरून प्रवास करणे.

१५७. जर एखादा प्रवासी, आपला पास किंवा तिकीट, त्यावरील तारीख, क्रमांक व इतर महत्वाचा भाग दुर्वाच्च करण्यासाठी त्यात हेतुपुरःस्सर फेरबदल करील किंवा ते विरुपित करील तर त्याला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील. पास किंवा तिकीट यात फेरबदल करणे किंवा ते विरुपित करणे.

१५८. प्रकरण चौदावे याच्या उपबंधापैकी कोणताही उपबंध किंवा त्या अन्वये केलेले नियम यांचे व्यतिक्रमणकरुन कोणत्याही व्यक्तीच्या प्राधिकाराव्न्ये नोकरीत ठेवण्यात आले असेल, त्या व्यक्तीला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची शिक्षा देता येईल. प्रकरण चौदावे याच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल द्रव्यदंड.

१५९. जर कोणत्याही वाहनाचा कोणताही चालक किंवा वाहक रेल्वेच्या जागेत असताना, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यांच्या किंवा पोलीस अधिकाऱ्याच्या वाजवी निदेशांची अवज्ञा करील, तर त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देता येतील. वाहनचालक किंवा वाहक यांच्याकडून रेल्वे कर्मचारी इ. च्या निदेशांची अवज्ञा.

१६०. (१) रेल्वे कर्मचारी किंवा यासंबंधात प्राधिकृत असलेली व्यक्ती या व्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती, रस्त्याजवळील कोणत्याही बाजूवर उभारलेले, रेल्वे ओलांडणीवरील कोणतेही फाटक, उघडील किंवा साखळी किंवा आडकाठी बाजूला करील, तिला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल. रेल्वे ओलांडणीवरील फाटके उघडणे किंवा तोडणे.

(२) जर कोणतीही व्यक्ती रस्त्याजवळील रेल्वे ओलांडणीवरील कोणत्याही बाजूवर उभारलेले कोणतेही फाटक, साखळी किंवा आडकाठी तोडील, तिला पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल.

१६१. वाहन चालविणाऱ्या किंवा नेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, माणूस नियुक्त केलेला नसेल अशी रेल्वे ओलांडणी ओलांडताना हयगय केल्यास, तिला एक वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल. माणूस नियुक्त केलेला नसेल अशी रेल्वे ओलांडणी हयगयीने ओलांडणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, माणूस नियुक्त केलेला नसेल अशी रेल्वे ओलांडणी ओलांडण्याच्यासंबंधात वाहन चालविणाऱ्या किंवा नेणाऱ्या व्यक्तीने केलेली "हयगय" याचा अर्थ, अशा व्यक्तीने अशी रेल्वे ओलांडणी,—

(क) कोणतेही रुळयान दृष्टिपथात आहे किंवा कसे हे बघण्यासाठी, अशा रुळ ओलांडणीजवळ वाहन न थांबवता किंवा असे हे बघण्यासाठी, अशा रुळ ओलांडणीजवळ, वाहन न थांबवता किंवा वाहन थांबवण्याची काळजी न घेता, किंवा

(ख) रुळयान दिसत असूनही, पार करणे, असा आहे.

१६२. रेल्वेचे एखादे वाहन, डबा, शायिका किंवा कक्ष किंवा इतर ठिकाण रेल्वे प्रशासनाने केवळ महिलांच्याच वापरासाठी आरक्षित ठेवले आहे हे माहीत असूनही किंवा असा विश्वास असूनही, एखादा पुरुष कोणत्याही कारणाशिवाय, महिलांसाठी राखीव डब्यात किंवा इतर जागेत प्रवेश करणे.

(क) असे वाहन, डबा, कक्ष किंवा इतर ठिकाण, यात प्रवेश करील किंवा असे वाहन, डबा, कक्ष किंवा इतर ठिकाण यात प्रवेश केल्यानंतर, तेथेच राहील, किंवा

(ख) कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याद्वारे, ते रिकामे करून देण्यास सांगण्यात आल्यानंतरही, अशी कोणतीही शायिका किंवा आसन स्वतःकडेच ठेवील,

त्याला, त्याचा पास किंवा तिकीट तर गमवावे लागेलच, पण त्याशिवाय त्याला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याकडून काढून लावले जाऊ शकेल.

...च्या खोटा हिशेब देणे.

१६३. कोणत्याही मालाच्या संबंधात कलम ६६ अन्वये तपशील देण्याबाबत जिला फर्मावण्यात आले असेल, अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मालाच्या संबंधात, जो मूलतः खोटा आहे, असा तपशील देईल. त्या व्यक्तीला आणि जर ती त्या मालाची मालक नसेल तर, त्या मालकालासुद्धा, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाखालील कोणतीही वाहणावळ किंवा इतर आकार भरण्याच्या तिच्या दायित्वास बाध न आणता, त्या मालाच्या प्रत्येक क्विंटलला किंवा क्विंटलच्या भागाला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

...तक माल ...देशीरपणे ...रेल्वेवर आणणे.

१६४. एखाद्या व्यक्तीने कलम ६७ चे व्यतिक्रमण करून कोणताही क्षोभक माल स्वतःबरोबर एखाद्या रेल्वेवर आणला किंवा वहनासाठी रेल्वेकडे असा माल सुपूर्द केला तर त्या व्यक्तीला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि असा माल रेल्वेवर आणल्यामुळे जी कोणतीही हानी, क्षती किंवा नुकसान होईल त्यालाही ती जबाबदार असेल.

...क माल ...देशीरपणे ...रेल्वेवर आणणे.

१६५. एखाद्या व्यक्तीने कलम ६७ चे व्यतिक्रमणकरून कोणताही क्षोभक माल स्वतःबरोबर एखाद्या रेल्वेवर आणला किंवा एखाद्या रेल्वेवरून वहनासाठी रेल्वे प्रशासनाकडे सुपूर्द केला तर त्या व्यक्तीला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल, आणि असा माल रेल्वेवर आणल्यामुळे जी कोणतीही हानी, क्षती किंवा नुकसान होईल, त्यालाही ती जबाबदार असेल.

...क नोटिसा ...द करणे.

१६६. जर कोणतीही व्यक्ती कायदेशीर प्राधिकाराशिवाय,—

(क) रेल्वे प्रशासनाच्या आदेशाद्वारे एखाद्या रेल्वेवर किंवा कोणत्याही स्थानावर लावलेला किंवा उभारलेला कोणताही फलक किंवा दस्तऐवज ओढून काढील किंवा त्याला हेतुपुरस्सर क्षती पोहोचवील, किंवा

(ख) अशा कोणत्याही फलकांवरील किंवा दस्तऐवजांवरील किंवा कोणत्याही स्थानावरील कोणतीही अक्षरे किंवा आकडे पुसून टाकील वा त्यात फेरबदल करील तर, तिला एक महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

...धूम्रपान.

१६७. (१) गाडीच्या कोणत्याही डब्यातील कोणतीही व्यक्ती, त्या डब्यातील अन्य कोणत्याही प्रवाशाने तसे करण्यास हरकत घेतली तर, त्या डब्यात धूम्रपान करू शकणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, रेल्वे प्रशासनाला कोणत्याही गाडीत किंवा गाडीच्या भागात धूम्रपानास मनाई करता येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या उपबंधाचे जो कोणी व्यतिक्रमण करील त्यास शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

...प्रवास ...व्यक्तींनी ...केल्यास ...त्यांच्या ...कडून ...त्या ...खालील ...दायित्व.

१६८. (१) बारा वर्षाखालील वयाची एखादी व्यक्ती, कलम १५० ते १५४ खाली कोणत्याही अपराधाबद्दल दोषी असेल, तर तिला सिद्धदोष ठरविणाऱ्या न्यायालयाला त्या व्यक्तीच्या पित्याला किंवा पालकाला, न्यायालय निश्चित करील अशा कालावधीच्या आत, अशा व्यक्तीच्या सद्वर्तनासाठी, न्यायालय निदेशित करील अशा रकमेचे व अशा कालावधीचे बंधपत्र निष्पादित करून देण्यास फर्मावता येईल.

(२) बंधपत्राची रक्कम समपहृत केली असेल तर, ती जणू काही न्यायालयाने बसवलेला द्रव्यदंड असल्याप्रमाणेच त्याच्याकडून वसुलीयोग्य असेल.

(३) न्यायालयाकडून निश्चित करण्यात आलेल्या मुदतीत पोट-कलम (१) खालील बंधपत्र निष्पादित करण्यात पित्याने वा पालकाने कसूर केल्यास त्याला पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

...सरकारी ...ल्वेची ...स्ती.

१६९. जर कोणत्याही विनसरकारी रेल्वेने, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये केंद्र शासनाकडून करण्यात आलेल्या कोणत्याही मागणीचे अथवा देण्यात आलेल्या निर्णयाचे किंवा निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली अथवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांचे अथवा व्यतिक्रमण केले तर, केंद्र शासन आदेशाद्वारे, दोनशे पन्नास रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतकी शास्ती अथवा असे व्यतिक्रमण जितके दिवस चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी दीडशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी आणखी शास्ती आकारू शकेल :

परंतु असे की, विनसरकारी रेल्वेला योग्य वाटेल असे अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज अशी कोणतीही शास्ती आकारली जाणार नाही.

...सुली.

१७०. कलम १६९ अन्वये केंद्र शासनाकडून बसवण्यात आलेली कोणतीही शास्ती, विनसरकारी रेल्वेचे मुख्य कार्यालय ज्या ठिकाणी असेल तेथे अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयात दावा दाखल करून वसूल करता येईल.

१७१. या अधिनियमाद्वारे वा अन्वये बिनसरकारी रेल्वेवर टाकण्यात आलेले कोणतेही आबंधन पार पाडण्याची तिला सक्ती करण्यासाठी अन्य कोणत्याही कारवाईचा आधार घेण्यास कलम १६९ किंवा १७० मधील कोणत्याही गोष्टीमुळे केंद्र शासनास प्रतिवादित केले जाणार नाही. — कलम १६९ किंवा १७०, हे, केंद्र शासनाला इतर कोणतीही कारवाई करण्यास प्रतिवादित करणार नाही.

१७२. कामावर असताना कोणताही रेल्वे कर्मचारी नशेत असल्याचे आढळून आल्यास त्याला पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल आणि अशा अवस्थेत कोणत्याही प्रकारचे काम केल्यामुळे रेल्वेतून प्रवास करणाऱ्या किंवा रेल्वेत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता असेल तर, अशा रेल्वे कर्मचाऱ्याला एक वर्षापर्यंत असू शकेल अशा कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील. — नशेबद्दल शास्ती.

१७३. जर एखाद्या रेल्वे कर्मचाऱ्यावर, तो कामावर असताना एखादी गाडी, किंवा इतर कोणतेही रुळयान एका स्थानकाहून किंवा ठिकाणाहून दुसऱ्या स्थानकाकडे किंवा ठिकाणी नेण्यासाठी चालवण्याशी संबंधित अशी कोणतीही जबाबदारी सोपविण्यात आली असेल आणि अशा स्थानकावर किंवा ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच त्याने प्राधिकरणाशिवाय किंवा अशी गाडी किंवा रुळयान योग्य रीतीने दुसऱ्या प्राधिकृत रेल्वे कर्मचाऱ्याच्या हवाली केल्याशिवाय आपल्या कर्तव्याचा परित्याग केला असेल तर, त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील. — प्राधिकाराशिवाय गाडी इ. चा परित्याग करणे.

१७४. जर एखादा रेल्वे कर्मचारी (कामावर असताना किंवा अन्यथा) किंवा इतर कोणतीही व्यक्ती, — गाडी इत्यादी चालवण्यात अडथळा आणणे.

(क) कोणत्याही रेल्वे रोको आंदोलनाच्या वेळी किंवा बंदच्यावेळी बैठक मारुन बसून किंवा धरणे धरून; किंवा

(ख) प्राधिकाराशिवाय कोणतेही रुळयान रेल्वेवर ठेवून ; अथवा

(ग) तिचे होज पाईप बिघडवून, ते काढून टाकून किंवा त्यामध्ये अन्य कोणत्याही रीतीने ढवळाढवळ करुन अथवा सिग्नल गिअर बिघडवून, किंवा अन्यथा,

कोणत्याही गाडीला किंवा रेल्वेवरील इतर रुळयानाला अडथळा आणील किंवा अडथळा आणला जाण्याची व्यवस्था करील किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करील,

त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

१७५. जर एखादा रेल्वे कर्मचारी, कामावर असताना,— — व्यक्तींची सुरक्षितता धोक्यात आणणे.

(क) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाची अवज्ञा करुन, किंवा

(ख) या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमाखालील कोणतीही सूचना, निदेश किंवा आदेश यांची अवज्ञा करून, किंवा

(ग) कोणत्याही अविचारी किंवा निष्काळजी कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे,

कोणत्याही व्यक्तीची सुरक्षितता धोक्यात आणील तर, त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

१७६. जर एखादा रेल्वे कर्मचारी विनाकारण,— — रुळ ओलांडण्याना अडथळा आणणे.

(क) जेथे रेल्वे एखादा सार्वजनिक रस्ता समपातळीत ओलांडेल अशा एखाद्या ठिकाणी, कोणतेही रुळयान उभे राहू देईल; किंवा

(ख) एखादी रुळ ओलांडणी जनतेला बंद ठेवील;

तर त्याला शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देता येईल.

१७७. या अधिनियमाद्वारे वा अन्वये कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याने सादर करणे आवश्यक असलेले कोणतेही विवरण, कोणत्याही महत्वाच्या तपशीलाच्या बाबतीत खोटे असताना किंवा ते खोटे असल्याचे त्याला माहित असताना, किंवा तसा त्याचा विश्वास असताना, किंवा ते खरे आहे असा त्याचा विश्वास नसताना, त्यावर त्याने सही केली व ते सादर केले तर त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील. — खोटी विवरणे.

**रेल्वे कर्मचाऱ्याने खोटा अहवाल देणे.**

१७८. कोणत्याही पाठवलेल्या मालाची हानी, नाश, नुकसान, ऱ्हास होणे किंवा त्याची सुपूर्दगी न होणे याबाबतीत कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला चौकशी करण्यास सांगण्यात आले असता त्याने खोटा अहवाल दिला किंवा तो खोटा असल्याचे त्याला माहित असेल किंवा तसा त्याचा विश्वास असेल किंवा तो खरा आहे असा त्याचा विश्वास नसेल तर, त्याला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

**विवक्षित कलमांखालील अपराधांसाठी अटक.**

१७९. (१) जर एखादी व्यक्ती कलम १३७, १४१ ते १४७, १५० ते १५७, १६० ते १६२ १६६, १६६, १६८ आणि १७२ ते १७५ यांमध्ये नमूद केलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध करील तर, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा हवालदाराच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसेल अशा पोलीस अधिकाऱ्याला लेखी वॉरंटाशिवाय किंवा इतर लेखी प्राधिकाराशिवाय तिला अटक करता येईल.

(२) रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला, पोटकलम (१) खालील अटक अंमला आणण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीला आपल्या मदतीसाठी बोलवता येईल.

(३) या कलमान्वये अशा प्रकारे अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत, अटकेचे ठिकाण ते दंडाधिकाऱ्याचे न्यायालय हे अंतर जाण्यासाठी लागणारा वेळ वगळून, सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्याकडे हजर करण्यात येईल.

**फरारी होण्याची शक्यता असलेल्या व्यक्ती इत्यादींना अटक.**

१८०. (१) जर एखादी व्यक्ती कलम १७९ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अपराधाहून इतर कोणताही अपराध करील, किंवा कलम १३८ अन्वये मागणी करण्यात आलेल्या कोणताही जादा आकार किंवा इतर रक्कम भरण्यास दायी असेल किंवा आपले नाव व पत्ता देण्यात कसूर करील किंवा देण्याचे नाकारील किंवा तिने दिलेले नाव व पत्ता काल्पनिक असल्याबद्दल वाजवी विश्वास असेल तर, किंवा ती फरारी होईल असे वाटण्यास पुरेसे कारण असेल तर, यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा हवालदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला वॉरंटाशिवाय किंवा इतर लेखी प्राधिकाराशिवाय तिला अटक करता येईल.

(२) रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याला पोटकलम (१) खालील अटक अंमलात आणण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीला आपल्या मदतीसाठी बोलविता येईल.

(३) या कलमाखाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याच्या समोर हजर राहण्यासाठी विना प्रतिभूतीचे एखादे बंधपत्र निष्पादित केल्यानंतर किंवा तिचे खरे नाव व पत्ता यांबाबत खात्री करून घेण्यात आल्यानंतर, यापूर्वी तिला जामिनावर मुक्त करण्यात आले असेल त्याखेरीज करून अशी अटक केल्यापासून चोवीस तासांच्या आत, अटकेचे ठिकाण व दंडाधिकाऱ्याचे न्यायालय येथेपर्यंत जाण्यासाठी लागणारा कालावधी वगळून सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करण्यात येईल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) प्रकरण तेवीस याचे उपबंध, शक्य असेल तितपत, या कलमान्वये दिल्या जाणाऱ्या जमानतीला आणि बंधपत्राच्या निष्पादनाला लागू होतील.

**अधिनियमान्वये अधिकारिता असलेला दंडाधिकारी.**

१८१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा दुय्यम दर्जाचे असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

**संपरीक्षेचे ठिकाण.**

१८२. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये अपराध करणारी कोणतीही व्यक्ती, ती ज्या ठिकाणी असेल अशा कोणत्याही ठिकाणी किंवा याबाबत राज्य शासन अधिसूचित करील त्या ठिकाणी, तसेच त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे ज्या ठिकाणी तिची संपरीक्षा करता येत असेल अशा इतर कोणत्याही ठिकाण, अशा अपराधाबद्दल संपरीक्षा केली जाण्यास पात्र असेल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येईल आणि तिची प्रत राज्य शासन निदेश देईल अशा रेल्वे स्थानकांवरील एखाद्या ठळक ठिकाणी जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल.

**इतर परिवहन सेवांची तरतूद करण्याची शक्ती.**

१८३. (१) रेल्वे प्रशासनाला, प्रवासी किंवा माल यांचे वहन सुकर करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा अशा वहनासाठी एकात्मीकृत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी, परिवहनाची अन्य कोणतीही पद्धत उपलब्ध करून देता येईल.

(२) त्या त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाचे उपबंध, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रवासी व माल यांच्या वहन पद्धतीस लागू होतील.

१८४. (१) अन्य कोणत्याही कायद्यात तद्‌विरुद्ध काहीही समाविष्ट असले तरी एखादे रेल्वे प्रशासन, केंद्र शासनाने, अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला कर भरण्यास ते रेल्वे प्रशासन दायी असल्याचे घोषित केल्याखेरीज, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या निधीच्या मदतीसाठी कोणताही कर भरण्यास दायी असणार नाही. — स्थानिक प्राधिकरणाद्वारे रेल्वेवरील कराधान.

(२) पोटकलम (१) खालील केंद्र शासनाची अधिसूचना जारी असताना, रेल्वे प्रशासन, स्थानिक प्राधिकरणाला, एकतर अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कर किंवा त्याऐवजी, केंद्र शासनाकडून यासंबंधात नियुक्त करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांकडून, प्रकरणाची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन, वेळोवेळी रास्त व वाजवी अशी निर्धारीत करण्यात येईल ती रक्कम भरण्यास दायी असेल.

(३) केंद्र शासनाला पोटकलम (१) अन्वये काढलेली अधिसूचना, कोणत्याही वेळी प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात बदल करता येईल.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही रेल्वे प्रशासनाला, पाणी किंवा वीजपुरवठा यासाठी, किंवा रेल्वे वास्तूतील मेहतरकामासाठी किंवा स्थानिक प्राधिकरण रेल्वे प्रशासनाला देत असेल अशा अन्य कोणत्याही सेवेसाठी, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाबरोबर करार करण्यास प्रतिबंध केला जात आहे, असे समजले जाणार नाही.

१८५. (१) अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काही विरुद्ध अंतर्भूत असले तरी, रेल्वे प्रशासन, रेल्वेच्या कोणत्याही भागांवर केलेल्या कोणत्याही जाहिरातीपोटी, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, कोणताही कर भरण्यास, केंद्र शासनाने, अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेला कर भरण्यास रेल्वे प्रशासन दायी असल्याचे घोषित केले असल्याखेरीज, दायी असणार नाही. — जाहिरातीसाठी रेल्वेवरील कराधान.

(२) केंद्र शासनाला, पोटकलम (१) अन्वये काढलेली अधिसूचना कोणत्यावेळी प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात बदल करता येईल.

१८६. केंद्र शासन, कोणतेही रेल्वे प्रशासन, रेल्वे कर्मचारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या विरुद्ध, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या वा आदेशांच्या पालनार्थ सद्‌भावनेने केलेल्या किंवा करणे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करणार नाही. — सद्‌भावनेने केलेल्या कोणत्याही कारवाईस संरक्षण.

१८७. (१) रेल्वे प्रशासनाने आपल्या रेल्वेवर वाहतुकीसाठी किंवा आपल्या स्थानकांवर किंवा कार्यशाळामध्ये वापरलेले किंवा पुरविलेले कोणतेही रुळयान यंत्रसामग्री, संयंत्रे, हत्यारे, जोडण्या, सामान किंवा चीजवस्तू या केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीविना, कोणत्याही न्यायालयाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कायद्याद्वारे संपत्तीवर जप्ती आणण्याची किंवा ती अटकावून ठेवण्याची शक्ती असलेल्या किंवा ती संपत्ती अन्यथा निष्पादनार्थ घेण्याची व्यवस्था करण्याची शक्ती असलेल्या व्यक्तीच्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या निष्पादनार्थ स्वीकारल्या जाण्यास पात्र असणार नाहीत. — रेल्वे संपत्तीच्या निष्पादनावर निर्बंध.

(२) हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये रेल्वेच्या कमाईवर जप्ती आणण्याच्या कोणत्याही न्यायालयाच्या प्राधिकारावर, पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होतो असा अर्थ लावला जाणार नाही.

१८८. (१) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक नसलेला कोणताही रेल्वे कर्मचारी, त्या संहितेचे प्रकरण नऊ व कलम ४०९ यांच्या प्रयोजनासाठी लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. — रेल्वे कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ व कलम ४०९ च्या प्रयोजनासाठी लोकसेवक असणे.

(२) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १६१ मधील "वैध पारिश्रमिक" च्या व्याख्येतील "शासन" या शब्दामध्ये, पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी, अशा रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही सेवायोजकाचा समावेश होतो असे मानण्यात येईल.

१८९. कोणताही रेल्वे कर्मचारी,— — रेल्वे कर्मचारी व्यापारात गुंतणार नाही.

(क) कलम ८३ किंवा कलम ८४ किंवा कलम ८५ किंवा कलम ९० अन्वये लिलावासाठी ठेवलेल्या कोणत्याही संपत्तीसाठी व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीद्वारे, त्याच्या स्वतःच्या नावे किंवा अन्य व्यक्तीच्या नावे, किंवा संयुक्तपणे किंवा इतरांबरोबर भागीदारीमध्ये खरेदी करणार नाही किंवा बोली बोलणार नाही.

(ख) या संबंधातील रेल्वे प्रशासनाच्या कोणत्याही निदेशाच्या विरुद्ध व्यापारात गुंतणार नाही.

(शा.म.मु.) एच ४५४२—८ (१०३९—२—९८)

**रेल्वे कर्मचाऱ्याने अडकवून ठेवलेली संपत्ती रेल्वे प्रशासनाकडे सुपूर्द करण्याची कार्यपद्धती.**

१९०. एखाद्या रेल्वे कर्मचाऱ्याला सेवामुक्त करण्यात आले किंवा निलंबित करण्यात आले किंवा तो मरण पावला किंवा फरारी झाला किंवा स्वतः गैरहजर राहिला, आणि तो किंवा त्याची पत्नी किंवा विधवा किंवा त्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी, रेल्वे प्रशासनाकडे किंवा रेल्वे प्रशासनाकडून यासंबंधात नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे, रेल्वे प्रशासनाच्या मालकीचे आणि पूर्वोक्त अशी कोणतीही घटना घडली त्यावेळी, अशा रेल्वे कर्मचाऱ्याच्या ताब्यात किंवा अभिरक्षेत असलेले कोणतेही स्थानक, कार्यालय किंवा इतर इमारत तिच्या अंगभूत वस्तूंसह, अथवा कोणतीही पुस्तके, कागदपत्रे, चाव्या, साधनसामग्री किंवा इतर गोष्टी त्यासाठी लेखी नोटीस आल्यानंतरही, सुपूर्द करण्यास नकार दिला किंवा हयगय केली तर, कोणताही प्रथमवर्ग महानगर दंडाधिकारी किंवा न्यायिक दंडाधिकारी रेल्वे प्रशासनाद्वारे किंवा त्याच्यामार्फत यासंबंधात अर्ज करण्यात आल्यानंतर, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला योग्य त्या सहाय्यानिशी ते स्थानक, कार्यालय किंवा अन्य इमारत यामध्ये प्रवेश करण्याचा आणि तेथे आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीला घालविण्याचा आणि त्याचा कब्जा घेण्याचा किंवा पुस्तके, कागदपत्रे किंवा इतर गोष्टी ताब्यात घेण्याचा आणि त्या रेल्वे प्रशासनाकडे किंवा रेल्वे प्रशासनाकडून यासंबंधात नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्याचा निदेश देऊ शकेल.

**अभिलेख व दस्तऐवज यांमधील नोंदींचा पुरावा.**

१९१. रेल्वे प्रशासनाचे अभिलेख व दस्तऐवज यामध्ये केलेल्या नोंदी रेल्वे प्रशासनाकडून किंवा त्याच्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या सर्व कार्यवाहीमध्ये, पुरावा म्हणून ग्राह्य धरल्या जातील आणि अशा सर्व नोंदी, एकतर अशा नोंदी समाविष्ट असलेल्या रेल्वे प्रशासनाचे अभिलेख किंवा इतर दस्तऐवज सादर करून किंवा अभिलेखांची वा इतर दस्तऐवजांची अभिरक्षा ज्या अधिकाऱ्याकडे असेल, त्याच्या सहीनिशी अशा नोंदीची प्रमाणित करण्यात आलेली प्रत सादर करून आणि मूळ नोंदीची सत्य प्रत असल्याचे व अशा मूळ नोंदी त्याच्या ताब्यात असलेल्या रेल्वे प्रशासनाच्या अभिलेखांमध्ये किंवा इतर दस्तऐवजांमध्ये अंतर्भूत असल्याचे नमूद करून, शाबीत केल्या जातील.

**रेल्वे प्रशासनावर नोटीस, इत्यादींची बजावणी.**

१९२. या अधिनियमाद्वारे रेल्वे प्रशासनावर बजावणे आवश्यक असलेली किंवा प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही नोटीस किंवा अन्य दस्तऐवज, परिमंडल रेल्वेच्या बाबतीत महाव्यवस्थापकावर किंवा महाव्यवस्थापकाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यावर आणि अन्य कोणत्याही रेल्वेच्या बाबतीत, रेल्वेच्या मालकावर किंवा पट्टेदारावर किंवा करारान्वये रेल्वेचे काम करीत असलेल्या व्यक्तीवर,—

(क) तिच्याकडे सुपूर्द करून; किंवा

(ख) तिच्या कार्यालयात ठेवून; किंवा

(ग) नोंदणीकृत डाकेद्वारे तिच्या कार्यालयाच्या पत्त्यावर बजावता येईल.

**रेल्वे प्रशासनाकडून नोटीस, इत्यादींची बजावणी.**

१९३. या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत अन्यथा उपबंधित केल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीवर रेल्वे प्रशासनाकडून या अधिनियमान्वये बजावली जाणे आवश्यक असलेली किंवा प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही नोटीस वा दस्तऐवज,—

(क) त्या व्यक्तीकडे सुपूर्द करून; किंवा

(ख) त्या व्यक्तीच्या नेहमीच्या किंवा शेवटच्या माहितीनुसार असलेल्या निवासस्थानामध्ये ठेवून; किंवा

(ग) त्या व्यक्तीच्या नेहमीच्या किंवा शेवटच्या माहितीनुसार असलेल्या निवासस्थानी नोंदणीकृत डाकेने पाठवून

बजावता येईल.

**नोटीस डाकेने बजावण्यात येईल त्यावेळचे गृहीतक.**

१९४. नोटीस किंवा अन्य दस्तऐवज डाकेने बजावण्यात येतो तेव्हा, तो, त्यामध्ये अंतर्भूत असलेले पत्र डाकेच्या सामान्य क्रमात सुपूर्द केले जाईल अशावेळी बजावण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि अशी बजावणी सिद्ध करतेवेळी, नोटीस किंवा अन्य दस्तऐवज अंतर्भूत असलेल्या पत्राचा पत्ता योग्यरीतीने नमूद करण्यात आला होता व त्याची नोंदणी करण्यात आली होती, इतके सिद्ध करणे पुरेसे आहे.

**रेल्वे प्रशासनाचे प्रतिनिधित्व.**

१९५. (१) रेल्वे प्रशासनाला, लेखी आदेशाद्वारे, कोणत्याही दिवाणी, फौजदारी किंवा अन्य न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा अन्य व्यक्तीला, त्याच्यासाठी कृती करण्यास, किंवा प्रकरणपरत्वे, त्याचे प्रतिनिधित्व करण्यास प्राधिकृत करता येईल.

(२) रेल्वे प्रशासनाने त्याच्यावतीने खटला चालवण्यास प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम ३०२ मध्ये काहीही असले तरी, दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय असे खटले चालवण्यास हक्कदार असेल.

**रेल्वेला अधिनियमातून सूट देण्याची मुभा.**

१९६. (१) केंद्र शासनाला, अधिसूचनेद्वारे, कोणत्याही रेल्वेला या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधातून सूट देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

"रेल्वे" व "रेल्वे कर्मचारी" यांच्या व्याख्यांबाबत पूरक बाबी.

१९७. (१) कलमे ६७, ११३, १२१, १२३, १४७, १५१ ते १५४, १६०, १६४, १६६, १६८, १७०, १७१, १७३ ते १७६, १७९, १८०, १८२, १८४, १८५, १८७ ते १९०, १९२, १९३, १९५ आणि हे कलम यांच्या प्रयोजनार्थ, "रेल्वे" ह्या शब्दाचा संदर्भ, मग तो एकटाच येवो वा अन्य शब्दाला उपसर्ग म्हणून, बांधकाम चालू असणाऱ्या रेल्वेशी किंवा रेल्वेच्या भागाशी, त्याचप्रमाणे कलम २ च्या खंड ३१ मधील त्या शब्दाच्या व्याख्येमध्ये येणाऱ्या रेल्वेशी असेल.

(२) कलमे ७, २४, ११३, १४६, १७२ ते १७६ आणि १८८ ते १९० यांच्या प्रयोजनार्थ, "रेल्वे कर्मचारी" या शब्दप्रयोगामध्ये, रेल्वे प्रशासनाबरोबर केलेली संविदा पूर्ण करणाऱ्या व्यक्तीकडून, रेल्वेच्या सेवेसंबंधात रेल्वेमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा समावेश होतो.

नियम करण्याची सर्वसाधारण शक्ती.

१९८. या अधिनियमात अन्यत्र समाविष्ट असलेल्या नियम करण्याच्या शक्तीस बाध न आणता, केंद्र शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी सर्वसाधारणपणे नियम करता येतील.

संसदेपुढे ठेवावयाचे नियम.

१९९. या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, सत्र चालू असताना, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, किंवा तो करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा बदलेल्या रुपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

२००. (१) भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९) (यात यापुढे निरसित अधिनियम असे उल्लेखिलेला) निरसित करण्यात आला असला तरीही,—

(क) निरसित अधिनियमान्वये केलेले किंवा करण्याचा उद्देश असलेले काहीही किंवा केलेली किंवा करण्याचा उद्देश असलेली कोणतीही कारवाई (केलेला किंवा काढलेले कोणतेही नियम, अधिसूचना, तपासणी, आदेश किंवा नोटीस अथवा केलेली कोणतीही नियुक्ती किंवा घोषणा, किंवा देण्यात आलेले कोणतेही लायसन, अनुज्ञा, प्राधिकार, किंवा सूट, अथवा निष्पादित केलेला कोणताही दस्तऐवज किंवा संलेख अथवा दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली कोणतीही कार्यवाही किंवा बसवलेली कोणतीही शास्ती वा द्रव्यदंड यांचाही यात समावेश होतो) ती या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथपर्यंत, या अधिनियमाच्या तदनुरुप उपबंधान्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(ख) निरसित अधिनियमाच्या कलम ४१ च्या पोट-कलम (१) अन्वये रेल्वे दर अधिकरणाकडे केलेली, परंतु या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निकालात न काढलेली कोणतीही तक्रार किंवा निरसित अधिनियमान्वये रेल्वे प्रशासनाची कोणतीही कृती वा अकृती याबद्दल उक्त अधिकरणाकडे करता येईल अशा कोणत्याही तक्रारीची, या अधिनियमाच्या प्रकरण सातवे याच्या उपबंधानुसार या अधिनियमान्वये घटित झालेल्या कोणत्याही, अधिकरणाकडून सुनावणी केली जाईल व त्यावर निर्णय घेतला जाईल.

(३) पोट-कलम (२) मधील विशिष्ट बाबींचा उल्लेख निरसनाच्या परिणामासंबंधात, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) चे कलम ६ सर्वसाधारणत: लागू करण्यावर, बाधक किंवा परिणामक होईल, असे मानले जाणार नाही.

# THE RAILWAYS ACT, 1989

# रेल्वे अधिनियम, १९८९

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Act of God | दैवी घटना | [S. 93(a)] |
| Act of Public enemies | समाजकंटकांची कृत्ये | [S. 93(c)] |
| Act of War | युद्ध परिस्थिती | [S. 93(b)] |
| All lines of rails | रेल्वेचे सर्व रुळ | [S. 2(31)(b)] |
| Approach | प्रवेश मार्ग | [S. 2(15)] |
| Approaches to | प्रवेश करण्याची जागा | [S. 2(15)] |
| Article of transport | परिवहन वस्तु | [S. 2(19)(i)] |
| Block equipment | ब्लॉक साधनसामुग्री | [S. 15(2)] |
| Bridge of boats | नौका पूल | [S. 2(15)] |
| Carriage | वहन | [S. 65] |
| Conduit | नलिका | [S. 11(a)] |
| Consignment | प्रेषित माल | [S. 2(21)(a)] |
| Culvert | लहान पूल | [S. 16(1)(a)] |
| Cutting | खनन | [S. 20] |
| Demurrage | विलंब आकार | [S. 2(15)] |
| Dilligently | तत्परतेने | [S. 16(3)] |
| Distribution installations | वितरण संचमांडणी | [S. 2(31)(c)] |
| Ferry | तरउतार | [S. 2(15)] |
| Fixed plant | स्थिर संयंत्र | [S. 2(31)(d)] |
| Forthcomming | सादर करणे | [S. 76] |
| Free time | मुक्त वेळ | [S. 2(21)(b)] |
| Fright or restiveness | भेदरणे किंवा अडेलपणा | [S. 101] |
| Inclined-Planes | कमानी | [S. 2(87)(a)] |
| In-take Wells | ग्रहन-प्रस्तंभ विहीर | [S. 2(37)(a)] |
| Integrated Service | एकात्मीकृत सेवा | [S. 181(1)] |
| Intensive | कष्टमद | [S. 180(c)] |
| Land appurtenant | अनुलग्न जमीन | [S. 2(31)(a)] |
| Landing Places of | उतरण्याची जागा | [S. 2(15)] |

## इंग्रजी--मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Level Crossing | समतल ओलांडणी | [S. 2(22)] |
| Locomotives | रेल्वे इंजिन | [S. 2(37)] |
| (To) maintain an action | कारवाई करणे | [S. 124] |
| Nevigable inland waters | नाव्य आंतरदेशीय जल | [S. 2(31) (f)] |
| Parcel train | पार्सल गाडी | [S. 2(27)] |
| Passage over | वाट | [S. 16(1) (a)] |
| Periods of inaction | विसावा कालावधी | [S. 130 (b)] |
| Physical activity | शारीरिक सक्रियता | [S. 130(b)] |
| Picketing | धरणे | [S. 174(a)] |
| Pier(s) | धक्के | [S. 2(37) (a)] |
| Pilfer | भुरटी चोरी | [S. 97 Prov. (b)] |
| Points | सांधे | [S. 150(1) (c)] |
| Pontoons | पडाव | [S. 2(15)] |
| Propel | ढकलणे | [S. 29(2) (c)] |
| Raft | तराफा | [S. 2(15)] |
| River training | नदी नियंत्रण | [S. 11(a)] |
| Rolling stock | रुळयान | [S. 2(21) (b)] |
| Running room | चालक वर्ग कक्ष | [S. 2(31) (d)] |
| Structure of line | मार्गाची संरचना | [S. 22(1) (c)] |
| Structure of line of railway | रेल्वे मार्ग संरचना | [S. 22(1) (c)] |
| Sustained attention | श्रमसाध्य | [S. 130 (b)] |
| Swing bridge | झुलता पूल | [S. 2(15)] |
| Traffic running Staff | वाहतूक नियंत्रण करणारा कर्मचारी वर्ग | [S. 133(2)] |
| Train-load | गाडीभार | [S. 65(2)] |
| Transhipment charge | वाहनांतरण आकार | [S. 2(17)] |
| Undue preference | गैरवाजवी अधिमान्यता | [S. 41(a)] |
| Untoward incidents | अश्लाघ्य घटना | [Defination] |
| Wharve | मालधक्का | [S. 2(31) (d)] |
| Zonal railway | क्षेत्रीय रेल्वे | [S. 2(18)] |

# रेल्वे अधिनियम, १९८९

# THE RAILWAYS ACT, 1989

## मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनुलग्न जमीन | Land appurtenant | [क.२ (३१) (क) ] |
| अश्लाघ्य घटना | Untoward incidents | [व्याख्या] |
| उतरण्याची जागा | Landing places of | [क. २ (१५) ] |
| एकात्मीकृत सेवा | Integrated Service | [क. १८३ (१) ] |
| कमानी | Inclined-planes | [क. २ (३७) (क) ] |
| कष्टप्रद | Intensive | [क. १३० (क) ] |
| कारवाई करणे | (To) maintain an action | [क. १२४] |
| खनन | Cutting | [क. २०] |
| गाडीभार | Train load | [क. ६५ (२) ] |
| गैरवाजवी अधिमान्यता | undue preference | [क. ४१ (क) ] |
| ग्रहण प्रस्तंभ विहीर | In-take wells | [क. २ (३७) (क) ] |
| चालक वर्ग कक्ष | Running room | [क. २ (३१) (घ) ] |
| झुलता पूल | Swing Bridge | [क. २ (१५) ] |
| ढकलणे | Propel | [क. २९ (२) (ग) ] |
| तत्परतेने | Dilligently | [क. १६ (३) ] |
| तरवतार | Ferry | [क. २ (१५) ] |
| तराफा | Raft | [क. २ (१५) ] |
| दैवी घटना | Act of God | [क. ९३ (क) ] |
| धक्के | Pier(s) | [क. २ (३७) (क) ] |
| धरणे | Picketing | [क. १७४ (क) ] |
| नदी नियंत्रण | River training | [क. ११ (क) ] |
| नलिका | Conduit | [क. ११ (क) ] |
| नाव्य आंतरदेशीय जल | Navigable Inland waters | [क. २ (३१) (च) ] |
| नौका पूल | Bridge of boats | [क. २ (१५) ] |
| पडाव | Pontoons | [क. २ (१५) ] |
| परिवहन वस्तू | Article of transport | [क. २ (१९) (एक) ] |
| पार्सल गाडी | Parcel train | [क. २ (२७) ] |
| प्रवेश करण्याची जागा | Approaches to | [क. २ (१५) ] |
| प्रवेश मार्ग | Approach | [क. २ (१५) ] |
| प्रेषित माल | Consignment | [क. २ (२१) (क) ] |
| ब्लॉक साधनसामग्री | Block equipment | [क. १५१ (२) ] |
| भुरटी चोरी | Pilfer | [क. ९७ परंतुक (ख) ] |
| भेदरणे किंवा अडेलपणा | Fright or restiveness | [क. १०१] |
| मार्गाची संरचना | Structure of Lines | [क. २२ (१) (ख) ] |
| मालधक्का | Wharve | [क. २ (३१) (ख) ] |

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| मुक्त वेळ | Free time | [क. २ (२१) (ख) ] |
| युद्ध परिस्थिती | Act of War | [क. ९३ (ख) ] |
| रेल्वे इंजिन | Locomotives | [क. ३ (३७) ] |
| रेल्वेचे सर्व रूळ | All lines of rails | [क. २ (३१) (ख) ] |
| रेल्वे मार्ग संरचना | Structure of line of railway | [क. २२ (१) (ग) ] |
| रूळयान | Rolling stock | [क. २ (३१) (ख) ] |
| वहान पूल | Culverts | [क. १६ (१) (क) ] |
| वहन | Carriage | [क. ५५] |
| वाटा | Passage over | [क. १६ (१) (क) ] |
| वाहतूक नियंत्रण करणारा कर्मचारी वर्ग | Traffic running staff | [क. १३३ (२) ] |
| वाहनांतरण आकार | Transhipment charge | [क. २ (१७) ] |
| वितरण संचमांडणी | Distribution installations | [क. २ (३१) (ग) ] |
| विलंब आकार | Demurrage | [क. २ (१५) ] |
| विसावा कालावधी | Periods of inaction | [क. १३० (ख) ] |
| शारीरिक सक्रियता | Physical activity | [क. १३० (ख) ] |
| श्रमसाध्य | sustained attention | [क. १३० (ख) ] |
| समतल ओलांडणी | Level Crossing | [क. २ (२२) ] |
| समाजकंटकांची कृत्ये | Act of Public enemies | [क. ९३ (ग) ] |
| सादर करणे | Forthcoming | [क. ७६] |
| सांधे | Points | [क. १५० (१) (ग) ] |
| स्थिर संयंत्र | Fixed Plant | [क. २ (३१) (ख) ] |
| क्षेत्रीय रेल्वे | Zonal Railway | [क. २ (१८) ] |

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

● **संचालक**
शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

● **व्यवस्थापक**
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
पुणे ४११ ००१
दूरध्वनी : ६६ ८८ ५९

● **व्यवस्थापक**
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
दूरध्वनी : ५२ २६ १५

● **सहा. संचालक**
शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
शहागंज, गांधी चौकाजवळ,
औरंगाबाद ४३१ ००१
दूरध्वनी : ३३ १४ ६८

● **व्यवस्थापक**
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
ताराबाई पार्क
कोल्हापूर ४१६ ००३
दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**